# 'स्व'-रूपवर्धिनी

## वार्षिक कार्यवृत्त - २०२३



पदी धैर्य, बाहूत शौर्य स्फुरावे,
घडावी विवेकी कृती-ध्यास हा।।













उभविले नच केवळ, मंदिर हे रामाचे ।
घडवू यातून राष्ट्रमंदिर, नव भारताचे ।।




हार्दिक शुभेच्छा!

अश्वमेध हॉल / अश्वमेध केटरर्स,

संपर्क : श्री हर्षद नातू,
१७ ए /बी, एरंडवणे, कर्वे रस्ता, पुणे - ४११ ००४
मोबाईल क्र. - ९४२३५६८८०० टेलिफोन नं. ०२०-२५४४३००३
ई-मेल : jdnatu@yahoo.com

# 'स्व'-रूपवर्धिनी

## कार्यवृत्त २०२३

**संपादक**
श्री. सुनील कुलकर्णी
**संपादकीय मंडळ**
श्री. शिरीष पटवर्धन
सौ. मंजूषा कुलकर्णी
सौ. कोमल धायरकर,
श्री. निखिल लोणकर
**दूरध्वनी संपर्क**
श्री. सुनील कुलकर्णी
भ्रमणध्वनी : ९६०४०१६७१५
संपर्क दूरध्वनी क्र. (घर) ०२०-२६३३६६०९
(वर्धिनी कार्यालय) - ९०११३८६३८६
मासिक कार्यवृत्त किंमत रूपये ५/-
वार्षिक वर्गणी रूपये १००/- (विशेषांकासह)
आजीव सभासद फी - रू.१०००/- फक्त
चेक अथवा ड्राफ्ट 'स्व'-रूपवर्धिनी
या नावाने काढावा.

## अंतरंग

❖ हृद्‌गत
❖ अध्यक्षीय मनोगत
❖ विशेष लेख
❖ विभागशः वार्षिक वृत्त
❖ आर्थिक आवाहन
❖ दैनंदिन शाखा व प्रकल्पांचे पत्ते

❖ **छपाई** - प्रबोध संपदा, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२.
सर्व कायदेशीर बाबी पुणे कोर्टाच्या अखत्यारीत. हे मासिक 'स्व'-रूपवर्धिनी संस्थेच्या मालकीचे असून संस्थेच्या वतीने मुद्रक श्री. प्रफुल्ल कुलकर्णी यांनी प्रबोध संपदा, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे छापून व प्रकाशक श्री. विश्वास विनायक कुलकर्णी, यांनी २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११ येथे प्रसिद्ध केले.

**वार्षिक विशेषांक**

# 'स्व'-रूपवर्धिनी कार्यकारिणी

**सन्माननीय सभासद - ✻ पद्मश्री मा. प्रतापराव पवार ✻ मा. डॉ. प्रमोद चौधरी**

**संस्थापक सदस्य**

| | | |
|---|---|---|
| ✻ कै. पु. व. श्रॉफ | ✻ कै. दत्तोबा तांबे | ✻ कै. रा. प. देसाई |
| ✻ कै. कृ. ल. पटवर्धन | ✻ कै. अ. न. गोगावले | ✻ श्री. श्री. शं. सामळ |
| ✻ कै. कां. गि. शहा | ✻ कै. कृ. गो. लवळेकर | ✻ श्री. वा. दे. संचेती |

## विश्वस्त मंडळ

**अध्यक्ष**
पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर

**उपाध्यक्ष**
श्री. उदय गुजर, श्री. शिरीष पटवर्धन, श्री. विवेक सावंत

**कार्याध्यक्ष**
प्रा. डॉ. संजय तांबट

**सहकार्याध्यक्ष**
श्री. पराग लकडे, श्री. किशोर सोंडूर

**कार्यवाह**
श्री. विश्वास कुलकर्णी

**कोषाध्यक्ष**
श्री. विलास कुलकर्णी

**सहकोषाध्यक्ष**
श्री. सुमित डोळे

**सहकार्यवाह**
श्री. विनोद बिबवे (शाखा विभाग)
श्री. अमोल उंदरे (युवा आणि व्यावसायिक विभाग)
डॉ. विनेश नगरे (विस्तार प्रकल्प)
सौ. मंजूषा कुलकर्णी (महिला विभाग)

**सदस्य** - श्री. अजय कदम (प्रशासन आणि आस्थापना)
डॉ. सौ. मनिषा नारकर (वर्धिका आणि युवती विभाग)

**विश्वस्त मंडळाचे मानद सदस्य**

| | | |
|---|---|---|
| ✻ श्री. रामभाऊ डिंबळे | ✻ श्रीमती पुष्पा नडे | ✻ पद्मश्री श्री. मिलिंद कांबळे |
| ✻ श्री. अविनाश धर्माधिकारी | ✻ डॉ. श्री. भूषण पटवर्धन | ✻ एअर मार्शल(निवृत्त) श्री. प्रदीप बापट |

**निमंत्रित सदस्य**

✻ श्री. अशोक शिवले (विस्तार प्रकल्प) ✻ श्री. अरविंद केळकर ✻ श्री. अद्वैत कुलकर्णी
✻ श्री. निलेश धायरकर (युवा) ✻ श्री. शुभम जगताप (शाखा) ✻ श्री. करण पाटील (विज्ञान तंत्रज्ञान)
✻ श्री. माधव दाबके (संस्था संपर्क) ✻ श्री. चंदन हायगुंडे (स्पर्धा परीक्षा केंद्र)
✻ श्री. मंदार पोफळे ✻ सौ. दीपाली थोरात ✻ सौ. किरण राठी-भट्टड ✻ सौ. शिल्पा पोफळे-केळकर



**पंजीकृत न्यास रजि. नं.एफ/१६९४, पुणे. सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट नोंदणी क्र. :** MAH/588/Pune/80
**फॉरिन कॉन्ट्रीब्युशन रेग्यु. ॲक्टनुसार नोंदणी क्र.०८३९३०२६० PAN No. : AAATS 5461K**


संपर्काचा पत्ता : - 'स्व'-रूपवर्धिनी, २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११०११.
दूरध्वनी : - (कार्यालय) - (०२०) २६१२१७०४, मो. :९०११३८६३८६
भ्रमण दूरध्वनी क्र. ९८२२६७५७६५ (श्री. शिरीष पटवर्धन), ८६००१०१३०७ (श्री. विश्वास कुलकर्णी), ९८५०२०८००९(मंजूषा कुलकर्णी),९०२९०७४५२१(श्री. निलेश धायरकर),९८५०९०४२७६(श्री. अरविंद केळकर)
ई-मेल : wardhinee@gmail.com वेबसाईट : http://www.swaroopwardhinee.org

**धनादेश 'स्व'-रूपवर्धिनी या नावाने काढावेत.**

We have updated 80G, 12A, CSRI, FCRA certificates as per charity commissioner, Ministry of Corporate Affairs and Ministry of Finance's requirements for the trust.

## अंतरीच्या रामाकडून समाजातील रामाकडे...

**– डॉ. संजय विष्णू तांबट,** कार्याध्यक्ष

'स्व'–रूपवर्धिनीच्या कामाचे वार्षिक निवेदन आपणा सर्व सुहृदांपुढे कार्यवृत्ताच्या रुपाने सादर करत आहोत. आपणा सर्वांच्या सहकार्याने, आर्थिक पाठबळामुळे संस्थेला याही वर्षी आनंद वाटेल असे काम करता आले आणि त्यासाठी आम्ही आपले अत्यंत ऋणी आहोत. गेल्या वर्षीच्या प्रारंभी वर्धिनीच्या प्रारंभीच्या तुकड्यांमधील आम्हा काही युवक–युवतींकडे विश्वस्त म्हणून संस्थेच्या कामाची जबाबदारी सोपविण्यात आली. स्व. किशाभाऊंनी पुण्याची मध्य वस्ती व पेठांमध्ये काम सुरू केले, तेव्हा ते पुढे नेण्यासाठी कार्यकर्त्यांची फळी त्यातूनच उभी रहावी, असा त्यांचा मनोदय होता. सायंकालीन शाखांपासून ते विविध प्रकल्पांमध्ये मनुष्यघडणीचा हा आग्रह सातत्याने राहिला. सहभागी सर्वांकडेच छोट्या–मोठ्या उपक्रमांची जबाबदारी सोपवत नियोजनपूर्वक ते सांभाळण्याचे प्रशिक्षण ही वर्धिनीच्या कामाची रीत आहे. त्यामुळे कार्याध्यक्षांपासून ते शाखेवरील गटनायकांपर्यंत आम्ही सर्व वर्धिनीचे विश्वस्त आहोत, अशीच आमची भावना आहे.

बारा मुलांनिशी सुरू झालेले वर्धिनीचे काम आता अनेक अंगांनी विस्तारले आहे. केवळ 'शाळेनंतरची शाळा' असे तिचे अनौपचारिक शिक्षणाचे स्वरूप न राहता बालवाडी, बालशाखा, महिलांना विविध प्रकारचे प्रशिक्षण, ग्रंथालय, फिरती विज्ञान–तंत्रज्ञान प्रयोगशाळा, स्पर्धा परीक्षा केंद्र, वस्ती अभ्यासिका अशा अनेकविध उपक्रमांमधून समाजातील गुणवत्तेचा शोध घेऊन तिला योग्य दिशा देण्याचे काम वर्धिनी करते आहे. 'करी आमुची मायभूमी महा' असे रोजच्या प्रार्थनेत म्हणताना त्यासाठी स्वतःला व सहकाऱ्यांना घडवण्याची प्रक्रिया या सर्वच उपक्रमांतून घडत असते. संस्था आणि संघटनेचे कार्य असे एकरूप होणे, हे वर्धिनीचे एक वैशिष्ट्य आहे. कार्यवृत्तातील माहिती व निवेदने वाचताना आपल्याला त्याची प्रचीती येईल. चऱ्होली येथील बहुउद्देशीय कौशल्य प्रशिक्षण केंद्राची वास्तू आणि तिथे सुरू झालेले नवे अभ्यासक्रम हे वर्धिनीच्या विस्ताराचेच एक पाऊल आहे. आणखी एक आनंददायी गोष्ट यावर्षी घडली. कात्रज परिसरातील गुजरवाडी येथे ओम्कार न्यास या नावाने काम करणारी विश्वस्त संस्था आहे. या संस्थेच्या सर्व विश्वस्तांनी एकमताने हा न्यास 'स्व'–रूपवर्धिनी न्यासात विलीन करण्याचे ठरवले. यासाठीची सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाली असून मा. चॅरिटी कमिशनर पुणे यांनी हा न्यास वर्धिनीमध्ये विलीन केल्याचे अधिकृतरीत्या जाहीर केले आहे.

'स्व'–रूपवर्धिनीच्या कामाचा असा 'क्रमशः विकास' होत असताना त्या त्या वेळी पुढे आलेल्या समस्यांच्या सोडवणुकीसाठी कार्यकर्ते पुढे आले. त्यातून नवे उपक्रम सुरू झाले आणि त्यातील काहींचे प्रकल्पात रुपांतर झाले. मात्र, या विस्तारातून कार्यदिशेच्या आणि त्यासाठी आवश्यक मनुष्यबळ व संसाधनांच्या पूर्ततेच्या समस्याही उभ्या राहतात. विकास तर आवश्यक आहे; मात्र तो नियोजनपूर्वक आणि योग्य दिशेने होईल, याची दक्षता बाळगणे आवश्यक आहे. त्यासाठी संस्था म्हणून वर्धिनीच्या अल्प व दीर्घकालीन कार्यसंकल्पांसंबंधी आम्ही सर्व जण सामूहिक विचारमंथन करत आहोत. शाखा व प्रकल्पांचे कार्यकर्तेही त्यांच्या जबाबदारी व कार्यक्षेत्राच्या अंगाने त्याचा विचार करत आहेत.

अशा कोणत्याही भविष्यवेधी विचारांसाठी आवश्यक टप्पा म्हणजे सध्याच्या स्थितीचा आढावा. त्या दृष्टीनेच वर्धिनीने २०२३ च्या दीपावलीच्या सुटीत 'स्व-रूपदर्शन महाशिबिरा'चे आयोजन केले. फुलगाव येथील नेताजी सुभाषचंद्र सैनिकी विद्यालयाच्या प्रांगणात हे तीन दिवसांचे महाशिबीर झाले. वर्धिनीच्या सर्व शाखा व उपक्रमांमधील आतापर्यंत सहभागी झालेल्या सर्वांपर्यंत पोचण्याचा व जास्तीत जास्त संख्या त्यात उपस्थित करण्याचा प्रयत्न झाला. या महाशिबिराची उभारणी, विविध व्यवस्था, कार्यक्रमांचे नियोजन कार्यवाह रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली अतिशय समर्थपणे करण्यात आले. या निमित्ताने जुन्या-नव्या युवक-युवतींच्या शक्तीचा मेळ घातला गेला आणि वर्धिनीच्या सुप्त शक्तीचे स्व-रूपदर्शन झाले. पुढच्या कार्यसंकल्पांच्या पूर्ततेसाठी ते निश्चितच महत्त्वाचे ठरेल.

अयोध्येत रामजन्मभूमीवर झालेली भव्य मंदिराची उभारणी आणि तिथे झालेली रामलल्लाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा हा सर्वच देशवासीयांच्या दृष्टीने अभिमानाचा क्षण आहे. मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम हे समाजातील सर्व घटकांना जोडणारे आणि शक्ती व भक्तीचे प्रतीक आहे. १९८० च्या दशकात सुरू झालेल्या मंदिरनिर्मितीच्या आंदोलनात वर्धिनीच्या कार्यकर्त्यांचा सातत्याने सहभाग राहिला आहे. राष्ट्रीय विचार व शक्तींना बळ देणाऱ्या सर्व प्रकारच्या अभियानांमध्ये वर्धिनीचा सहभाग यापुढेही कायम राहील. समाजाच्या सर्व स्तरांमधील गुणवत्तेचा शोध आणि तिच्या विकासासाठी योग्य वातावरण व संधी उपलब्ध करून देणे हे वर्धिनीचे स्थापनेपासूनच गाभ्याचे काम राहिले आहे. त्या दृष्टीने 'राममंदिर ते राष्ट्रमंदिर' हा मा. पंतप्रधानांच्या संदेशातील विचार प्रत्यक्षात आणण्यात आपला खारीचा वाटा राहील, यासाठी आपण सर्व प्रयत्न करू. कोणतेही राष्ट्र हे स्वतःला 'एक जन' मानणाऱ्या लोकांचा विशाल समूह असतो. भारतीय संविधानातील उद्देशिकेत व्यक्त केलेल्या अपेक्षेप्रमाणे या राष्ट्राची एकता आणि एकात्मता प्रवर्धित करणारी बंधुता समाजात सर्व दूर पसरवण्यासाठी आपण प्रयत्न करत राहू. म्हणूनच या पुढचा आपला सामूहिक प्रवास 'अंतरीच्या रामाकडून समाजातील रामाकडे' यासाठी संकल्पपूर्वक प्रयत्न करू यात.

---

## मुखपृष्ठाविषयी थोडेसे...

**'संघटन में शक्ती है' या उक्तीला सार्थ ठरविणारे अनेक प्रसंग, अनेक घटना संघटनात्मक कामात अनुभवास येतात. एखादे मोठे ध्येय डोळ्यासमोर ठेवून त्या दिशेने सर्वांनी एकत्रित पावले टाकीत पुढे जायचे आणि कितीही अडथळे, संकटे आली तरी त्यावर मात करत ठरवलेले ध्येय गाठायचेच यासाठी संघटनेचा पाया भक्कम असावा लागतो. याचाच प्रत्यय राममंदिराच्या उभारणीत आला. विशेष लेखात उल्लेख केल्याप्रमाणे राममंदिर हे तर राष्ट्रमंदिर हे आपण अनुभवले.**

**संघटनेतील प्रत्येकाचे एकमेकावरील प्रेम, विश्वास, आपुलकी, कामावरील नितांत निष्ठा आणि समर्पण या सर्वांची सुरेख वीण घट्ट होत गेली की मार्ग सुकर होतो. असाच अनुभव आला तो वर्धिनीच्या महाशिबिरातही. यावर्षीचे महाशिबिर म्हणजे वर्धिनी परिवाराच्या एकत्रित संघशक्तीचे दर्शनच जणू. मुखपृष्ठाची कल्पना यावरच आधारित आहे.**

## तळटीपांविषयी...

**सदर कार्यवृत्तातील सर्व पानांवरील तळटीपा 'स्फूर्तीगान' या पुस्तकांच्या संग्रहातील 'संघटन' विषयावर आधारित संकलित केल्या आहेत.**


**कृतिचा धरिला तू गोवर्धन लावुन त्याला कोटी बाहुबल। मातृभक्तिच्या सेतूवरुनी स्वर्ग जिंकण्या वीर धावतिल ।।**

# अध्यक्षीय मनोगत

**– पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर**

मागे वळून पाहताना सन २००३ मध्ये वर्धिनीच्या 'रौप्य महोत्सवी' कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून आलो असताना कै. किशाभाऊंची झालेली पहिली भेट आजही आठवते आणि आता तीच वर्धिनी 'सुवर्ण महोत्सवाकडे' वाटचाल करीत आहे, ह्याचे खूप कौतुक वाटते.

कै. किशाभाऊंनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना मांडलेले विचार खूप अर्थपूर्ण आहेत. ते आपल्यात नसले तरी कल्पना करूयात की ते आजही आपल्या कामाकडे लक्ष देऊन बघत आहेत. ते म्हणतायत,
'मी पाहतो आहे १९७९ साली लावलेल्या वर्धिनीच्या रोपट्याची वाढ कशी होत आहे. निगा राखता राखता या रोपट्याची संघटना कशी वाढते आहे?'

आपले काम कसे असले पाहिजे हे सांगताना ते म्हणतायत, 'रोजच्या कामात आनंद शोधता का ? आनंद दिला की वाढतो. नव्या कल्पना, नवे उपक्रम, भरपूर काम आणि व्यस्त दिनक्रम, असा मी जगलो; तुम्ही तसं जगा. अशा जगण्यात काय मजा असते अनुभवून तर बघा.'

भारत बदलत आहे. पण या नव्या भारताकडे नवे विचार, नव्या कल्पना असतील तर तो अजून समृद्ध होईल. आणि महत्त्वाचे म्हणजे, 'ही सारी धडपड आहे समृद्ध समर्थ भारतासाठी. या धडपडीला सर्वांची साथ असायलाच हवी. भारत माता जगद्गुरुच्या स्थानी बसायलाच हवी.'

खूप सोपा आदेश आपल्याला किशाभाऊंनी दिला आहे. आपले पंतप्रधान हेच म्हणतात, 'सबका साथ, सबका विश्वास, सबका विकास.' आपण सर्वांनी मिळून काम करूयात आणि त्यामुळे आपली भारत माता जगद्गुरुच्या स्थानी असेलच.

आज आपल्यासमोर असलेल्या अनेक प्रश्नांवर मार्ग शोधताना मला माझ्या शाळेतल्या म्हणजे युनियन हायस्कूल मधल्या विज्ञान शिक्षक भावे सरांनी दाखवलेल्या प्रयोगाचा प्रभाव जाणवतो. सरांनी बहिर्वक्र भिंगाचे नाभीय अंतर मोजून दाखवण्यासाठी सूर्यप्रकाशात एका कागदाचा तुकडा घेऊन प्रकाशमान बिंदू त्या कागदावर येईपर्यंत भिंग वर खाली हलवलं आणि नंतर भिंग तसंच धरलं तर कागद जळायला लागला. त्या वयात आश्चर्यच वाटलं. पण सर तेव्हा म्हणाले होते की, 'तू सुद्धा तुझी शक्ति एकाग्र केलीस तर जगातील कुठलीही गोष्ट साध्य करू शकशील. जगातील कोणतीही गोष्ट अशक्य नाही.' विज्ञानाच्या या शक्तीने मी ठरवून शास्त्रज्ञ झालो. आणि तुमच्यातील सगळ्या शक्ती केंद्रित करा आणि यशस्वी व्हा, हे ही शिकलो.

बौद्धिक संपदा (पेटंट), कॉपीराईट असे शब्द आपल्या कानावर वारंवार पडत असतात. आपल्या देशातील पारंपारिक ज्ञानावर आपल्या देशाचा सर्वप्रथम हक्क असला पाहिजे. यासाठी २५ वर्षांपूर्वी हळद विषयक पेटंटची लढाई आम्ही लढलो आणि जिंकलोही. यामागे घरात अनुभवलेल्या घटनेचा प्रभाव आहे. एकदा घरात अचानक जखमी झालेला पक्षी येऊन पडला, त्याच्या पंखाना मार लागला होता. माझी आई पटकन घरात गेली

आणि तिने पाण्यात हळद कालवून त्याा पक्षाच्या पंखावर लावली. त्याामुळे त्याालाा थोडा आराम मिळाला, पण दोन तासानंतर त्याने प्राण सोडला. तेव्हा आईचे शब्द आजही आठवतात, 'प्रत्येक जीवित वस्तू माझ्यासाठी जवळची आहे'. ह्याच संस्काराने मला देशापुढील अनेक समस्यांवर काम करण्यास बळ दिले. यासाठी प्रत्येक विषयातील नाविन्य शोधण्याची सवय आपल्याला लागायला हवी. हे कसे शक्य होईल, तर आपण वेगवेगळ्या विषयांवरची पुस्तकं वाचली, लेख वाचले तर. प्रत्येकाने आपल्या व्यस्त दिनक्रमातून वेळ काढून अवांतर वाचन केलेच पाहिजे. याचे प्रतिबिंब आपल्या कामातून दिसते.

त्याचप्रमाणे मला वाटतं की आपण हे करू शकतो कारण 'स्व'–रूपवर्धिनी देशविकास वर्धिनी, समाज विकास वर्धिनी, कृतीवर्धिनी आणि विचारवर्धिनी आहे. 'राष्ट्रोन्नती एक मात्र ध्यान हे चालू दे' हे किशाभाऊंचे आवडते गीत मार्गदर्शक मानून त्यांनी दाखवलेल्या शिक्षणाच्या ध्रुव ताऱ्याला निश्चित करून आपल्याला विकासाचे काम करायचे आहे.

आपण नुकतेच इंडिया@७५ साजरे केले. त्याावर मी खूप ठिकाणी बोललो आहे पण इंडिया@७५ ऐकतो, बघतो, अनुभवतो पण भारत@७५, त्याचं काय? हा विचार प्रखरतेने व्हायला हवा कारण आजही ७०% जनता खेड्यात राहते. शहरातील सहा व्यक्तींपैकी एक व्यक्ती झोपडपट्टीत राहते. दहापैकी दोन व्यक्ती अशिक्षित आहे. पाच पैकी एक व्यक्ती दारिद्र्यरेषेखाली आहे. ही परिस्थिती दुर्लक्षित करून चालणार नाही. या समाजासाठी जागरुकतेने काम व्हायला हवे. त्यामुळे 'स्व'– रूपवर्धिनीचे काम खूप मोलाचे आहे.

**आपल्या कामाचा सेवा, स्वावलंबन, संस्कार, संघटन, शिक्षण आणि समर्पण हा पाया आहे. आणि तो पक्का होणे जास्त आवश्यक आहे. तरच आपण भविष्यातला संतुलित सुसंस्कृत, सुविद्य, समृद्ध ,सुशिक्षित, सुशासित आणि सुरक्षित भारत बघू शकू.**

मला वाटतं आज कास्टलेस – जात रहित व क्लासलेस – वर्गरहित, उच्च नीच वर्गरहित समाज सगळीकडे दिसायला पाहिजे. स्त्रियांचा सहभागही वाढला पाहिजे. बदलणाऱ्या भारतासाठी नवीन तंत्रज्ञानाची जोड व उत्तमतेसाठी क्षमता संवर्धन ही आवश्यक आहे आणि परत एकदा किशाभाऊंनी पाहिलेल्या स्वप्नांची आठवण करूया. मी पाहतो आहे १९७९ साली लावलेल्या वर्धिनीच्या रोपट्याची वाढ कशी होत आहे वृक्ष की वटवृक्ष.......!



## चतुररत्न व्यक्तिमत्त्व - पुरुषोत्तमभाई श्रॉफ

**- श्री. शिरीष पटवर्धन,** उपाध्यक्ष

२०२४-२५ हे वर्ष 'स्व'-रूपवर्धिनीचे संस्थापक अध्यक्ष कै. पुरुषोत्तम वल्लभदास तथा पुरुषोत्तमभाई श्रॉफ यांच्या जन्म शताब्दीचे वर्ष आहे. उद्योग जगतातील आणि शैक्षणिक क्षेत्रातील एक ख्यातनाम व्यक्तिमत्त्व म्हणजे पुरुषोत्तमभाई श्रॉफ. जन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा वेध घेणारा हा लेख.

'स्व'-रूपवर्धिनीची स्थापना करताना कै.किशाभाऊ पटवर्धन सरांनी ज्या ज्या व्यक्तींशी अनेकदा चर्चा केली, आणि काम सुरु केल्यावर प्रत्यक्ष सहयोग घेतला त्यामध्ये कै.पुरुषोत्तमभाई यांचे नाव अग्रस्थानी होते. कै.पुरुषोत्तमभाई हे उद्योग व्यवसाय क्षेत्रातील प्रतिथयश उद्योजक तर होतेच पण ते कै.किशाभाऊ यांचे रा.स्व.संघातील सहकारी मित्र होते त्यामुळे वर्धिनीच्या कामातून काय साध्य करायचे आहे हे कार्यकर्ता म्हणून त्यांना माहिती होते. त्यामुळे स्थापनेपासून कै. पुरुषोत्तमभाई हे वर्धिनीचे अध्यक्ष या नात्याने काम पाहू लागले. या पिढीतील कार्यकर्त्यांच्या स्वभावातील एक छटा समान होती आणि ती म्हणजे ही माणसं टोकाची जिद्दी होती. एखादा विषय डोक्यात शिरला, करायलाच हवं असं त्यांच्या मनाने घेतलं की मग वेळ, काळ, वय अशी कोणतीच बंधन त्यांना रोखू शकत नव्हती आणि त्यामुळे झपाटल्यासारखी ही माणसं कामं करीत राहायची.

कै.पुरुषोत्तमभाई यांचा संगमब्रिज जवळील DEMCO कारखाना Textile, Sewing Threads, Yarn Processing, यासाठी प्रसिद्ध होताच. त्यासाठी वेगवेगळे प्रयोग आणि संशोधन हे तर त्यांच्या केबिन मध्ये पहायला मिळायचेच पण याच केबिन मधून शिक्षण क्षेत्रातील नव्या प्रयोगांनाही जन्म मिळत होता. Thread Industry या त्यांच्या उद्योग क्षेत्रातील त्यांच्या तज्ज्ञतेचा सन्मान तत्कालीन राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग यांच्या हस्ते झाला होता. Thread Industry प्रमाणे त्यांनी Chemicals, Steel Transport अशा वेगळ्या विषयातही यशस्वी व्यवसाय केला. वयाच्या ८५ व्या वर्षापर्यंत म्हणजे आयुष्याच्या अगदी शेवटच्या क्षणापर्यंत ते सतत कोणत्या ना कोणत्या नव्या कामाचा विचार करत आणि मनात रुंजी घालत असलेले काम प्रत्यक्ष उभे करण्यासाठी वय विसरून आश्चर्यकारक उर्जेने काम करीत होते.

शिक्षण क्षेत्रातही त्यांच्या दूरदृष्टीचा लाभ अनेक शिक्षण संस्थांना झाला. पुण्यातील महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, शिक्षण प्रसारक मंडळी, ज्ञानप्रबोधिनी अशा नामांकित शिक्षण संस्थांना त्यांनी अनेक वर्षे आपल्या कर्तृत्वाचा, ज्ञानाचा, समाजातील संपर्काचा फायदा मिळवून दिला. कर्वे स्त्री शिक्षण संस्थेमध्ये पदाधिकारी असताना नानावटी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, कॉलेज ऑफ आर्किटेक्चर तसेच फॅशन डिझायनिंग क्षेत्रातील SOFT (school of fashion technology) हे त्यांच्या दूरदृष्टीतून सुरु झाले आणि नावारूपाला आले. शि.प्र. मंडळी या संस्थेत सुद्धा त्यांनी सुरु केलेले नारळकर इन्स्टिट्युट तसेच मुंबई येथील व्यवस्थापन विषयातील ख्यातनाम वेलिंगकर इन्स्टिट्युट सुरु करून नावारूपाला आणण्यासाठी त्यांनी अविरत मेहनत घेतली.

शिक्षण संस्थांप्रमाणेच सामाजिक आणि धार्मिक संस्थांमध्येही पुरुषोत्तमभाई तेवढेच सक्रीय होते. नाथद्वारा टेम्पल ट्रस्ट बोर्डाचे पदाधिकारी तर वृंदावन येथील रामकृष्ण मिशन सेवाश्रमचे ते एक हक्काचे सहाय्यकर्ते होते. कास्प, पुना क्लब, पुना गुजराथी बंधू, बारा न्याती मंडळ, मोड मित्र मंडळ अशा अनेक संस्थांमध्ये ते अखंड कार्यरत होते.

'स्व'-रुपवर्धिनी सुरु झाल्यावर नव्याने सुरु होणारे काम जागेवाचून अडू नये म्हणून मंगळवार पेठेतील, बारणे रस्त्यावरील आपल्या एका छोट्या कारखान्याची शेड त्यांनी वापरायला दिली आणि त्यामुळे ठरल्या दिवशी वर्धिनीचे काम सुरु होऊ शकले. हळू हळू काम वाढायला लागले तशा नव्या कल्पनाही पुढे येऊ लागल्या. अशा सर्व नव्या योजना साकारताना जशी संगम पुलावरील त्यांचा कारखाना ही वर्धिनीची हक्काची जागा होती तशी

सुरुवातीची आर्थिक चणचण कामाला जाणवणार नाही याचीही काळजी पुरुषोत्तमभाई घेत असायचे.
आज न्यू एज्युकेशन पॉलिसीमध्ये विद्यार्थ्यांना शालेय वयातच उद्योग व्यवसाय क्षेत्रांची ओळख व्हावी असे आग्रहपूर्वक सुचवण्यात आले आहे. हा विषय वर्धिनीमध्ये कै. पुरुषोत्तमभाई यांच्या आग्रहामुळे खूप आधी म्हणजे ३५-४० वर्षे आधीच प्रत्यक्षात आला होता. त्यावेळच्या वर्धकांसाठी सुका मेव्याची विक्री, घरगुती वापरायच्या अनेक वस्तू, दिवाळीच्या निमित्ताने लागणाऱ्या अनेक वस्तू यांची विक्री करण्याचा उपक्रम घेतला होता. त्या वेळचे स्क्रीन प्रिंटींगचे तंत्र मुलांना आत्मसात व्हावे म्हणून एका शिबिराचा विषयच तो केला होता. असे अनेक प्रयोग उपक्रम घडवून आणण्यामध्ये कै. पुरुषोत्तमभाई हे कायम किशाभाऊंच्या बरोबर असायचे.
कै. पुरुषोत्तमभाई यांचे वाचन चतुरस्र होते. घरी आणि कारखान्यात कधीही गेलं तर त्यांच्या हातात एखादे तरी नवीन पुस्तक दिसायचे. पुरुषोत्तमभाई हे जरी मागच्या पिढीचे प्रतिनिधी होते तरी तंत्रज्ञानाच्या वापरात ते अद्ययावत होते. २०१० साली त्यांच्या दोन शस्त्रक्रिया झाल्या होत्या. पहिली शस्त्रक्रिया झाल्यावर रुग्णालयात त्यांना जेव्हा भेटायला गेलो होतो तेव्हा त्यांच्या हातात किंडल होते आणि त्यावर ते एका पुस्तकाचे वाचन करीत होते. संस्कृत हा त्यांचा आवडीचा विषय होता आणि असंख्य सुभाषिते त्यांना मुखोद्गत होती. आपल्या नातवंडांना भेटायला ते अनेकदा विदेशात जायचे. त्या प्रवासात नवे तंत्रज्ञान जवळून पहाणे, समजावून घेणे हा त्यांचा स्वभाव होता. कॅलक्युलेटरपेक्षा वेगाने तोंडी हिशेब करण्याचे कौशल्य त्यांचेकडे होते.
काळाच्या ओघात वर्धिनीचे काम विस्तारले. विस्ताराच्या प्रत्येक टप्प्यावर किशाभाऊ आणि पुरुषोत्तमभाई हे जोडीने आणि संपूर्ण उर्जेने कार्यरत असायचे. वर्धिनीच्या कामात समाजातील कर्तृत्ववान माणसे वर्धिनीला जोडली जावी यासाठी किशाभाऊ आणि पुरुषोत्तमभाई प्रयत्नशील असायचे. श्री.जयसिंहभाई मरिवाला हे वर्धिनीच्या कामाशी जोडले जावे यासाठी मुंबईत एक छोटा कार्यक्रम झाला होता. श्री.जयसिंहभाई मरिवाला यांना वर्धिनीचे काम करणारी कोण कोण माणसं आहेत हे बघायचं होतं. सर्वांशी बोलायचं होतं. या कार्यक्रमाला श्री.जयसिंहभाई मरिवाला यांचे काही स्नेही सुद्धा आले होते. या कार्यक्रमात ज्या क्षणी मरिवाला यांनी कामाशी जोडले जायला संमती दिली, त्या क्षणी कै. पुरुषोत्तमभाई यांनी घोषणा करून वर्धिनीचे अध्यक्षपद त्यांना देऊ केले.
वर्धिनीचे काम हळूहळू वाढत होते. या वाढीचा आनंद जसा होता तशी आर्थिक गणिते सतत बदलत होती. नव्या संधी दिसत होत्या. विद्यमान प्रकल्प उपक्रम याचा विस्तार खुणावत होता. वर्धिनीमध्ये सुरु असलेल्या गरजू महिलांसाठीच्या उद्योग शिक्षण वर्गातून अतिशय उत्साह वाढेल असे अनुभव येत होते. हे काम खूप वाढायला हवं हे जाणवत होतं. कै.किशाभाऊ आणि त्यांच्या मनामध्ये अनेक वर्षे गरजू मुली-महिलांसाठी स्वतंत्र इन्स्टिट्युट सुरु करण्याची योजना होती. वर्धिनीसाठी एखादी नवी कल्पना साकारावी असे त्यांच्या मनात होते. त्यासाठी चऱ्होली येथे जागा मिळवण्याचे प्रयत्न सुरूही होते. काही अडचणी येत होत्या. अशा वेळेला पुरुषोत्तमभाई यांनी चऱ्होली येथील स्वत:ची एक एकर जागा दानपत्राने वर्धिनीच्या नावे केली. या जागेवर त्यांच्या आणि किशाभाऊंच्या मनात असलेला गरजू महिलांसाठीचा प्रकल्प आज प्रत्यक्ष उभा राहिला आहे. किशाभाऊंचे २००४ साली तर २०१० साली पुरुषोत्तमभाईंचे वृद्धापकाळामुळे दु:खद निधन झाले.
एखादी योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी या दोघांनी जवळपास तीन दशकांहून अधिक काळ जे कष्ट घेतले त्यामुळे आज वर्धिनी नावारूपाला आलेली आहे.
**जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने कै.पुरुषोत्तमभाई श्रॉफ यांना संपूर्ण 'स्व'-रूपवर्धिनी परिवाराचे विनम्र अभिवादन.**

विशेष
लेख

## श्रीराम मंदिर हे तर राष्ट्र मंदिर..!

**– श्री. प्रशांत पोळ**

– (लेखक बी.ई.ऑनर्स (इलेक्ट्रॉ. ॲण्ड टेलिकॉम.), एम.ए.(मराठी) आहेत तसेच दिशा कन्स्लटंट्स आणि भारती वेब (प्रा.) लि. या कंपन्यांमध्ये डायरेक्टर आहेत. त्यांनी लोकमत, तरुण भारत, विवेक, एकता इत्यादीमध्ये स्तंभलेखन केले आहे. त्यांच्या 'ते १५ दिवस' या पुस्तकाला मध्य प्रदेश शासनाचा साहित्य अकादमी पुरस्कार मिळालेला आहे. तसेच 'भारतीय ज्ञानाचा खजिना', 'विनाशपर्व', 'हिंदुत्व-विभिन्न पहलू, सरलता से...!' ही त्यांची पुस्तके प्रकाशित झाली आहेत.)

पौष शुद्ध द्वादशी, अर्थात सोमवार २२ जानेवरी २०२४ ला, अयोध्येत नवनिर्मित भव्य मंदिरात श्रीरामांच्या विग्रहाची प्राणप्रतिष्ठा झाली. देशाच्या इतिहासाला कलाटणी देणारा हा प्रसंग, जगभरातील कोट्यावधी लोकांनी बघितला. ऑनलाईन बघण्याचे सारे विश्वविक्रम मोडले गेले. आसेतू हिमाचल, भारताच्या सर्व शहरांमध्ये आणि सहा लाखांपेक्षा जास्त गावांमध्ये हा दिवस, कोणत्याही उत्सवापेक्षाही जास्त उत्साहाने साजरा झाला..!

हे सारं अद्भुत आहे. अभूतपूर्व आहे. कल्पनेच्याही पलीकडचं आहे. भारताच्या हजारों वर्षाच्या इतिहासात, सारा देश एका दिलानं, एका स्वरात हुंकार भरतोय, हे घडलेलं नव्हतं. ते २२ जानेवारीला, श्रीराम मंदिराच्या पुनर्बांधणीच्या रुपानं घडलं. आणि म्हणूनच ते सर्वार्थानं ऐतिहासिक आहे.

या श्रीराम मंदिराच्या निमित्ताने सारा देश, एकाच भावनेने बोलू लागलाय हे महत्त्वाचं आहे. जाती-पंथांचे सर्व अडथळे मोडून काढत उत्तर-दक्षिण सारखे भौगोलिक भेदाभेद बाजूला ठेवत, या देशानं आपल्या जबरदस्त एकजुटीचं दर्शन घडवलंय. सारं जग भारताच्या ह्या एकत्रित शक्तीला, या प्रस्फुटित झालेल्या तेजाला, स्तिमित होऊन बघत राहिलंय.

जगाला कोडं पडलंय, की विभाजनवादी मानसिकतेत अडकलेला हा देश, अचानक कसा काय बदलला ?

हे सर्व अचानक झालेलं नाही. श्रीरामाच्या मंदिरासाठी केलेला साडेपाचशे वर्षांचा रक्तरंजित इतिहास यामागे आहे. वास्तविक स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तरी हे व्हायला हवं होतं. श्रीराम या देशाचे आराध्य आहेत. राष्ट्रपुरुष आहेत. त्यांच्या जन्मस्थानावरचं त्यांचं मंदिर, इस्लामी आक्रांतांनी पाडलं होतं. त्याची पुनर्बांधणी करायला हवी होती. त्या निमित्ताने या देशाला स्वतःचा असा सूर गवसला असता. पण ते झालं नाही. होणारही नव्हतं.

पराकोटीच्या तुष्टीकरणावर विश्वास ठेवणारे राज्यकर्ते दिल्लीत बसले होते. त्यामुळे स्वातंत्र्यानंतरही राम मंदिरासाठीचा लढा चालूच राहिला. दुर्दैवानं, सत्ताधाऱ्यांच्या हटवादीपणामुळे, हा लढाही रक्तरंजित झाला. मात्र संविधानाच्या चौकटीला ईश्वरासमान मानणाऱ्या भारतीयांचा, आपल्या न्यायव्यवस्थेवर पूर्ण विश्वास होता. आणि न्यायालयात जन्मभूमीवर श्रीरामांचं मंदिर होतं हे सिद्ध झालं अन् मंदिराच्या पुनर्निर्माणाचा मार्ग प्रशस्त झाला.

मात्र हा प्रवास सोपा नव्हता. आपल्या इतिहासाला विस्मृतीत ढकलून दिलेल्या भारतीयांना जागं करणं कठीण होतं. त्यामुळे गेल्या तीस-चाळीस वर्षांच्या सततच्या जनजागरणाचा परिणाम म्हणजे सुगमतेनं साकारलेलं हे भव्य श्रीराम मंदिर !

या संपूर्ण प्रवासात भारतीयांचं 'स्वत्त्व' जागृत झालं. आणि हेच फार महत्त्वाचं आहे. आम्ही आमच्या 'स्व'ला विसरलो होतो. आधी आलेले इस्लामी आक्रांता आणि नंतर इंग्रज. यांच्यामुळे आम्हाला आमचा धर्म, आमच्या परंपरा, आमची जीवनशैली, त्याज्य वाटू लागली. आम्ही आमच्याच भाषेचा, संस्कृतीचा, परंपरांचा उपहास करायला लागलो.

याचा परिणाम होणारच होता. ज्या देशाला आपल्या भाषेचा, संस्कृतीचा, जीवनशैलीचा अभिमान नसतो, त्याला जग सुद्धा किंमत देत नाही. भारताची वैश्विक पातळीवर सतत उपेक्षा आणि अवहेलना होत गेली. जागतिक पटलावर भारताचा विकास दर इतका कमी होता, की त्याला ''हिंदू ग्रोथ रेट'' म्हणून उपहासाने संबोधलं गेलं. इतक्या प्रचंड लोकसंख्येच्या आपल्या देशाला, जगाच्या राजकारणात आणि जागतिक घडामोडींमध्ये काही स्थानच नव्हतं.

अर्थात आपण असे नव्हतो. हे आक्रांता भारतात येईपर्यंत आपण जगातली सर्वात मोठी आर्थिक शक्ती होतो. सर्वात समृद्ध आणि वैभवशाली देश होतो. प्रोफेसर अंगस मेडिसन ह्या जागतिक कीर्तीच्या अर्थशास्त्रातील तज्ज्ञाने अनेक पुस्तकं लिहिली आहेत. त्यातल्या वर्ल्ड हिस्टरी ऑफ इकॉनोमिक्स मध्ये त्यांनी पुराव्यासहित वेगवेगळ्या देशांची, वेगवेगळ्या कालखंडात जागतिक व्यापारातील टक्केवारी दिली आहे. प्रोफेसर अंगस मेडिसिन यांनी लिहिल्याप्रमाणे, पहिल्या शतकात जगात होणाऱ्या व्यापाराचा एकूण ३२.८% व्यापार एकटा भारत करत होता. आपण जगातले सर्वात मोठे निर्यातक होतो. दहाव्या शतकातही, जागतिक व्यापारात आपला वाटा हा ३२% होता.

एकूणात काय, आपल्याला आपल्याच क्षमतेचा, ताकदीचा आणि कर्तृत्वाचा विसर पडला होता. श्रीराम मंदिर आंदोलनाच्या निमित्ताने तो परत गवसला गेला. परवाच्या २२ जानेवारीच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या रूपात आपल्याला दिसले ते ह्या 'स्व'चे विराट स्वरूप..!

पण आता पुढे काय ? श्रीराम मंदिराचे पुनर्निर्माण हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. मैलाचा एक दगड आहे. मात्र हे साध्य नाही. प्रवासात आलेला हा टप्पा ओलांडून, अधिक क्षमतेनं पुढे जायचंय. यासाठी आदर्श आहेत - प्रभू श्रीराम.

श्रीराम हे साक्षात ईश्वराचे, श्रीविष्णूंचे अंश. त्यांनी मनात आणलं असतं तर चमत्कार घडवून, सहजरित्या रावणाला परास्त केलं असतं. मात्र त्यांनी ते केलं नाही. तसं केलं असतं, तर आर्यावर्तातील सर्वसामान्य जनतेला वाटलं असतं की पुढेही रावणासारखा एखादा दहशतवादी, आपला आतंक समाजात पसरवू लागला तर ईश्वर परत अवतार घेतील आणि त्या असूरी प्रवृत्तीचा विनाश करतील. सर्वसामान्य नागरिक काहीच करणार नाहीत. ते निष्क्रिय होतील. आणि ही परिस्थिती कोणत्याही स्वस्थ आणि सुदृढ समाजासाठी योग्य नाही. म्हणूनच श्रीरामांनी, सीतेचं हरण रावणानं केलेलं आहे हे निश्चित झाल्यावरही, ना अयोध्येहून मदत मागितली आणि नाही मिथिलेहून. सीता ही फक्त श्रीरामांची पत्नी नव्हती. ती इश्वाकू कुलाची सून होती. चंडप्रतापी राजा जनकाची कन्या होती. पण अयोध्या आणि मिथिला यांच्या चतुरंग सेनेसह श्रीरामांनी रावणाशी सामना करून त्याचा विनाश केला असता, तर सर्वसामान्य नागरिकांचा त्यात सहभाग राहिला नसता. श्रीरामाला हे नको होतं.

आणि म्हणूनच त्यांनी वनात राहणाऱ्या सर्वसामान्य लोकांचं संघटन केलं. त्यांची सेना उभारली. त्यांना प्रशिक्षित केलं. आणि या सर्वसामान्यांच्या सेनेसह रावणाशी सामना केला.

**कितीही बलशाली आणि बलाढ्य अशी असूरी शक्ती असू दे, जर सर्वसामान्य नागरिकांची संघटित शक्ती निर्माण झाली, तर अशा दानवी शक्तींना संपवता येतं, हे श्रीरामांनी सिद्ध करून दाखवलं. आणि म्हणूनच या श्रीराम मंदिराची प्रेरणा घेऊन, सामान्य जनतेच्या एकजुटीतून बळकट राष्ट्र मंदिराचे निर्माण, हे पुढील लक्ष्य असले पाहिजे.**

दिनांक २२ जानेवारीच्या, अयोध्येत झालेल्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात, सरसंघचालक डॉक्टर मोहन भागवतांनी याचं सुंदर विवेचन केलंय. त्यांनी म्हटलं, ''ज्या धर्माच्या रक्षणासाठी श्रीरामांचं अवतार कार्य झालं, त्या धर्माला अनुकूल असं आपलं आचरण आहे का?'' श्रीरामांचा जसा सहज, स्वाभाविक व्यवहार निषादराज गुहशी होता, शबरीशी होता, हनुमान, सुग्रीव सकट वनात राहणाऱ्या सर्व प्रजातींशी होता, तसा समरसतेचा आपला व्यवहार आहे का? आणि नसेल तर आपल्याला आपल्या आचरणात आणावा लागेल. नागरिक म्हणून आपण कर्तव्यांशी बांधिल आहोत. अधिकार त्यानंतर येतात. आज मात्र आपण अधिकारांसाठी जागृत असतो पण कर्तव्य विसरतो. श्रीरामाच्या रामराज्यातील नागरिक हे प्रामाणिक, साधे, सरळ आणि कष्टाळू होते. **जे रामराज्य आणण्यासाठी श्रीराम मंदिराचा लढा उभारला गेला, ते रामराज्य प्रत्यक्षात आणणं हे नागरिकांचं कर्तव्य आहे, फक्त राज्यकर्त्यांचं नाही.** आणि म्हणूनच, रामराज्याच्या दिशेने जाणारा श्रीराम मंदिराचा टप्पा पार पडलाय. कोट्यावधी भारतीयांच्या 'स्व'चं जागरण ही झालंय. **आता या 'स्व'ला प्रत्यक्षात आणणं हा पुढचा टप्पा आहे. स्वभाषेचा आग्रह, स्वभाषेतून शिक्षणाचा आग्रह, आपल्या चांगल्या परंपरांचा आग्रह, स्वधर्माचा आग्रह, अगदी स्वभाषेत स्वाक्षरी करण्याचा आग्रह...**

आपण जर हे करू शकलो, प्रामाणिकपणे कष्ट करून आपलं शिक्षण, आपला व्यवसाय करू शकलो, तर आपला देश वैभव संपन्न बनेलच, पण समाजातही रामराज्य निर्माण होईल. श्रीराम मंदिराच्या निर्माणाच्या निमित्ताने आपल्याला बळकट राष्ट्र मंदिर उभारता येईल, हे निश्चित..!

# 'स्व'-रूपदर्शन महाशिबिर २०२३

भाळी आपल्या असे लागला, टिळा वर्धिनीचा
गर्जून सांगू सर्वांना, हा आहे अभिमानाचा ।
भान हरपुनी किती खेळलो, मैदानी खेळ
रंगात असता, डाव नेमकी, संपायाची वेळ ।
अमूल्य क्षण हे, सारे पुन्हा, कसे परतायाचे
एकची उत्तर आहे याचे, काम करावे वर्धिनीचे ॥१॥

शाखेच्या मैदानी शिकलो, मोल संघ-शक्तीचे
गप्पा, गाण्यामधूनी रुजले, भाव देशभक्तीचे
जाणवते मम मनास आता, मोल या कामाचे
एकची उत्तर आहे याचे, काम करावे वर्धिनीचे ॥२॥

कुणी अनुभवी थोर घेती, अभ्यासाचे तास
सहज त्यातूनी, आमच्या जागे, मनी आत्मविश्वास
उमगले ना, कसे रुजविले, बीज या कामाचे
एकची उत्तर आहे याचे, काम करावे वर्धिनीचे ॥३॥

वर्धकाघरी भेटी जाता, अनुभव वात्सल्याचे
मनी आमुच्या, नकळत रुजले, मोल समरसतेचे
समर्थ राष्ट्रासाठी घडवू, दर्शन ऐक्याचे
एकची उत्तर आहे याचे, काम करावे वर्धिनीचे ॥४॥

अभ्यासाचे दौरे आणिक, बहू योजना कामाच्या
किती तुडवल्या अनवट वाटा, गडकोटांच्या किल्ल्यांच्या
नकळत शिकलो, आम्ही यातून, काम कसे ते करावे
एकची उत्तर आहे याचे, काम करावे वर्धिनीचे ॥५॥

शिबिरांच्या त्या आठवणींनी, भरून येतो ऊर
जन्मभरीच्या मैत्रीचे हे, इथेच जुळले सूर
घडविले आम्हाला त्यांचे, पांग कसे फेडावे
एकची उत्तर आहे याचे, काम करावे वर्धिनीचे ॥६॥

– श्री. शिरीष पटवर्धन

## ‘स्व’-रूपदर्शन महाशिबिर साकारताना...

**– श्री. शिरीष पटवर्धन,** उपाध्यक्ष

वर्धिनी स्थापन झाल्यापासून गेल्या ४३ वर्षांमध्ये शेकडो निवासी शिबीरं संपन्न झाली आहेत. प्रत्येक शिबिरात कायम आठवणीत रहावे असे काही ना काही घडत असते. अगदी व्यक्तिगत मैत्रीचे बंध घट्ट विणणारे क्षण जसे असतात तसे संस्था म्हणून प्रेरणा जागवणाऱ्या काही घटना, प्रसंगही घडत असतात. या ४३ वर्षांमध्ये लहानाचे मोठे झालेले आणि शिक्षणाचा टप्पा पूर्ण झाल्यानंतर व्यावहारिक जगामध्ये प्रवाहित होत धावपळ आणि व्यस्तता या चिमट्यामध्ये अडकून पडलेल्या युवक युवतींची संख्या खूप मोठी आहे. जेव्हा हे व्यावसायिक आणि सांसारिक गटातील युवक युवती भेटतात तेव्हा त्यांच्या मनात वर्धिनी अजून कशी जपलेली आहे याची अनुभूती येते. त्याला कारणही तसे आहे. वर्धिनीमध्ये जी प्रार्थना या सगळ्यांनी वर्षानुवर्षे म्हटली, त्यामधील **‘‘तुझे अंश आम्ही, तुझ्या पूजनाचे पहा दिव्य हे ध्येय स्वीकारले, पुन्हा जन्म घेऊ स्वराष्ट्रास ध्याऊ, प्रतिज्ञेस या तूची साक्षी राहा’’** या संकल्पाच्या ओळी आठवत राहातात आणि हा संकल्प साकारण्यासाठी आपल्याला वर्धिनीच्या कामात कसं सक्रीय होता येईल याचा विचार मनात चालू राहतात.

वयाने मोठ्या असलेल्या या वर्धक वर्धिका, सर्व प्रकल्पांमध्ये आज सहभागी असलेले वेगवेगळ्या वयोगटातील विद्यार्थी अशा सगळ्यांचं एकत्र शिबिर घेता येईल का असा विचार गेल्या काही वर्षांपासून कार्यकर्त्यांच्या आणि विश्वस्तांच्या मनात रेंगाळत होताच. २००३ साली वर्धिनीच्या रौप्य महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने त्यावेळी शक्य असलेली मोठी संख्या डोळ्यासमोर ठेवून सर्वांचे एक एकत्र शिबीर संपन्न झाले होते. साळुंब्रे गावी हे ५०० संख्येचे महाशिबीर संपन्न झाले. संपन्न झाले असे म्हणतोय पण त्या शिबिराचे केलेले नियोजन अचानक कोसळलेल्या मोठ्या पावसामुळे खूप बदलावे लागले. उपलब्ध जागेत होतील अशीच सत्रे घ्यावी लागली. पावसामुळे उभे केलेले तंबू आणि राहुट्या पहिल्याच दिवशी उध्वस्त झाल्या. कार्यकर्त्यांच्या जिद्दीवर याचा परिणाम झाला नाही तरी ऐत्यावेळी कार्यक्रमात कराव्या लागलेल्या बदलांमुळे थोडासा हिरमोड झाला होता, हे मात्र खरं आहे. २००३ नंतर मोठ्या संख्येचे आणि सर्वांचे एकत्रित असे शिबीर झाले नव्हतेच. संस्थापक कै.किशाभाऊ पटवर्धन सरांच्या २०२० साली असलेल्या जन्मशताब्दी वर्षात असे महाशिबीर करावे असा संकल्प कार्यकर्त्यांनी केला खरा पण पुन्हा जगावर कोसळलेल्या कोरोना विषाणूच्या संकटामुळे हा संकल्पही पुन्हा एकदा बारगळला.

या सगळ्या पार्श्वभूमीवर यावर्षी स्वरुपदर्शन महाशिबीर घेण्याचे नक्की करण्यात आले. दिवाळीच्या निमित्ताने शाळा आणि महाविद्यालये यांना सुट्या असतातच. त्यामुळे दिवाळीला जोडूनच हे महाशिबीर घ्यायचे नक्की झाले आणि या संकल्पाला लोकसेवा न्यासाचे संस्थापक श्री.दीपक पायगुडे यांनी प्रोत्साहन देत नेताजी सुभाषचंद्र सैनिकी शाळेची प्रशस्त जागा कोणत्याही अडचणी न सांगता उपलब्ध करून दिली. या महाशिबिराचा सर्वाधिकारी या नात्याने संपन्न झालेल्या या महाशिबिरातील काही महत्त्वाच्या गोष्टी मला येथे मांडाव्या असे वाटते.

**पूर्वतयारी :** या महाशिबिराला सर्व विभागाचे मिळून किमान २ ते ३ हजार जण उपस्थित राहतील असा ढोबळ अंदाज मांडला गेला होता. यामध्ये मुख्य संख्या अपेक्षित होती ती व्यावसायिक युवक युवती यांची. वर्धकांच्या ज्या प्रेरणा शाखा भागश: चालू आहेत त्या शाखांच्या पटावरील सर्वांशी संपर्क होऊन त्यांच्या येण्यासंबंधीची निश्चिती हळूहळू होत गेली. परंतु या शाखांच्या पटावर ज्यांची नावे अजून नाहीत अशी खूप मोठी संख्या जी नित्य संपर्कात नाही त्यांच्याशी संपर्काची रचना लागून सहभाग निश्चित होणं यामध्ये मर्यादा जाणवत होत्या. त्यामुळे हे ३००० तर नाही पण २००० पर्यंत उपस्थितीच शिबीर होऊ शकेल असा अंदाज येऊ लागला व यानुसार निवास व्यवस्था उभी करण्याचा विचार गती घेऊ लागला. तंबू राहुट्यांमध्ये असणारं शिबीर असं आकर्षण असल्याने तंबू राहुट्या देऊ शकतील अशा संस्था/संघटना यांच्याशी संपर्क करून मिळवण्याचे प्रयत्न सुरु झाले. व्यवस्था विभागाची टीम प्रत्यक्ष शिबिर स्थानी जाऊन कुठे कोणत्या व्यवस्था उभ्या कराव्या लागतील, तंबू राहुट्या उभ्या करण्याची रचना कशी करावी याचे नियोजन करू लागली. अर्थ विभागाला अर्थातच अर्थबळ उभे कसे करावे याचे नियोजन मार्गी लावायचे होते. प्रचार प्रसार विभाग अधिकाधिक जणांपर्यंत कसं पोचायचं याचा विचार करून छोट्या छोट्या व्हिडीओ क्लिप्स तयार करून पाठवू लागला. शिबिर गीताचा विचार सुरु झाला. हळू हळू महाशिबिराचं वातावरण तयार होऊ लागलं. महाशिबिराच्या कार्यालयातून रोज काहीतरी हालचाल दिसायला लागली. खरी कसोटी होती ती शिबिराच्या सर्व व्यवस्था ठरल्या वेळी पूर्णत्वाला जाण्याची. त्यातील महत्त्वाचे काम होते शिबीरस्थानी तंबू, राहुट्या, मंडप, पाणी, स्वच्छता, वीज या सर्व व्यवस्था जागेवर वेळेवर उभ्या राहणे. महाशिबीर दिवाळी झाल्या झाल्या दुसऱ्या दिवशी असल्याने या व्यवस्था कशा उभ्या राहणार या विषयी माझ्या मनात थोडी धाकधूक होती पण दिवाळी सुरु होण्याआधी एक दिवस आखणीची जबाबदारी घेणारा गट शिबीर स्थानी जाऊन मैदानावर प्रत्यक्ष त्या त्या जागी सगळी आखणी करून आला. दिवाळीमधील भाकड दिवशी उभारणी करणाऱ्या गटाने एका दिवसात सर्व तंबू, राहुट्या, मंडप याची उभारणी पूर्ण केली, तर स्वच्छता, पाणी आणि वीज या विषयाची जबाबदारी सांभाळणाऱ्या टीमने खात्री दिली की प्रत्यक्ष शिबीर सुरु होताना या सर्व व्यवस्था पूर्ण झालेल्या असतील. महाशिबिराच्या कार्यवाह या व्यवस्थेपासून सर्व व्यवस्था पाहणारे हे एक तर वेगवेगळ्या व्यवसायात असलेले किंवा नोकरी करणारे होते. यामुळे प्रत्येकाची वेळेची कसरत होत होती. दिवाळीच्या तोंडावर व्यवसाय नोकरीमध्ये सुटी मिळणं किंवा वेळ देता येणं अवघडच होतं पण या सर्वांनी ही कसरत करीत आपापल्या व्यवस्था चोख बजावल्या. एक गोष्ट इथे नमूद केली पाहिजे की उभारणीसाठी १३० युवक युवती यांनी येण्याचे मान्य केले होते पण प्रत्यक्षात १६० पेक्षा जास्त कार्यकर्ते आले आणि यामध्ये साताऱ्यातील लक्ष्मी केशव प्रतिष्ठान या वर्धिनीशी संलग्न असलेल्या संस्थेचे युवकही केवळ या कामासाठी आले होते. तयारीसाठी इतक्या जणांना शिबिर स्थानी घेऊन जाण्याची व्यवस्था एखाद्या वाहन व्यवस्था पुरवण्याऱ्या संस्थेकडून गाड्या भाड्याने घेऊन केली असती तर मोठी रक्कम खर्च झाली असती पण कार्यकर्त्यांनी ज्यांच्या ज्यांच्याकडे चार चाकी वाहने उपलब्ध आहेत अशांची सूची करून व त्या सगळ्यांचा सहभाग मिळवून आपल्याच रचनेतून व्यवस्था उभी केली आणि खर्च वाचवला. पैसे वाचवणे हे पैसे मिळवण्या इतकेच महत्त्वाचे असते. हीच गोष्ट शिबिराला लागणाऱ्या किराणा, भुसार याची आहे. आचाऱ्यांकडून मोठी यादी आली होती. युवक विभाग आणि महाशिबिराचा कार्यालय विभाग यांनी हे काम मनावर घेतले. युवक विभागातील अनेकजण मार्केट यार्डमध्ये पोहोचले. अनेक घाऊक व्यापार करणाऱ्या व्यापारी संस्थांना भेटले, आवाहन केलं आणि धान्य देणगी रूपाने गोळा केलं. कार्यालय विभागाने सगळी सूचीच वेगवेगळ्या व्हॉटसूॲप ग्रुपवर टाकली आणि आवाहन केले. अनेक व्यावसायिक युवक युवतींनी त्या यादीतील एकेक गोष्टीचा खर्च उचलायचे मान्य केले आणि स्वत: खरेदी करून संस्थेत पोचवल्या. भाजीची व्यवस्था पाहणारा कार्यकर्ता पहाटे ३.०० वाजता मार्केट मध्ये पोहोचला आणि


कोटि कोटि मम बाहू उभवुन नभ कोसळते अलगद झेलुन ।
विश्वासाचे उष:किरण दिग् दिगंतरी उधळीन ।।

कमीत कमी खर्चात सर्व यादीची पूर्तता केली. या सगळ्या प्रयत्नांमुळे संस्थेचे काही लक्ष रुपये वाचू शकले. याचा आनंद तर आहेच पण **हे करण्यामागील प्रत्येकाची जी आत्मियतेची भावना आहे, जबाबदारीची भावना आहे ती अधिक महत्त्वाची आहे आणि या महाशिबिराने आपली ताकत किती आहे याची अनुभूती दिली.** या सगळ्या धावपळीत शिबिरात प्रत्यक्ष जे कार्यक्रम घ्यायचे होते, व्याख्यान सत्रे, उपक्रम घ्यायचे होते त्यांची जबाबदारी पेलणारा गट अत्यंत शांतपणे आपले काम चोख बजावत होता. त्यांच्यासमोर आव्हान होते ते एकाच वेळेला सुमारे पाच ते सहा ठिकाणी चालणाऱ्या सत्रांसाठी वक्ते मिळवणं. एकेका वक्त्याला भेटून सत्र नक्की करणे आणि त्यांची येण्याजाण्याची व्यवस्था पक्की करणे, हे काम हळूहळू पुढे जात होते आणि प्रत्यक्ष दिवाळी सुरु होण्याच्या टप्प्यावर ही व्यवस्था कागदावर पूर्ण झाली.

**प्रत्यक्ष महाशिबिर घडताना –** १७ ते १९ नोव्हेंबर या कालावधीत हे महाशिबिर संपन्न झाले. १६ नोव्हेंबरला संध्याकाळी ७.१५ वाजता नेताजी सुभाषचंद्र सैनिकी शाळेच्या मैदानावर जेव्हा प्रार्थनेसाठी ९०० शिबिरार्थी उभे राहिले ते पाहून या महाशिबिरासाठी मेहनत घेतलेल्या प्रत्येकाचा ऊर दाटून आला. शिबिरार्थी शालेय गटातील वर्धक वर्धिका PMT बस मधून शिबीर स्थानी पोहोचत होते. शिबिराच्या वाहनतळावर जेव्हा २०–२५ बसेसचा ताफा थांबला होता तेव्हा ते दृश पाहण्यासारखे होते. **या बसेस मधील ड्रायव्हरशी जेव्हा चहापानाच्या निमित्ताने गप्पा झाल्या तेव्हा त्यांच्या प्रतिक्रिया संस्थेच्या कामाचे वेगळेपण या सगळ्यांना कसे समजले आहे याची अनुभूती देणाऱ्या होत्या. या बहुतेकांची प्रतिक्रिया अशी होती की असे शालेय वयोगटातील विद्यार्थी रोजच त्यांच्या बस मधून प्रवास करतात पण त्यांची भांडणे चालू असतात, त्यांच्या तोंडात वेगळीच गाणी असतात, अनेकदा ही मुलं गाडीतील मोठ्या माणसांचा मानही राखत नाहीत. पण आज मात्र आमचा अनुभव वेगळा होता. ही मुलं पण त्याच वयाची आहेत, ही पण गाणी म्हणत होती पण यांची गाणी मनाला आनंद देणारी होती, आपल्या देशाचा अभिमान जागवणारी होती. ही मुलं त्यांना घेऊन येणाऱ्या त्यांच्या ताई दादाचं ऐकत होती, त्यांचा मान राखत होती. हे वेगळेपण जाणवल्यामुळे या सगळ्यांनी 'स्व'–रूपवर्धिनीचं काम समजावून घेतलं आणि या शिबिरात यायची संधी दिल्याबद्दल संस्थेला धन्यवाद दिले.**

**खऱ्या कसोटीची सुरुवात –** कागदावर आखेलेले मैदानी व्यायाम आणि खेळांचे नियोजन, शिबिराच्या मुख्य हेतूला धरून असलेली वेगवेगळ्या वयोगटातील शिबिरार्थीसाठीची व्याख्याने आणि उपक्रम सत्रे ठरवल्यानुसार प्रत्यक्षात होणं ही कसोटी होती. कारण शिबिरस्थळ पुणे शहराच्या बाहेर वाघोली जवळ होते. यामध्ये मैदान विभागाने अनुभवी युवक युवती कार्यकर्त्यांच्या मदतीने मैदानावरचे कार्यक्रम नियोजनानुसार यशस्वी केले. कार्यक्रम विभाग आणि वाहतूक व्यवस्था पाहणारी टीम यांचं ही कौतुक करावं तेवढं कमी आहे कारण एकावेळेला ते ४–५ वक्त्यांना वेगवेगळ्या ठिकाणावरून घेऊन शिबिरस्थानी वेळेवर पोहोचणं ही सोपी गोष्ट नव्हती पण उद्घाटन सत्रापासून समारोप सत्रापर्यंत कुठेही हे नियोजन बिघडलं नाही. वाहतूक व्यवस्था सांभाळणाऱ्या टीमच कौतुक करावं तेवढं कमी आहे. व्याख्यान आणि कार्यक्रम व्यवस्था पाहणारी टीम सुद्धा अतिशय सक्रियपणे रोजच्या कार्यक्रमाचं नियोजन बिघडणार नाही याची काळजी घेत होती.

**महाशिबीर कार्यालय आणि अन्य व्यवस्था –** महाशिबिरात दाखल होणारा प्रत्येकजण आधी महाशिबिराच्या कार्यालयात जायचा. त्याची नोंद, त्याला ओळखपत्र देणं ही सगळी कामं सांभाळणारी टीम २४ तास कार्यालयातच असायची आणि दर काही तासांनी शिबिरात उपस्थित असलेल्यांच्या नोंदीचा आकडा कार्यालयाबाहेरील फलकावर लिहिला जायचा. पाणी व्यवस्था, वीज व्यवस्था, स्वच्छता व्यवस्था, सुरक्षा व्यवस्था आणि भोजन व्यवस्था पाहणाऱ्या टीमला प्रत्यक्ष शिबिरातील कार्यक्रमांचा आनंद घ्यायला सवडच

नव्हती इतके ते आपापल्या कामात व्यग्र होते. या सगळ्यांची थोड्या वेळासाठी भेट व्हायची ती फक्त महाशिबीर कार्यवाहांनी बोलावलेल्या रोज रात्री होणाऱ्या बैठकीत. ही बैठक रात्री ११ च्या नंतरच व्हायची पण यावेळी रोज झालेल्या कार्यक्रमांची उजळणी व्हायची, कमतरता, दुरुस्त्या यावर चर्चाही व्हायची आणि ताण मोकळा करणारे हलके फुलके विनोदही घडायचे.

महाशिबिराच्या एकूण कार्यक्रमाचे नियोजन सांगण्यासाठी जेव्हा संस्थेच्या अध्यक्षांची म्हणजे डॉक्टर माशेलकर यांची भेट संस्थेचे कार्यवाह आणि शिबिर समितीने घेतली तेव्हा १९ तारखेला सकाळी १० वाजता समारोप सत्र आहे आणि ते आपणच घ्यावे अशी विनंती त्यांना करण्यात आली. ती तारीख आणि वेळ ऐकल्यावर ते म्हणाले अरे तुम्ही मोठी जोखीम पत्करली आहेत. १९ तारखेला भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यामधील जागतिक क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना आहे. यामुळे शिबिरात उपस्थित राहण्याच्या संख्येवर नक्की परिणाम होऊ शकतो. पण प्रत्यक्षात जेव्हा डॉक्टर माशेलकर शिबिरस्थानी पोहोचले तेव्हा शिबिरात उपस्थित असलेल्यांचा आकडा १४०० चा टप्पा ओलांडून पुढे गेला होता. वर्धिनीच्या कामावर असलेलं प्रेम, कामामागच्या विचारावर असलेली निष्ठा यामुळे अशा मोहाच्या क्षणांवरही मात करता येते याची ही अनुभूती होती.

शिबिराची फलश्रुती : अगदी नेमक्या शब्दात ही मांडायची तर मी असं म्हणेन की

**आपल्यातील जिद्दीचं दर्शन घडवणारं**
**आपल्यातील कल्पकतेला गतिमान करणारं**
**आपल्यातील संघटन कौशल्याला फुलवणारं**
**''संघटन में शक्ती है''ची अनुभूती देणारं**
**तीन चार पिढ्यांना एकत्र कामाची संधी देणारं**
**विस्तारणाऱ्या परिवाराला एकत्र बांधणारं**
**'स्व'–रूपाची ओळख करून देणारं असं हे स्वरूपदर्शन महाशिबिर सुफळ संपन्न झालं.**

**पुढे काय ?** – या महाशिबिराने काम करणाऱ्या टीमचा उत्साह तर नक्कीच वाढवला आहे. वर्धिनीच्या सर्व विद्यमान उपक्रम, प्रकल्प यात सहभागी असलेल्यांना आपला विस्तार किती मोठा झाला आहे याचे दर्शन घडवलं आहे अशा जमेच्या अनेक बाजू आहेतच. पण या शिबिराने काही गोष्टी लक्षात आणूनही दिल्या आहेत ज्याकडे आगामी काळात जाणीवपूर्वक लक्ष द्यावे लागेल. त्यातील पहिली गोष्ट म्हणजे व्यावसायिक गटात ज्यांचा समावेश आहे अशा वर्धक वर्धिका यांची संख्या खूप मोठी आहे आणि त्या तुलनेत प्रत्यक्ष महाशिबिरात आलेल्या या गटातील उपस्थितांची संख्या पुरेशी नव्हती. याचा अर्थ या गटासाठीचा संपर्क वाढायला हवा. या गटातील अनेकांचा चालू असलेल्या किंवा नजीकच्या भविष्यात सुरु होणाऱ्या नव्या नव्या उपक्रमात प्रत्यक्ष सहभाग कसा वाढेल यासाठी काम करावे लागेल. दुसरी गोष्ट म्हणजे संस्थेचे सर्व उपक्रम सर्वांना नीट माहिती होतील अशी नित्य कामात ओळख नीट रुजवणारे काही कार्यक्रम उपक्रम योजावे लागतील. अनुशासनाचे नियम सर्वांना लागू आहेत आणि अशा प्रसंगात उपस्थित असणारे लहान मोठे सर्वजण हे अनुशासन पाळतात हे कुणालाही सहज दिसेल इतके अनुशासन आमच्यामध्ये मुरायला हवे. अशा अनेक गोष्टी आहेत ज्यावर आगामी काळात विचार आणि कृती कराव्या लागतील. भविष्यात, अगदी म्हणायचं तर संस्थेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने जेव्हा अशा एखाद्या महाशिबिराची योजना ठरेल तेव्हा अशा त्रुटी दूर झालेली प्रचंड विस्तार झालेली 'स्व'–रूपवर्धिनी समाजाला प्रत्यक्ष दिसेल अशी आशा वाटते.

# केंद्रीय कार्यक्रम



# क्षण अभिमानाचे



# गणेशोत्सव


केसरी गणेशोत्सव
'स्व'-रूपवर्धिनी
पथनाट्य
शिवशयांशी आठवावे
धनकवडी : फाइव्ह स्टार मित्र मंडळाने सामाजिक विषयावर आधारित जिवंत देखावा सादर केला आहे.
Oxyrich

# शाखा विभाग



उत्कृष्ठ शाखा चषक उत्साहात संपन्न

# समुपदेशन विभाग



# युवा विभाग

## युवक शिबिर २०२३



# स्पर्धा परीक्षा केंद्र









# हातात हात घालूनी, हृदयास हृदय जोडूनी...

**– श्री. रविंद्र चव्हाण**

१९९२ साली समर्थ रामदास शाखेत यायला सुरुवात केली त्यावेळेस मी इ. ७ वीमध्ये होतो. समर्थ रामकृष्ण शाखा, स्वामी योगानंद शाखा, स्वामी विवेकानंद शाखा या शाखांची पायाभरणी या सुरुवातीच्या काळात सुरू होती ज्यात आम्ही उत्साहाने सहभागी झालो होतो. विविध शिबिरे, सहली, कार्यक्रम यात आम्ही सर्वांनीच लहानपणापासून भाग घेतला. त्यामुळे आमच्या व्यक्तिमत्त्वाचा विविध अंगाने विकास झाला. सहवासातून शिक्षण आणि शिक्षणातून संस्कार हे वर्धिनीचे वैशिष्ट्य आहे. विविध कार्यक्रम, उपक्रम यातून अनौपचारिक पद्धतीने हे मिळाले.

बालपणापासून झालेले संस्कार, आचार–विचारांची जडणघडण हेच आज वैयक्तिक आणि सामाजिक क्षेत्रात काम करताना प्रेरणा देत आहे. पाथर्डी, कोठेवाडी येथे ऊस तोड कामगारांचे पुनर्वसन, नागापट्टनम्, तिरुअनंतपुरम येथील त्सुनामी संकटानंतरचे पुनर्वसन यासारख्या विविध मोहिमांमध्ये सक्रिय भाग घेता आला, ज्यामुळे आम्हा सर्व युवक–वर्धकांची सामाजिक जाणीव समृद्ध झाली. पाथर्डीमध्ये ज्ञापु, सोमनाथसर आणि इतर युवकांसोबत काम करताना आलेला एक अनुभव अजूनही स्मरणात आहे. साधारण चार वर्षाचा मुलगा स्वतःच्या आंघोळीचे पाणी स्वतः आणतो, काळा चहा–भाकरी या नाष्ट्यात समाधान मानणारे लोक, हे स्वतः बघितल्याने समाजाशी कायमची घट्ट नाळ जोडली गेली. यामुळे वर्धिनीचे, समाजाचे काम करण्याची प्रेरणा मिळाली.

महाशिबिर सुरू होण्याआधी साधारण तीन महिन्यांपूर्वी डॉ. संजय तांबट सरांशी सविस्तर बोलणं झालं आणि **महाशिबिराचा कार्यवाह** म्हणून प्रवास सुरू झाला. महाशिबिराचा कार्यवाह म्हणजे सर्व व्यवस्था प्रमुखांचे समन्वय साधणे. ही जबाबदारी स्वीकारली तेव्हा अनेक सहली, शिबिरे आणि कार्यक्रमातील व्यवस्था यांचा अनुभव गाठीशी होता. त्यामुळे महाशिबिर उत्तमच होणार याबद्दल विश्वास वाटत होता. स्व. किशाभाऊंचा साधेपणाचा आणि उत्तमतेचा आग्रह महाशिबिराची रचना लावताना आम्ही सर्वांनी लक्षात ठेवला होता. वर्धिनी म्हणजे उत्तम संघटन. शिबिरात मुख्य जबाबदारी असलेले युवक–युवती तितक्याच ताकदीचे, उत्तम कौशल्य असणारे आणि त्यांच्याशी सुरुवातीपासूनचे नाते घट्ट आणि विश्वासाचे होते. त्यामुळे जबाबदारीचा ताण जाणवला नाही. वर्धिनीचे महाशिबिर ही संकल्पनाच खूप आगळी वेगळी होती कारण या निमित्ताने वर्धिनीच्या सर्व विभागातील कार्यकर्ते, युवक–युवती, वर्धक–वर्धिका, प्रकल्पातील विद्यार्थी–विद्यार्थिनी एकत्र येणार होते. हा संगम घडवून आणणे म्हणजे माझ्यासाठी एक आव्हान आणि सुवर्णसंधीही होती.

या शिबिरातल्या विविध व्यवस्था गटांमध्ये वर्धिनीच्या पहिल्या फळीपासून ते आत्ताच दहावी–बारावी परीक्षा उत्तीर्ण झालेले युवक–युवती होते. सहवासाने वाढलेली मैत्रीची वीण घट्ट असल्यामुळे ताळमेळ साधायला अडचण आली नाही. व्यवस्थांची उभारणी करताना मला आणि अजय दादाला आपण वर्धिनीला जास्त वेळ दिला नाही याची खंत स्पष्टपणे जाणवली आणि ती स्वीकारून यापुढे ही उणीव भरून काढू हा संकल्प मनोमनी करून कामाला सुरुवात झाली.

किशाभाऊ आणि वर्धिनीच्या आर्थिक उभारणीत कार्यरत असणाऱ्या अनेक ज्येष्ठ युवकांचे काम आम्हाला जवळून पाहण्याची संधी या आधी मिळाली होती. त्यामुळे मिळालेला निधी काटकसर करून कसा वापरता येईल आणि समाजाच्या योगदानातून शिबिर पूर्णत्वास कसे नेता येईल याचा विचार आम्ही सतत केला. निलेश, मनोज, शुभम, शिवा सर, अजय सर, रोहिदास सर यांच्या अनेक दिवसांच्या पूर्ण नियोजनातून अनेक व्यवस्था उभ्या राहण्यासाठी मोलाची मदत मिळाली.

माणसं जोडताना जिथे आपली गरज तिथे आपणच पहिले उभे राहू आणि ज्यांची आपल्याला गरज आहे त्यांचं विस्मरण होऊ न देता त्यांना बरोबर घेऊ हे सूत्र अंगीकारून शिबिराच्या व्यवस्था उभ्या राहिल्या. यातून हे लक्षात आलं की आपले देणगीदार, व्यावसायिक युवक, हितचिंतक यांना फक्त कामापुरता संपर्क करून चालणार नाही. आपले विविध कार्यक्रम, सहली, उत्सव अशा कार्यक्रमांचे निमंत्रण त्यांना देणे आवश्यक आहे. त्यांचा सहभाग वाढवणे गरजेचे आहे.

शिबिराच्या निमित्ताने वर्धिनी परिवाराची ताकद, वर्धिनीच्या संस्कारात घडलेला आचार-विचारांनी समृद्ध असा युवा गट आणि संघटन 'याची देही याची डोळा' पाहण्याची संधी मिळाली. या निमित्ताने अनेक उद्दिष्टे साध्य झाली आहेत. जसे वर्धिनीच्या पुढील पाच वर्षाच्या संकल्प मांडणीला सुरुवात झाली. शाखांमध्ये व वर्धिनीच्या विविध प्रकल्पांमध्ये मदत करण्यासाठी उत्सुक असणारे अनेक हितचिंतक व माजी वर्धक-वर्धिका यांची यादी तयार झाली. व्यावसायिक युवक पुन्हा शाखेशी जोडला गेला.

नवीन जुन्या युवा शक्तीची सांगड घालून संपन्न झालेल्या या शिबिरातून अनेक अविस्मरणीय प्रसंग, क्षण आजही डोळ्यांसमोर येत आहेत. पूर्ण आणि पूर्व नियोजनाची आजही मोठ्या प्रमाणावर गरज भासत आहे. **भौतिक देखाव्यापेक्षा साधेपणानेही उद्दिष्ट साध्य होते हे या निमित्ताने परत अधोरेखित झाले.** शिबिराचा कार्यवाह म्हणून सुरू झालेला प्रवास आजही तो सुरूच आहे असंच वाटत आहे. शिबिर पूर्ण होऊन दोन महिने झाले. मनात शिबिराच्या आठवणी, शिबिराबद्दल काही विचार आणि पुढे काय ? यावर मनात विचारांचे काहूर माजले आहे. त्यामुळे माझ्यासाठी शिबिर अजून संपलेलेच नाही.

## स्व-रूपदर्शन महाशिबिर सेवेकरी निर्माणाचा महायज्ञ

**– श्री. शुभम जगताप**

''परिसरातल्या अणुरेणूतुन, अविरत वेचूनी तेजाचे कण, रसगंधाशी समरस होऊनी, हृदयकमल फुलवावे,
विकसित व्हावे, अर्पित होऊनी जावे ।।''

स्व. किशाभाऊ आणि त्यांच्या सवंगड्यांना वर्धिनीचा हा वटवृक्ष उभा करताना कधी पाहिले नव्हते, पण त्यांनी घडविलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या सहवासातून त्यांच्या संस्कारांची, सत्कार्याची आणि समर्पणाच्या ऊर्जेची प्रचिती नेहमीच अनुभवायला येत होती. निस्वार्थ-निष्काम-कर्मयोग या शब्दांचा प्रत्यक्ष अनुभव देणारे अनेक उपक्रम वर्धिनीच्या सहवासात होत असतात. त्यापैकीच आयुष्यातील अविस्मरणीय उपक्रम म्हणजे महाशिबिर, जिथे लहानांपासून वृद्ध कोणत्याही पदाचा, विचाराचा मनाचा भेद न बाळगता सह कुटुंब नांदत होती. या शिबिराचा **महाशिबिर प्रमुख** म्हणून काम करण्याची संधी वर्धिनी आणि देवाने दिली त्याबद्दल मी कृतज्ञ आहे.

शिबिराविषयी सहवास, शिक्षण, संस्कार, सेवा, संघटन, समर्पण या आयामांमध्ये मनोगत व्यक्त करण्याचा प्रयत्न.

**सहवास –** 'शिवरायांसी आठवावे रूप, शिवरायांचा आठवावा प्रताप, शिवरायांचा आठवावा साक्षेप, भूमंडळी!' रयतेचा राजा असे प्रेरणादायी चरित्र प्रत्यक्ष जगण्यासाठी शिबिराची निवास आणि उभारणी रचना केंद्रस्थानी. छ. शिवराय तेजस्वी सूर्य आणि सूर्यकिरणे पसरतात त्याप्रमाणे निवासाच्या राहुट्यांची आणि सभा मंडपाची रचना केली होती. सुरुवातीला १५० हून अधिक युवा कार्यकर्ते या शिबिर उभारणीला आले. अनेकांनी पहिल्यांदाच हा अनुभव घेतला. शिबिराच्या सुरुवातीला तुळापूरहून शिबिरस्थानी मशाल फेरी काढण्यात आली आणि सर्वांनी एकत्रित शिववंदनेतून स्वराज्याची शपथ सर्वांनी घेतली. प्रत्येक सभामंडपात वर्धिनी भक्कम आणि बहुआयामी होण्यासाठी ज्यांनी सर्वस्व अर्पण केले अशा सामान्यातील असामान्य व्यक्तींची माहिती फलके लावण्यात आली.

त्याविषयी चर्चा आणि प्रश्नोत्तरे सत्रे घेण्यात आली. अनेक अनुभवांनी समृद्ध असलेल्या वरिष्ठ व्यावसायिक युवांशी शिबिरार्थींचा संवाद घडवून आणण्यात आला. अगदी मोठी भावंडे छोट्या भावंडांची काळजी घेतात त्याप्रमाणे सर्व गटशिक्षकांनी एकमेकांना आधार देत शिबिराचा सर्व दिनक्रम पाळला होता. प्रत्येक व्यवस्थेला अनुभवी वरिष्ठ युवा असल्याने त्यामधील सूक्ष्म नियोजन करून आवश्यक त्या रचना उभारणीस खूप मदत झाली.

**संस्कार आणि शिक्षण –** 'निर्माणोके के पावन युग में हम चरित्र निर्माण न भूले, स्वार्थ साधना की आँधी में वसुधा का कल्याण न भूले...' शिबिरात अनेक मान्यवर व्यक्ती विद्यार्थ्यांशी संवाद चर्चा आणि मार्गदर्शन करण्यासाठी आले. वयोगटानुसार त्यांची विभागणी केली होती. लहान गट (५–७ वी), मोठा (८–१२ वी), युवा गट (सर्व व्यावसायिक आणि वरिष्ठ युवा, प्रकल्प कार्यकर्ते), युवती आणि महिला गट अशा गटाने सर्व शिबिर चालू होते. प्रत्येकी ३००+ संख्या असल्याने त्यांची स्वतंत्र व्याख्याने, चर्चा ठिकाणे उभी केली. अध्यक्ष मा. माशेलकर, उपाध्यक्ष मा. विवेक सावंत, श्री. अविनाश धर्माधिकारी, श्री. सुनील देवधर, श्री. सुहासराव हिरेमठ, श्री. मंदार आगाशे, डॉ. संगीता बर्वे, श्री. नागेश मोने, डॉ. राजीव तांबे, श्री. भालचंद्र पुरंदरे, श्री. राहुल कोकीळ, सौ. आभा भागवत, सौ. वैशाली देशपांडे, श्री. चंद्रशेखर देसाई, श्री. मारुती पडेकर, सौ. अंजली देशपांडे, सौ. साधना सेठिया, सौ. सुवर्णा गोखले, श्रीमती बागेश्री पोंक्षे या सर्वांची सत्रे, मार्गदर्शनपर व्याख्याने खूप छान झाली. सर्व कृतिसत्रे ही सर्जनशील आणि विचार करायला लावणारी, समस्या सोडवणे, सामाजिक जबाबदारी तयार करणे, कृतज्ञता अंगीकारणे करणे आणि क्षमा मागणे याप्रकारची कौशल्ये आत्मसात करणारी होती.

**सेवा, संघटन आणि समर्पण –** 'सेवा है यज्ञ कुंड समिधा सम हम जले, ध्येय महासागर में सरिता रूप हम मिले...' जरी शिबिर ३ दिवसांचे असले तरी याची तयारी मात्र १ वर्षापूर्वीच सुरू झाली होती. दर महिन्याला विविध स्तरावर बैठका, क्षेत्रभेटी, स्थळांची आणि व्यवस्थांची विविध शिबिरांमधून तयारी, व्यवस्था आणि गटशिक्षकांची प्रशिक्षणे, शाखांवर विविध कार्यक्रमांना सहभागाचे आवाहन आणि बरेच काही चालू होते. यामध्ये अनेकांनी सेवा आणि समर्पण स्वरूपात योगदान दिले. शिबिरासाठी धान्य मोहीम केली असता अगदी काही दिवसातच सारे समर्पणातून जमा झाले. प्रत्येक व्यक्तीने आपला वेळ, तन, मन, धन आणि जमेल त्या समर्पित भावनेने केलेल्या योगदानामुळे हे शिबिर खूप छान झाले. अनेकांचा उल्लेख करायला हा लेख अपुरा आहे पण त्यांची कृतज्ञता, 'ध्येय भाव जो मनात, येऊ दे तुझ्या कृतीत। कार्याची कीर्ती ध्वजा, दूर देशी फडकू दे। राष्ट्रोन्नती एक मात्र ध्यान हेच चालू दे। राष्ट्र जीवनात जीव जीवनात पाहू दे।।' किशाभाऊंचे हे पद्य आवडते का असावे याचा प्रत्यक्ष अनुभव या शिबिराच्या रूपाने दिसत होता. प्रत्येकाला शिबिरातून मिळालेला अनुभव हा वर्धिनीच्या भावी काळाच्या उन्नतीसाठी नक्कीच सार्थकी ठरेल. संपूर्ण वर्धिनी परिवार एकत्र आल्यामुळे आपल्यालाच आपल्या शक्तीची ओळख होते आणि संघटनेच्या माध्यमातून जरी वेगवेगळी कामे समाजात करीत असलो तरी उद्देशाने अभिन्न आहोत याची जाणीव करून राष्ट्रउन्नतीचे ध्यान मात्र अविरत चालू राहील. प्रत्येक व्यक्ती विभाग त्यांच्या कार्यक्षेत्रात कीर्तीध्वजा उभारेल यात शंका नाही. आम्ही मात्र या निमित्ताने खूप अनुभव आणि अविस्मरणीय क्षण साठवून पुढच्या अनेक शिबिरांना आणि उपक्रमांना सज्ज झालो. या शिबिराच्या पूर्णतेमध्ये प्रत्येक सहभागी विद्यार्थी, युवा, हितचिंतक, देणगीदार, सर्वांचे खूप योगदान मिळाले आहे. त्या प्रत्येकाविषयी कृतज्ञता आणि नेहमीप्रमाणे वर्धिनीच्या प्रार्थनेतील ओळींनी भगवंताला प्रार्थना करतो,

पुन्हा जन्म घेऊ, स्वराष्ट्रास ध्याऊ, प्रतिज्ञेस या तुचि साक्षी रहा ।
नमस्कार देवा तुला अमुचा हा, करी आमुची मायभूमी महा ।।

# कार्यालय - शिबिराचा कणा

**– सौ. मेघा नगरे**

वर्धिनीच्या दि. १७ ते १९ नोव्हेंबर २०२३ या कालावधीत होणाऱ्या **महाशिबिराची कार्यालय प्रमुख** म्हणून माझ्यावर सर्व वरिष्ठांनी जबाबदारी दिली. महाशिबिराच्या कार्यालयाचे उद्‌घाटन विभागाचे ज्येष्ठ कार्यकर्त्या श्रीमती पुष्पाताई नडे व कार्याध्यक्ष डॉ. संजय तांबट यांच्या हस्ते झाले. विभागाचे काम श्री. शिरीष पटवर्धन आणि श्री. निशिकांत वाईकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झाले. त्यामुळे प्रत्यक्ष काम करताना आम्हाला पाठबळ मिळाले. श्रीमती नीला कुडलिंगार, पूजा बत्तीन, तुषार काब्दुले, सुरेखा माळी, निशांत शेठे, केदार घाडगे आणि शिबिरस्थळी प्रतिक कडू यांच्यामुळे कार्यालय कामाची गती शेवटपर्यंत राखता आली.

शिबिरासाठी धान्य गोळा करण्यापासून कार्यालय गट कार्यरत होता. वेगवेगळ्या व्हॉटस्ॲप गटांवर यासाठी आवाहन केले गेले आणि बघता बघता जवळपास ८० टक्के सामान वस्तूरूप देणगी स्वरूपात युवक-युवती, हितचिंतक यांच्यामार्फत जमा झाले. विशेष म्हणजे सर्व कार्यकारिणी सदस्य, ज्येष्ठ युवक-युवती, शिबिराचे कार्यवाह श्री. रवी चव्हाण, सर्व सहकार्यवाह यांनी आपले वैयक्तिक कामकाज/व्यवसाय सांभाळून शिबिराचे काम पाहिले याचे मला कौतुक वाटले. हीच खरी वर्धिनीची ताकद आहे हे उमगलं.

फुलगावला १३ नोव्हेंबर रोजी राहुट्या उभ्या करण्यासाठी युवक-युवतींची मोठी ताकद दिसून आली. एका दिवसात सकाळपासून संध्याकाळपर्यंत सर्वांच्या श्रमदानाने ६० राहुट्या व ६ शामियाने मंडप उभे राहिले. कार्यालय विभागात काम करताना धान्य संकलन, तंबू जमवणे व इतर सर्व सामान भांडारामध्ये जमा करण्याच्या अतिशय सुंदर आठवणी मनात दाटून राहिल्या आहेत. कार्यालय हे या शिबिराचे कणा म्हणून काम करत होते. शिबिरात उपस्थित असणाऱ्या प्रत्येकाची नोंदणी करणे, प्रत्येकाला ओळखपत्र देणे ही महत्त्वाची जबाबदारी कार्यालयाकडे होती. व्यवस्था गटाचे साहित्य कमी पडले, सामानाची यादी नीट नसणे, सूक्ष्म नियोजनाचा अभाव इत्यादी उणीवांवर मात करत सर्वांच्या मदतीने शिबिर उत्तम पार पडले.

पहिल्या दिवशी शाखा विभागाच्या मोठ्या संख्येमुळे नोंदणी करताना खूपच कसरत झाली. एकूण १४०० शिबिरार्थींची नोंदणीचे काम शिबिराच्या शेवटच्या दिवसापर्यंत सकाळी ११.३० पर्यंत सुरू होते. रोजचा शिबिरार्थींचा बदलता आकडा दर तासाला शिबिरप्रमुख, भोजन प्रमुखांना कळवला जात होता.

यात सर्वात स्मरणीय घटना म्हणजे संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. रघुनाथ माशेलकर यांची कार्यालय विभागाला झालेली भेट व संवाद. सरांनी आवर्जून ओळखपत्र मागून घेतले. विभागाचे काम व कामाची पद्धत समजून घेतली. साहित्य व धान्य संकलनाचे अनुभव ऐकले आणि कार्यालय गटाचे खूप कौतुक केले.

काही लोक शिबिरात फक्त भेट द्यायला आले होते. तरीही शिबिराचे नियम पाळत त्यांनी शिबिर शुल्क, देणगी स्वरूपात जमा केली. या सर्व गोष्टीतून त्यांचे वर्धिनीवरील प्रेम व आपुलकी दिसून आली. कार्यालय गटाला मोठमोठ्या वक्त्यांसोबत संवाद साधायची संधीही मिळाली. काम करताना काही गोड, कडू अनुभव प्रत्येकाला आले पण शेवटपर्यंत कार्यकर्त्यांचा उत्साह टिकून होता.

शिबिरातला शेवटचा दिवस मात्र डोळ्यात पाणी आणणारा होता. एकेक राहुटी उतरवताना, कार्यालयातील सामान गोळा करताना, साहित्याची यादी करताना खूप वाईट वाटत होते. लहान मुलासारखा हट्ट करावासा वाटला की अजून शिबिराचे दिवस वाढवून द्या, आम्हाला येथे राहू द्या.

माणसे जोडणे, संघटनात्मक काम कसे करावे, प्राप्त परिस्थितीत काम पुढे नेणे ही लाखमोलाची शिकवण शिबिराच्या माध्यमातून मिळाली आणि पुढच्या शिबिराची जबाबदारी घ्यायला प्रेरणा निश्चित मिळाली.

## प्रचार प्रसिद्धी व्यवस्था

**– श्री. प्रतिक जाधव, व्यवस्थाप्रमुख**

आधुनिक तंत्रज्ञानाचा व प्रचार प्रसारमाध्यमांचा वापर करून शिबिराचा उद्देश, माहिती, विविध व्यवस्थांसाठीचे आवाहन, वातावरण निर्मिती तयार करण्यासाठी सर्व सामाजिक, प्रसार-प्रचार माध्यमांचा (सोशल मीडिया) उपयोग झाला. या गटात या क्षेत्रात काम करणाऱ्या १५ वर्धकांचा सहभाग होता.

* यामध्ये प्रसिद्धीसाठी ५ रील्स, १८ पोस्टस्, व ८७ स्टोरीज तयार केल्या. या इन्स्टाग्राम व फेसबुकवरून प्रसारित करण्यात आल्या.
* यातून ऑक्टोबर-नोव्हेंबर या दोन महिन्यात ४१ हजार अकाऊंटस्पर्यंत आम्ही पोहोचलो तर चार हजार दोनशे प्रोफाईल व्हिजीटस् झाल्या. साधारणतः एक महिना आधी नियमित माहिती टाकण्यास सुरुवात झाली. यात प्रामुख्याने शिबिर कालावधी अधोरेखित करण्यात आला. तसेच घोषवाक्ये प्रेरणादायी पद्याच्या ओळी यांचा वापर करण्यात आला. शिबिरासाठी आवाहन करणारे व्हिडिओ, प्रत्येक शाखा व विभागातून करून घेण्यात आले. तसेच शिबिराची तयारी विविध व्यवस्थांचे काम उपलब्धतेनुसार नियमित प्रसारित करण्यात आले.
* वर्धिनी महाशिबिर मेसेंजर्स नावाने गट तयार करून त्यामध्ये वर्धिनीचे सर्व जुने-नवे वर्धक, प्रतिनिधी म्हणून सामील करून घेतले व या प्रतिनिधींमार्फत शिबिराविषयीचा नियमित प्रसार करण्यात आला. त्यामुळे सर्वांपर्यंत हा कार्यक्रम पोहोचवला गेला.
* १ नोव्हेंबर रोजी मा. श्री. शिरीष पटवर्धन यांच्या हस्ते शिबिराचा लोगो गुगल मीटद्वारे प्रदर्शित केला. सरांनी यावेळी शिबिराविषयीचा उद्देश सर्वांसमोर मांडला.
* महाशिबिर कालावधीत महाशिबिरात झालेली सर्व व्याख्याने, विशेष कार्यक्रम, महत्त्वाचे उपक्रम इत्यादीचे नियमित प्रसारित करण्यात आले. विशेष व्याख्याने लाईव्ह आणि रेकॉर्ड करण्यात आली.
* महाशिबिराच्या प्रसिद्धीच्या निमित्ताने आपल्या परिवारातील काही विशेष अतिथी, दिग्दर्शक श्री. दिग्पाल लांजेकर, लेखक श्री. योगेश जाधव सर, चित्रपट अभिनेते श्री. श्रीकांत यादव, डॉ. मनिषा नारकर यांचे सहाय्य मिळाले. यांनी केलेल्या आवाहनाला उत्तम प्रतिसाद मिळाला.
* प्रचार-प्रसिद्धी व्यवस्था म्हणून गटातील प्रत्येकाने मोलाचे योगदान दिले आहे.

– सर्व डीटीपी डिझाईन आणि लोगो – निखिल लोणकर
– व्याख्यानांचे डीटीपी – पवन जाधव
– लोगो launching व्हिडिओ – प्रतिक भिसे
– फोटोग्राफर – ओंकार दासरी, हर्षद पेंढार, ऋतिक बनकर, ओंकार साका
– ड्रोन शॉटस् – चेतन महिंद्रकर
– रील्स – प्रथमेश मातेरे
– लाईव्ह रेकॉर्डिंग – अक्षय मुळे, मोहन कानडे, हितेश चौधरी, ओम इजंतकर
– कंटेंट रिव्ह्यू – दिपालीताई थोरात, सुमित डोळे


ड्रोनच्या दृष्टिक्षेपात शिबिर

## ....आणि महाशिबिरातील बौद्धिक आणि कार्यक्रम विभागाची तयारी सुरू झाली !

**– श्री. पंकज मुंडे**

साधारणपणे जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात वर्धिनीतून विश्वास सरांचा फोन आला आणि त्यांनी मला अगदी सहजपणे सांगितलं. ''पंकज, आपल्या महाशिबिराच्या बौद्धिक आणि कार्यक्रम व्यवस्थेचा प्रमुख म्हणून तू काम पाहायचं आहेस. तू नाही म्हणणार नाहीस याची मला खात्री आहे ! आपण लगेच तयारीला लागू यात.''

खरं तर महाविद्यालयीन शिक्षणानंतर जवळजवळ वीस वर्षे वर्धिनीच्या कोणत्याच मोठ्या कार्यक्रमाची जबाबदारी मी घेतलेली नव्हती. २००१ साली संक्रांत उत्सवाचा प्रमुख म्हणून केलेल्या कामानंतर अन्य बऱ्याच युवकांप्रमाणे मी सुद्धा व्यावसायिक आणि सांसारिक जीवनात गुंतून गेलो. नाही म्हणायला शाखेच्या काही छोट्या-मोठ्या कार्यक्रमांमध्ये नवीन युवकांबरोबर थोडंफार काम केलं. तरीही इतक्या वर्षांनंतर एवढं मोठं काम पेलवेल का हा प्रश्न होताच मनात. पण विश्वास सरांच्या बोलण्यात त्यांचा माझ्यावरचा विश्वास जाणवत होता. त्यांचं फोनवरचं शेवटचं वाक्य होतं : ''आपण लगेच तयारीला लागूयात.'' त्यांनी 'आपण' या शब्दावर जोर दिलेला कळत होतं आणि मी त्यांना 'हो' म्हणालो.

ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीला महाशिबिराची पहिली मोठी बैठक झाली आणि त्यात प्रमुख व्यवस्थांचं वाटप झालं. बौद्धिक विभागाची 'टीम' तयार करणं सुरू झालं. पण कित्येक प्रश्न अजून डोक्यामध्ये घोळत होते.

हजार-दीड हजार शिबिरार्थींच्या शिबिरासाठी विषय काय ठेवायचा ? वर्धक-वर्धिका, महाविद्यालयीन युवक-युवती, व्यावसायिक युवक-युवती, महिला विभाग, अन्य प्रकल्पांमधून येणारे विद्यार्थी-विद्यार्थिनी या सर्वांना आवडतील असे कार्यक्रम कोणते ठेवायचे ? वक्ते कोणकोणते बोलवायचे ? शिबिराचा दिनक्रम कसा आखायचा ? आणि या सगळ्या प्रश्नांसोबत सतत येणारा आणखी एक प्रश्न म्हणजे, सुरुवात कोठून करायची ? विश्वास सरांनी हाही प्रश्न सोडवला. एके दिवशी संध्याकाळी त्यांनी मला MKCL च्या ऑफिसमध्ये बोलावलं. 'तिथे आपल्याला वर्धिनीचे उपाध्यक्ष मा. श्री. विवेक सावंत भेटतील' असं त्यांनी सांगितलं. त्या दिवशी माझ्या सोबत माझा शाखेतला जुना, जवळचा घनिष्ट मित्र मंदारही होता.

सरांना महाशिबिराची कल्पना समजावून सांगितल्यावर त्यांचा चेहरा अजूनच खुलला आणि त्यांनी विचारलं, ''तुम्हाला माझा या शिबिरात सहभाग कसा हवा आहे ?'' एवढी मोठी व्यक्ती एवढ्या आपुलकीने शिबिरातल्या तिच्या सहभागाबद्दल विचारत आहे हे बघून आम्हालाही हुरुप आला.

सरांनी आम्हाला शिबिरातील वेगवेगळ्या गटांसाठी वक्ते आणि विषय शोधण्यास मदत करावी असं आम्ही त्यांना सुचवलं आणि त्यांनी उत्साहाने आमच्याबरोबर विषयांची आणि वक्त्यांची यादी बनवण्यास सुरुवात केली. साधारणपणे ३०-३५ विषय आणि वक्त्यांची नावे त्यांनी आम्हाला सुचवली. आमची अर्ध्या तासासाठी नियोजित केलेली बैठक दीड तास चालली. शिक्षण, तत्त्वज्ञान, अध्यात्म, कॉम्प्युटर, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, योग, प्राणायाम अशा कित्येक विषयातले अनुभव आणि त्यांचे विचार त्यांनी आम्हाला त्या भेटीमध्ये सांगितले. एखाद्या व्यक्तीचा व्यासंग किती मोठा असू शकतो हे त्या दिवशी मला प्रत्यक्ष पाहायला मिळत होतं आणि एवढ्या सगळ्या गप्पांमधून त्यांनी आम्हाला वेगवेगळ्या वक्त्यांची नावे आणि त्यांचे संपर्क क्रमांकही न विसरता दिले.

त्या दिवशी सावंत सरांना भेटून त्यांच्या ऑफिसमधून बाहेर पडलो तेव्हा एक वेगळाच उत्साह जाणवत होता. शिबिरासाठी कोणकोणते विषय असावेत आणि वक्ते कोणते बोलवायचे या प्रश्नांची उत्तरं मिळू लागली होती. पण सगळ्यात मुख्य म्हणजे जे वयाने, अनुभवाने, ज्ञानाने आणि मानाने एवढ्या मोठ्या असलेल्या व्यक्तीचा सहवास आपल्याला मिळाला या आनंदात आमचा उत्साह चांगलाच वाढला होता. शिबिरातील सगळे कार्यक्रम खूप जोरदारपणे पार पडणार याची खात्री पटू लागली होती आणि आमची महाशिबिराची तयारी सुरू झाली.

## असे झाले महाशिबिर – कार्यक्रम पत्रिका

**ठिकाण – नेताजी सुभाषचंद्र बोस सैनिकी शाळा, फुलगाव, पुणे**

| लहान गट | १६ नोव्हेंबर २०२३ | १७ नोव्हेंबर २०२३ | १८ नोव्हेंबर २०२३ | १९ नोव्हेंबर २०२३ |
|---|---|---|---|---|
| ६.२० ते ६.४० | | कथा –<br>शिरीष पटवर्धन | प्रार्थनेचे दुसरे चरण–<br>सुमित डोळे | सहसंवेदना–<br>अरविंद केळकर |
| ११ ते १२ | | उद्घाटन सत्र–<br>श्री. विवेक सावंत | कथाकथन –<br>डॉ. संगीता बर्वे<br>'स्वच्छ' संस्था –<br>श्री. विद्यासागर सोनवणे<br>विज्ञान आणि गणित खेळ –<br>श्री. नागेश मोने | समारोप–<br>डॉ. राजीव तांबे |
| २.३० ते ३.०० | | बालगीते, सेवा गीते | साहस गीते, सेवा गीते | |
| ३.१५ ते ४.४५ | | Creative &<br>Critical Thinking<br>Problem Solving | Build Social<br>Responsibility,<br>Problem Solving,<br>Creative Thinking | शोध बोध व खाजगी समारोप |
| संध्या. ४.४५ ते ६.०० | एकत्रीकरण, नोंदणी.<br>गट परिचय आणि<br>राहुटी सजावट | | | |
| ७.०० ते ८.०० | निवासी गट करणे,<br>गट परिचय,<br>गट सजावट,<br>ओळखपत्र | साहस कथा –<br>श्री. भालचंद्र पुरंदरे<br>युद्ध कथा –<br>श्री. राहुल कोकीळ | कथाकथन –<br>सौ. वैशाली देशपांडे<br>चित्रकला –<br>सौ. आभा भागवत | |
| ९.३० ते १०.३० | विविध कलागुणदर्शन | प्रेरणादायी व्हिडिओ | वर्धक–युवक संगम कार्यक्रम | |

| **युवा गट** | १८ नोव्हेंबर २०२३ | १९ नोव्हेंबर २०२३ |
|---|---|---|
| ६.२० ते ८.०० | एकत्रीकरण | योग प्रशिक्षण – श्री. मारुती पडेकर |
| १०.३० ते ११.३० | सुनील देवधर (ईशान्य भारतातील आव्हाने आणि सामाजिक कार्य) | समारोप –<br>मुलाखत – डॉ. रघुनाथ माशेलकर |
| १२.०० ते १.०० | अविनाश धर्माधिकारी (सामाजिक प्रश्ने व युवकांसमोरील आव्हाने) | |
| १.३० ते २.३० | साधना सेठिया (सहजीवनाच्या उंबरठ्यावर) | |
| २.३० ते ३.१५ | अंजली देशपांडे (सामाजिक कार्यात ठेवायचे भान) | |
| ३.१५ ते ४.४५ | मुलाखत–मंदार आगाशे (UPI आणि अर्थक्रांती) | खाजगी समारोप |
| ५.०० ते ६.०० | बागेश्री पोंक्षे – मुलाखत | |
| ७.०० ते ८.०० | सुहासराव हिरेमठ (संघटन मे शक्ती है) | |
| ९.३० ते १०.३० | वर्धक युवक संगम कार्यक्रम, प्रसंग नाट्य स्पर्धा | |

| मोठा गट | १६ नोव्हेंबर २०२३ | १७ नोव्हेंबर २०२३ | १८ नोव्हेंबर २०२३ | १९ नोव्हेंबर २०२३ |
|---|---|---|---|---|
| ६.२० ते ६.४० | | प्रार्थनेचे दुसरे चरण – सुमित डोळे | कथा – शिरीष पटवर्धन | सहसंवेदना – अरविंद केळकर |
| ११ ते १२ | | उद्घाटन सत्र श्री. विवेक सावंत | व्यसनमुक्त तरुणाईसाठी – श्री. प्रसाद ओक | प्रकट समारोप डॉ. रघुनाथ माशेलकर |
| २.३० ते ३.०० | | चरित्र गीते, सेवा गीते | वीर व साहस गीते, सेवा गीते | |
| ३.१५ ते ६.०० | एकत्रीकरण, नोंदणी, गट परिचय आणि राहुटी सजावट | Creative & Critical Thinking Achievement Motivation | Brainstorming, Problems Solving, Practice Gratitude & Apologizing Skills | शोध बोध व खाजगी समारोप |
| ७.०० ते ८.०० | निवासी गट करणे, गट परिचय, गट सजावट, ओळखपत्र | अनुभवकथन श्री. चंद्रशेखर देसाई | कारगिल युद्धकथा सौ. सुमेधा चिथडे | |
| ९.३० ते १०.३० | विविध कलागुणदर्शन | प्रेरणादायी व्हिडीओ | वर्धक युवक संगम कार्यक्रम | |








## २६ जानेवारी – प्रजासत्ताक दिन

२६ जानेवारी भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त 'स्व'–रूपवर्धिनीच्या वास्तूत श्री. माधव दाबके व डॉ. संजय तांबट यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजवंदनाचा कार्यक्रम संपन्न झाला. श्री. दाबके सरांनी 'गर्जे मराठी' या संस्थेकडून होणाऱ्या समाजोपयोगी उपक्रमांची माहिती दिली. त्याचा लाभ सर्वांनी घ्यावा असे आवाहन केले. बालवाडीच्या मुलांनी भारतमाता, सावित्रीबाई फुले, लता मंगेशकर, रमाबाई, पंडित नेहरु, जिजाबाई, जवान अशा वेशभूषा करून त्या त्या व्यक्तिमत्त्वांची ओळख दर्शवणारी घोषवाक्ये म्हटली.

बिबवेवाडी परिसरातील वर्धिनीच्या राजगड कार्यालयात प्रजासत्ताकदिनी नूतनीकरणानिमित्त भारतमाता पूजनाचा कार्यक्रम वर्धिनीतील सर्व विभाग प्रमुख, प्रकल्पप्रमुख, बिबवेवाडी व पद्मावती भागातील शाखाप्रमुख व शाखेतील युवा कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत झाला. गणेश नगर सोसायटीचे अध्यक्ष श्री. अंबादास सरांच्या हस्ते भारतमाता प्रतिमेचे पूजन झाले. चऱ्होलीच्या कौशल्य विकास केंद्रात प्रजासत्ताक दिन व भारतमाता पूजन कार्यक्रमाची सुरुवात सौ. चारुता कडूरकर यांच्या प्रास्ताविकाने झाली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. केदार नाईक यांचे अतिशय उद्‌बोधक असे मार्गदर्शन झाले.

श्री योगी अरविंद सांस्कृतिक मंचातर्फे वर्धिनीचे ज्येष्ठ मार्गदर्शक स्व. जयंतराव कवठेकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ शालेय विद्यार्थ्यांची सूर्यनमस्कार स्पर्धा १८ जानेवारीला फुलोरा मैदानावर झाली. एकूण २१ शाळांमधील ४२ संघातून ६८० विद्यार्थी – विद्यार्थिनींनी यात भाग घेतला. ४२ परीक्षक, शाळांमधील ८० शिक्षक, कार्यकर्ते आणि सुमारे १०० नागरिक अशा १००० जणांनी या कार्यक्रमाचा आनंद घेतला. या स्पर्धेचा बक्षीस समारंभ २६ जानेवारीला झाला. मा. मालतीताई दात्ये, मा. आमदार माधुरीताई मिसाळ आणि स्व. जयंतराव कवठेकर सरांचे चुलत बंधू श्री. जयंतराव कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

## वर्षारंभ उपासना

चैत्र शुद्ध प्रतिपदा, गुढीपाडवा वर्षारंभाच्या दिवशी दरवर्षी सकाळी ६ वाजता ओंकारेश्वर मंदिरात सर्व कार्यकर्ते सामुहिक उपासनेसाठी उपस्थित असतात. यावर्षी दि. २३ मार्चला गायत्री मंत्राच्या सामुहिक स्वरांनी ओंकारेश्वराचा गाभारा भारून गेला. उपासनेनंतर वर्धिनीचे कार्याध्यक्ष डॉ. संजय तांबट व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत सहसेवा शिक्षण प्रमुख श्री. महेश करपे यांनी वर्धिनीच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

डॉ. संजय तांबट सरांनी नवीन संवत्सराच्या सर्वांना शुभेच्छा देऊन वर्धिनीच्या स्थापनेमागे असणाऱ्या कै. किशाभाऊंच्या उद्देशांना उजाळा दिला. ते म्हणाले, 'कै. किशाभाऊंनी स्वामी विवेकानंद, मा. डॉ. हेडगेवार यांच्या विचारांचा आदर्श घेऊन काम सुरू केले. वर्धिनीतल्या प्रत्येक वर्धकाने, कार्यकर्त्याने स्वतःच्या क्षमता आणि गुणांचा विकास करताना सतत विकसित आणि अर्पित होण्याचा विचार मनात घेऊन कार्यरत राहिले पाहिजे. यामध्ये आपल्या समाजाचा, परिणामतः देशाचा विकास हा उद्देश कधीही विसरता कामा नये.'

श्री. महेश करपे यांनी देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या अमृतमहोत्सवी वर्षातील उपक्रमांचा, देशातील परिस्थितीचा

उहापोह करून पुढील १०० वर्षांकडे बघताना त्यातील आपल्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याचे योगदान कसे असावे हे स्पष्ट केले. ते म्हणाले, 'कै. किशाभाऊंनी स्वतःच्या अनुभवातून, प्रेरणेतून व कार्यमग्नतेतून सतत कार्यरत राहण्यासाठी दिलेला मंत्र व सांगितलेले तंत्र आपण कायम स्मरणात ठेवले पाहिजे. संघटनेचे, संस्थेचे काम योग्य पद्धतीने व्हावे यासाठी पुढील गोष्टींचा आग्रह धरला पाहिजे.

* कार्याचा विस्तार – समाजातील प्रश्नांचा अभ्यास करून, त्यांची गरज ओळखून आपल्या कामातून हे प्रश्न कसे सुटतील याचा विचार करून आपण काम वाढवले पाहिजे.

* हे काम वाढवताना जोडलेले कार्यकर्ते गुणवत्ता असलेले असावेत. कामाची गुणवत्ता वाढावी म्हणून कार्यकर्त्यांचे सतत प्रशिक्षण व्हायला हवे.

* समाजात होणारे परिवर्तनही काम करताना लक्षात घेतले पाहिजे. समाजातील समरसता, पर्यावरणाबद्दलची जागरुकता व बदलत चाललेली कुटुंबपद्धती यांचा विचार केला पाहिजे.

* आपल्या कामातून समाजात कायमच सकारात्मक विचार, भावना पोहोचवल्या जात आहेत याचे भान असले पाहिजे आणि हे काम एकट्यानेच करण्यापेक्षा समाजातील सर्व सज्जनशक्तींना यात सहभागी करून घेतले पाहिजे.

## जयंती – विधायक कामासाठी (शाखा विभाग)

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती –**

रक्तदान शिबिरांचे आयोजन करून भागशः विधायक जयंती साजरी झाली.

| | स्थळ | रक्तदाते | रक्तपेढी |
|---|---|---|---|
| **भाग १** | | | |
| समर्थ रामकृष्ण शाखा | 'स्व'–रूपवर्धिनी | ७५ | जनकल्याण रक्तपेढी |
| स्वामी श्रद्धानंद शाखा | जिव्हेश्वर सभागृह, गंज पेठ | ४५ | भारती विद्यापीठ रुग्णालय |
| **भाग २** | | | |
| स्वामी दयानंद शाखा | बाळासाहेब ठाकरे सभागृह, सुप्पर बिबवेवाडी | १३३ | भारती विद्यापीठ रुग्णालय |
| धर्मवीर शंभुराजे शाखा | प्रेरणा विद्यालय, आंबेगाव पठार | ४८ | आधार रक्तपेढी |
| **भाग ३** | | | |
| राजर्षी शाहू शाखा | सरस्वती प्रशाला, कर्वेनगर | ५६ | दीनानाथ मंगेशकर रुणालय |
| स्वामी सुबोधानंद शाखा | | | |
| **भाग ४** | | | |
| स्वामी अभेदानंद शाखा | युनियन बोर्डिंग हाऊस, गोखलेनगर | ५६ | पुणे ब्लड बँक, हडपसर |
| **भाग ५** | | | |
| स्वामी विवेकानंद शाखा | संत रामदास स्वामी प्राथमिक शाळा, पांडवनगर | ५३ | आधार रक्तपेढी |



माघार न जन्मात, सारखे होउ देत आघात । भेद बेगडी निपटू आता ।
शुद्ध मनाने करू एकता । हीच यशाची वाट ।।

## कौशल्य प्रशिक्षण केंद्र, चऱ्होली – उद्घाटन



चऱ्होली येथे 'स्व'–रूपवर्धिनीच्या वतीने उभारण्यात आलेल्या कौशल्य प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन रविवार, दि. २३ एप्रिल २०२३ रोजी विवेकानंद केंद्र, कन्याकुमारीच्या अखिल भारतीय उपाध्यक्षा पद्मश्री निवेदिता भिडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष पद्मविभूषण डॉक्टर रघुनाथ माशेलकर तसेच प. महाराष्ट्र प्रांताचे संघचालक श्री. नानासाहेब जाधव, एमकेसीएलचे व्यवस्थापकीय संस्थापक व 'स्व'–रूपवर्धिनीचे नूतन उपाध्यक्ष श्री. विवेक सावंत, महापौर श्री. नितिन काळजे उपस्थित होते.

आपले विचार मांडताना पद्मश्री निवेदिता भिडे म्हणाल्या, ''राष्ट्राला वैभवशाली करून पूर्ण विश्वाला प्रत्येक राष्ट्राने योगदान दिले पाहिजे, असे स्वामी विवेकानंद यांनी सांगितलं होतं; त्याप्रमाणे आपल्या राष्ट्राला सक्षम करण्याचे जे पहिले काम आहे, ते 'स्व'–रूपवर्धिनीमध्ये अत्यंत समर्पित भावनेने कै. कृष्णराव पटवर्धन यांच्यापासून प्रत्येक कार्यकर्ता करीत आहे. त्यांच्या ध्येयाची, तपस्येची परंपरा म्हणजे हे भवन आहे. हा तपप्रवाह सतत सुरू राहिला पाहिजे म्हणजे भवनाचा उद्देश सफल होईल आणि त्याकडेच 'स्व'–रूपवर्धिनीची वाटचाल होताना दिसत आहे. समाजातील सर्व स्तरांपर्यंत पोहोचून त्यांना आत्मनिर्भर करण्याचा हा प्रयत्न निश्चित कौतुकास्पद आहे.''

संस्थेचे अध्यक्ष या नात्याने मनोगत व्यक्त करताना डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी प्रशिक्षण केंद्र हे केवळ चऱ्होलीसाठी नव्हे तर शहरासाठी, देशासाठी महत्त्वाचे असल्याचे सांगितले. आज आपण इंडिया@७५ ऐवजी भारत@७५ म्हणायला पाहिजे. कारण ७० टक्के भारत खेड्यात व १७ टक्के भारत गरीब वस्तीभागात राहतो; हा फरक भरून काढायला हवा. स्वप्न इंडिया@७५ची पाहिली आणि भारत तिथेच राहिला तर योग्य होणार नाही. समाजामध्ये संतुलन आणणे, संधी निर्माण करणे, जातरहित भारत तयार करणे, सहज शिक्षण देणे, असे काम 'स्व'–रूपवर्धिनी करीत आहे, याचा आनंद असल्याची भावना त्यांनी याप्रसंगी व्यक्त केली.

'स्व'–रूपवर्धिनीच्या वतीने ग्रामीण तरुण–तरुणींना तसेच महिलांना प्रशिक्षित करण्याच्या हेतूने तीन मजली भव्य वास्तूच्या स्वरूपात केंद्र सुरू करण्यात आले आहे. **पॅरामेडिकल कोर्सेससह, बेसिक रोबोटिक्स डिझायनिंग तसेच पीसीबी फॅब्रिकेशन, रॅपिड प्रोटो टायपिंग, पायथॉन हार्डवेअर, फॅशन डिझायनिंग, नर्सिंग आणि कथ्थक नृत्य प्रशिक्षण असे अभ्यासक्रम जूनपासून सुरू होत आहेत.**

फिरोदिया ट्रस्टने वर्धिनीच्या चऱ्होली येथील कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्राला एक सिटीलाईन दहा सीटर वाहन देणगी स्वरुपात दिले. या गाडीच्या हस्तांतरणाचा कार्यक्रम फिरोदिया हॉस्टेल येथे ६ जुलै रोजी संपन्न झाला. फोर्स मोटर्सचे चेअरमन व पॅकेजिंग डायरेक्टर श्री. अभय फिरोदिया यांनी वर्धिनीचे अध्यक्ष डॉ. माशेलकर यांना गाडीच्या चाव्या प्रदान करून गाडी संस्थेला भेट दिली.

## आषाढी एकादशी

आषाढी एकादशीनिमित्त 'समरसतेचे अभंग' हा कार्यक्रम २९ जून रोजी वर्धिनीच्या ओम्कार सभागृहात कला गटाने आयोजित केला. सर्वप्रथम डॉ संजय तांबट सरांनी या कार्यक्रमाचा उद्देश थोडक्यात मांडला. बालशाखेच्या चिमुकल्यांनी वारकऱ्यांच्या वेशात भक्तीभावाने रिंगण सादर केले. त्यानंतर संत ज्ञानेश्वर, संत कबीर, संत मुक्ताबाई, संत जनाबाई अशा अनेक संतांनी समाजात समता, बंधुता, ममता, समरसता रुजवण्यासाठी अभंगांतून

केलेल्या प्रार्थनेचे  सादरीकरण झाले. विशेष म्हणजे शाखेतील ताई दादांनी हा कार्यक्रम सादर केला. प्रमुख पाहुण्या डॉ. श्यामाताई घोणसे उपस्थित होत्या. मा. श्यामाताईंनी 'भारतीय संत आणि सामाजिक समरसता' या विषयावर सर्वांना मार्गदर्शन केले. त्यांनी गोष्टीतून स्व-कर्माचे महत्त्व सांगितले. आषाढी एकादशीनिमित्त सर्वजण अभंगांच्या आणि व्याख्यानाच्या माध्यमातून पांडुरंगाशी एकरूप झाले. कार्यक्रमास वर्धिनीचे कार्यकर्ते, पालक उपस्थित होते.

**स्वातंत्र्यदिन**

१५ ऑगस्ट - स्वातंत्र्यदिनी झेंडावंदनाला श्री. विद्याधर नारायण शुक्ल, निवृत्त उपसंचालक, राज्य शिक्षण संशोधन परिषद, पुणे हे उपस्थित होते. सर्वांना मार्गदर्शन करताना श्री. शुक्ल म्हणाले, 'वर्धिनीतून मिळालेला सामाजिक कामाचा वसा सगळ्यांनी सांभाळला पाहिजे. राष्ट्रहितासाठी छोट्याशा कामाचे मोलही मोठे असते. जसे आपल्या परिसराची स्वच्छता, सार्वजनिक सुविधांचा योग्य तो वापर, वेळेचे बंधन पाळून काम करणे इत्यादी. या कामातून देशाचा विकास साधला जातो. बालवाडीच्या मुलांनी दिलेल्या सर्व घोषणा मोठ्यांनीही स्वीकारण्याजोग्या आहेत.'
चऱ्होली येथील कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रावरही ध्वजवंदनाचा कार्यक्रम झाला. अध्यक्षस्थानी श्री. प्रमोद लोखंडे तर प्रमुख अतिथी या नात्याने श्री. पोपटराव पठारे या कार्यक्रमाला उपस्थित होते. विद्यार्थ्यांचे समूहगान, योग प्रात्यक्षिक झाल्यावर श्री. प्रदीप लोखंडे यांनी त्यांच्या प्रेरणादायी विचारांनी सर्वांना मंत्रमुग्ध केले. रुग्ण सहाय्यक कोर्स यशस्वी केलेल्यांना त्यांच्या हस्ते प्रमाणपत्रे देण्यात आली. याच कार्यक्रमाला जोडून परिसरातील हौसिंग सोसायट्यांच्या सहयोगाने 'कचरा व्यवस्थापन' या विषयावर एक परिसंवाद आयोजित केला होता. यासाठी पूर्णम् इको व्हीजन या संस्थेचे तज्ज्ञ मार्गदर्शक उपस्थित होते.




**गणेशोत्सव**

गणपती बाप्पा गणाधीश आहे. गणांचा कुशल संघटक आहे. गणांचा अधिपती आहे. कुशल शास्ता आहे. लोकनेता आहे. संकट निवारण करण्यास समर्थ आहे. आरंभ केलेले काम निर्विघ्नपणे आणि यशस्वीरीत्या पूर्ण करण्यास समर्थ आहे. असाच 'स्व'-रूपवर्धिनी संस्थेचा अनौपचारिक शिक्षणाचा भाग असणारा गणेशोत्सव निर्विघ्नपणे आणि दरवर्षीप्रमाणे दिमाखात आणि यशस्वीरित्या पार पडला. संस्था गेली ४१ वर्षे सातत्याने पुण्यातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या मिरवणुकीसाठी आपली सेवा देत आहे. मानाचा चौथा गणपती 'तुळशीबाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ' आणि जगभरातील अनेक गणेश भक्तांचे श्रद्धास्थान असणाऱ्या 'श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती' बाप्पाच्या विसर्जन मिरवणुकीत ३५ वर्षे आपल्या संस्थेला सहभागी होण्याचा मान मिळत आहे.
यावर्षीचे गणेशोत्सव प्रमुख श्री. राज जाधव यांच्या कुशल नेतृत्वाखाली आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी उत्तम साथीने उत्सव यशस्वीरित्या पार पाडला. पथनाट्यांद्वारे पुण्यातील मंडळांच्या समोर समाज प्रबोधनपर विषय घेऊन जनजागृती करणाऱ्या सर्व कलाकारांचे नागरिकांकडून कौतुक झाले. त्याबरोबरच यामध्ये गेला एक ते दीड महिना सातत्याने सराव करणारे शाखांवरील समस्त वर्धक- वर्धिका, युवक-युवती यांचेही खूप कौतुक आणि अभिनंदन

झाले. या सर्वांचा संपूर्ण मिरवणुकीत उत्साह तसूभरही कमी झालेला दिसला नाही. झांज, लेझीम, ध्वज, टिपरी व टाळ पथकातील निरनिराळे प्रकार आणि नेत्रदीपक अशा मल्लखांबावरील कसरती या विसर्जन मिरवणूक पाहण्यास आलेल्या सर्व गणेश भक्तांचे लक्ष वेधून घेत होत्या आणि या सर्वांचा कळस म्हणजे ढोल ताशा वादन. सर्व गणेश भक्तांकडून मिळणारी दाद म्हणजेच सर्वांनीच घेतलेल्या कष्टाचा परमोच्च बिंदू ठरला.

**पथक –** गणेशोत्सवात पुढील मंडळातील मिरवणुकीत पथक सहभागी झाले.

| मंडळ | शाखा | पथक |
|---|---|---|
| गणेश मित्र मंडळ (सोमवार पेठ) | स्वामी सुबोधानंद शाखा | टाळ |
| | क्रांतीज्योती सावित्री शाखा | लेझीम |
| | बाल शाखा | टिपरी |
| महात्मा गांधी मित्र मंडळ, (पद्मावती) | स्वामी शिवानंद शाखा | झांज |
| | समर्थ रामकृष्ण शाखा | ध्वज |
| अखिल बिबवेवाडी गाव मित्र मंडळ (बिबवेवाडी) | स्वामी विवेकानंद शाखा | झांज |
| | नरवीर तानाजी मालुसरे शाखा | ध्वज. |
| अखिल श्रीरामनगर मित्र मंडळ (बिबवेवाडी) | स्वामी योगानंद शाखा | झांज |
| | युवती विभाग | ध्वज |
| तुळशीबाग मित्र मंडळ | स्वामी सुबोधानंद शाखा | टाळ |
| | समर्थ रामकृष्ण शाखा | ध्वज व मल्लखांब |
| आदिनाथ सोसायटी (स्वारगेट) | क्रांतीज्योती सावित्री शाखा | लेझीम |
| | स्वामी शिवानंद शाखा | झांज |
| | स्वामी योगानंद शाखा | झांज |
| | नरवीर शाखा | ध्वज |
| श्रीमंत दगडूशेठ हलवाई ट्रस्ट | स्वामी विवेकानंद शाखा | झांज |
| | युवती विभाग | ध्वज |

**पथनाट्य –** 'चळवळ प्रबोधनाची, समाज बदलाची', हे ब्रीदवाक्य मनात ठेवून यंदाच्या गणेशोत्सवात शालेय व महाविद्यालयीन गटातील विद्यार्थ्यांनी पथनाट्ये सादरीकरण केले. पथनाट्याचा विषय होता, 'छत्रपती शिवराय पुणे भेटीला आल्यावर ते काय काय पाहतात?'. केंद्रीय कार्यक्रम प्रमुख शुभम नरके, केदार घाटगे, सांस्कृतिक विभाग प्रमुख अभय पोते, हरी धायगुडे, सिद्धेश बलवार, उमेश माळेकर यांनी ही पथनाट्य बसवली. **१५ शाखा व उत्थान विभागातील अभ्यासिकेच्या १५ गटांनी पथनाट्य प्रयोगाचा विक्रम केला. १० दिवसात २६७ प्रयोग** झाले. शहराची वाहतूक समस्या, आरोग्य व्यवस्था, कोयता गँग इत्यादीवर भाष्य असलेले हे पथनाट्य चांगले गाजले.

(१) धर्मवीर शंभूराजे शाखा – ५, (२) स्वामी ब्रह्मानंद शाखा – ३, (३) प्रियदर्शनी अभ्यासिका – २,
(४) स्वामी श्रद्धानंद शाखा – २, (५) स्वामी दयानंद शाखा – १, (६) भगिनी निवेदिता शाखा – १८,
(७) स्वामी अभेदानंद शाखा – १२, (८) स्वामी अखंडानंद शाखा – ९, (९) राजर्षी शाहू महाराज शाखा – १६,
(१०) म. फुले भाग (अभ्यासिका) – १७, (११) डॉ. अब्दुल कलाम अभ्यासिका – १६,
(१२) महात्मा फुले अभ्यासिका – १५, (१३) ज्ञानज्योती अभ्यासिका – ९,
(१४) समता अभ्यासिका – ८, (१५) राजमाता जिजाऊ अभ्यासिका – १५ (पोवाडा गायन).

# शाखा विभाग

शाखा विभागाने यावर्षी वर्धक-वर्धिकांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी विशेष प्रयत्न केले. यामध्ये मुलांमध्ये अभ्यासाची गोडी वाढवणे, मूलभूत संकल्पना स्पष्ट करणे, शारीरिक उपक्रमांच्या माध्यमातून अभ्यासाचा ताण कमी करणे, शाखांवरील उपक्रमांना प्राधान्य देऊन गुणवत्ता वाढावी यासाठी प्रयत्न करणे या उद्दिष्टांवर आधारित **उत्कृष्ट शाखा चषक २०२२-२३** अशी संकल्पना घेऊन कार्यक्रम आखण्यात आला. दि. २५ डिसेंबर २०२२ ते दि. १४ एप्रिल २०२३ या कालावधीत संपन्न झालेल्या या कार्यक्रमात ६०० वर्धक-वर्धिका व २०० युवक-युवतींनी सहभाग नोंदवला. सदर उपक्रमांतर्गत गणित, विज्ञान, भाषा, इतिहास, भूगोल अशा अनेक विषयांवर आधारित विविध कृती उपक्रम असणारी पुस्तिका प्रत्येक वर्धकाला देऊन शालेय अभ्यासक्रमावर आधारित इयत्ताशः उपक्रमही सुचवले गेले. शाखा पातळीवर काही तज्ज्ञ कार्यकर्त्यांकडून याचे मूल्यांकन केले गेले. याशिवाय शाखेत दैनंदिन होणाऱ्या उपक्रमांवर आधारित केंद्रीय स्तरावर स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

**उत्कृष्ट शाखा चषकातील विविध टप्पे**

| दिनांक | विषय |
|---|---|
| ३ व ४ डिसेंबर २०२२ | केंद्रीय अभ्यास कौशल्य वर्ग |
| २६ डिसेंबर ते २५ मार्च २०२३ | शाखाशः कृती शिक्षण उपक्रम अंमलबजावणी |
| २६ जानेवारी | केंद्रीय स्तर पाढे पाठांतर स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा |
| ५ फेब्रुवारी | केंद्रीय स्तर इतिहास भूगोल प्रश्नमंजुषा |
| १० जानेवारी ते १० फेब्रुवारी | शाखाशः मैदान परीक्षण |
| २० फेब्रुवारी | शाखाशः सहल (सहलीवर आधारित प्रकल्प लेखन स्पर्धा) |
| २८ फेब्रुवारी ते ५ मार्च | शाखाशः पालकसभा |
| फेब्रुवारी-मार्च | शाखाशः विज्ञानदिन |
| २८ फेब्रुवारी | रथसप्तमीनिमित्त सूर्यनमस्कार स्पर्धा |
| १ ते १० मार्च | शाखाशः अभ्यास विषयक सत्र/कार्यशाळा |
| ११ ते १९ मार्च | शाखाशः वार्षिक परीक्षा |
| प्रत्येक महिन्याची १ ते ५ तारीख | उपक्रम आढावा, केंद्रीय बैठका, मासिक अहवाल, शाखा हिशोब आणि अग्रीम, उपक्रमांना प्रतिसाद |

केंद्रीय स्तरावर कार्यकर्त्यांचा अभ्यास कौशल्य वर्ग घेऊन त्यामध्ये शाखा चषक या कार्यक्रमाची मांडणी शाखा कार्यकर्त्यांसमोर करण्यात आली. सर्व उपक्रम, स्पर्धा, शाखाशः कार्यक्रम याचे नियोजन सांगण्यात आले. वर्धक-वर्धिकांच्या बौद्धिक विकासाच्या दृष्टीने आयोजित केलेल्या सर्व स्पर्धांना उत्तम प्रतिसाद मिळाला.

● **पाढे पाठांतर स्पर्धा व हस्ताक्षर स्पर्धा –** या दोन स्पर्धा 'उत्कृष्ट शाखा चषक २०२३' या अंतर्गत आयोजित करण्यात आल्या. ह्याचे प्रशिक्षण शाखांवर डिसेंबर महिन्यापासून सुरू करण्यात आले. शाखा स्तरावर नियमित २ ते ३० पाढे पाठांतर आणि हस्ताक्षर सराव चालू होता. यामध्ये काही शाखांनी पाढे पाठांतरासाठी नवनवीन पद्धती शोधून काढल्या (जसे की चाली लावून पाढे म्हणणे).

● **इतिहास-भूगोल प्रश्नमंजूषा –** सर्व शाखांमध्ये इंग्रजी, गणित व विज्ञान या विषयांच्या तासिकांवर भर दिला जातो, त्याचबरोबर वर्धकांचा भाषा विषय (मराठी, हिंदी) रोजच्या व्यवहारातून, शाखांच्या विविध उपक्रमांतून पक्का होत असतो. उरतात इतिहास आणि भूगोल, या अत्यंत महत्त्वाच्या विषयांकडे दुर्लक्ष न होता वर्धकांच्या वार्षिक परीक्षेच्या तयारीसाठी मदत व्हावी आणि इतिहास व भूगोलातही चांगले गुण मिळावेत, यासाठी इतिहास-भूगोल प्रश्नमंजूषा १२ फेब्रुवारीला आयोजित करण्यात आली.

स्पर्धेचे स्वरूप : स्पर्धा गटशः एकूण ५ फेऱ्यांत घेण्यात आली. यामध्ये KBC (based on MCQ's), Brief Description, Cross Questions, Buzzer Round व नाट्य सादरीकरण अशा फेऱ्या समाविष्ट होत्या. वर्धकांची परीक्षेत येणाऱ्या प्रत्येक प्रश्नासाठी आवश्यक तयारी या फेऱ्यांमधून करून घेण्यात आली. सहभागी संख्या = १९०.

● **शाखा, मैदान, परीक्षण –** त्यापुढील टप्प्यात शारीरिक विकास साधण्यासाठी शाखेवरती होणाऱ्या दैनंदिन मैदानी व्यवस्थेत गुणवत्ता वाढावी यासाठी मैदान परीक्षण करण्यात आले. यामध्ये शारीरिक चाचणी, समता अभ्यासक्रम, आचार विभाग सराव, आवश्यक मैदानी आणि इतर साहित्याने सुसज्ज शाखा कपाट अशा विविध आयामांवर आधारित शाखा परीक्षण वर्धिनीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी केले.

● **सहल –** वर्धिनीच्या मनुष्य जडणघडणीच्या प्रयोगातील एक महत्त्वाचा भाग म्हणजे सहल. दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी सर्वच शाखांनी विविध सहली आणि क्षेत्रभेटींचे आयोजन केले. त्यामधील काही निवडक –

| शाखा | सहलीचे ठिकाण |
|---|---|
| स्वामी श्रद्धानंद | किल्ले राजगड |
| नरवीर तानाजी मालुसरे | किल्ले राजगड, धायरी खंडोबा मंदिर क्षेत्रभेट |
| स्वामी विवेकानंद | किल्ले सरसगड, फर्ग्युसन महाविद्यालय हेरिटेज वॉक |
| भगिनी निवेदिता | किल्ले सज्जनगड आणि रामदरा क्षेत्रभेट |
| स्वामी ब्रह्मानंद | दुर्ग रायगड व चवदार तळे, महाड |
| धर्मवीर शंभूराजे | किल्ले रायगड, मुरुड जंजिरा, कोरीगड |
| राजर्षी शाहू | किल्ले लोहगड |
| स्वामी दयानंद सरस्वती | जीवधन किल्ला |

● **पालक सभा –** वार्षिक परीक्षेच्या दृष्टीने पालकांची भूमिका, घरातील वातावरण आणि शाखाकामाचा आढावा पालकांना देण्यासाठी पालकसभांचे आयोजन करण्यात आले. दि. २४ फेब्रुवारीला शंभूराजे शाखेच्या जवळपास ४६ पालकांच्या उपस्थितीत श्री. सुरेश पवार यांनी पालकसभा घेतली. दि. २८ मार्चला शिवतेज नगर येथील अभ्यासिकेची पालकसभा सौ. मेघा नगरे व सौ. वनिता जगताप यांनी घेतली. मेघाताईंनी अभ्यास नियोजन तर

वनितातार्इंनी बचतगट या विषयावर पालकांशी संवाद साधला. दि. ४ मार्चला झालेल्या योगानंद शाखेच्या पालकसभेत 'परीक्षेची पूर्वतयारी' या विषयावर श्री. यश दूधभाते यांनी पालकांशी संवाद साधला. भगिनी निवेदिता शाखेच्या पालकसभेत शाखेचे महत्त्व, अभ्यास नियोजन, परीक्षा काळात मुलींशी कसे वागावे या विषयावर कु. समृद्धी यादव हिने चर्चासत्र घेतले. शाखा विभाग प्रमुख श्री. शुभम जगताप याने दि. ५ मार्चला स्वामी श्रद्धानंद शाखेत शाखा कामाचा आढावा आणि आगामी उपक्रमांची माहिती उपस्थित पालकांना दिली. स्वामी ब्रह्मानंद शाखेत दि. २० मार्चला श्री. अमोल उंदरे यांनी वार्षिक परीक्षेच्या दृष्टीने अभ्यासाचे नियोजन या विषयावर पालकांशी संवाद साधला. जून महिन्यात सर्व शाखांमधील दहावीतल्या वर्धकांच्या पालकांची सभा झाली. त्यात मुलांच्या तासिकांचे व अभ्यासाचे वर्षभराचे नियोजन व त्यासाठी युवकांचा सहभाग कसा असेल हे सांगण्यात आले. याशिवाय वर्षभर पालकांशी शाखेचे कार्यकर्ते व युवक कार्यकर्ते पालकांशी वेगवेगळ्या विषयांवर पालकसभेतून संवाद साधतात. यामध्ये शाखा नियोजन, वर्धक-पालकांमधील सकारात्मक संवाद, स्वावलंबन शिकवताना पालकांची भूमिका, वर्धिनीची त्रिसुत्री, शाखेचे दैनंदिन व शैक्षणिक जीवनातील महत्त्व, गणेशोत्सव आढावा व महाशिबिर हे विषय मांडले गेले.

● **विज्ञान दिन –** दि. २६ फेब्रुवारीला ''भारतीय वैज्ञानिक आणि त्यांचे शोध'' या विषयावर आधारित प्रकल्प अनेक शाखांनी विज्ञानदिनाच्या निमित्ताने सादर केले. यामध्ये धर्मवीर शंभूराजे शाखेत सर्व वर्धकांचे गट पाडून "Newton's Cradle, Periscope, DC Motor, Hydraulic Elevator" अशा विषयांवर तर क्रांतीज्योती सावित्री शाखेत ध्वनी, ज्वालामुखी, घनता या विषयांवर प्रकल्प सादरीकरण करण्यात आले. भगिनी निवेदिता शाखेत 'विज्ञानातील संज्ञा' या विषयावर योगेश तांबट व रविराज पाटील यांनी वर्धिकांना विविध प्रयोगांची प्रात्यक्षिके दाखवली. दि. २८ फेब्रुवारीला स्वामी विवेकानंद शाखेने आगरकर संस्थेमधील विज्ञान प्रदर्शनाला भेट दिली. स्वामी दयानंद शाखेत दि. ४ मार्चला विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. याशिवाय शाखा विभाग **केंद्रीय विज्ञान दिन स्पर्धा** दि. १२ मार्चला स्वामी ब्रह्मानंद शाखा, हिंगणे येथे आयोजित करण्यात आली.

● **रथसप्तमीनिमित्त सूर्यनमस्कार स्पर्धा –** शारीरिक विकासाच्या दृष्टीने शाखेत दैनंदिन मैदानावर होणाऱ्या सूर्यनमस्कार या विषयी मुलांमध्ये गोडी वाढावी, नियमितता व अचूकता यावी यासाठी आयोजित केलेल्या या उपक्रमात सर्व शाखांनी मिळून ३५,००० सूर्यनमस्कार घातले.

● **अभ्यास विषयक सत्रांचे आयोजन –** उत्कृष्ट शाखा चषक अंतर्गत मार्च महिन्यात शाखाशः अभ्यास विषयक सत्र/कार्यशाळा घेण्यात आल्या. यामध्ये मुख्यतः वार्षिक परीक्षेच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या अभ्यास कौशल्यांचे प्रशिक्षण आणि नियोजन यासाठी मुलांना मदत व्हावी म्हणून सत्रांचे आयोजन करण्यात आले.

| शाखा | दिनांक | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| स्वामी दयानंद सरस्वती शाखा | ११ मार्च | भाषिक कौशल्ये | श्री. रोनक खाटेर |
| स्वामी विवेकानंद शाखा | ११ मार्च | अभ्यास कौशल्ये | श्री. मंदार पायगुडे |
| स्वामी अभेदानंद शाखा | ११ मार्च | प्रश्नमंजुषा | श्री. सचिन सनगरे |
| भगिनी निवेदिता शाखा | १६ मार्च | अभ्यास नियोजन | श्री. अरविंद केळकर |
| स्वामी ब्रह्मानंद शाखा | १८ मार्च | स्व-अभ्यास | श्री. विशाल हंपल्ले |
| क्रांतीज्योती सावित्री शाखा | १८ मार्च | अभ्यास कौशल्ये | कु. प्राजक्ता कांबळे |
| राजर्षी शाहू शाखा | १९ मार्च | पेपर कसा लिहावा ? | सौ. अमिता आंबेकर |
| स्वामी श्रद्धानंद शाखा | १९ मार्च | परीक्षेची पूर्वतयारी | कु. सिद्धेश बलवार |

● **वार्षिक परीक्षा –** अभ्यास सत्र, वैयक्तिक नियोजन आणि शाखांनी आयोजित केलेल्या अभ्यास यज्ञ यातून वार्षिक परीक्षेसाठी वर्धक–वर्धिका सज्ज झाले. दरवर्षीप्रमाणे शालेय परीक्षांची पूर्वतयारी म्हणून मार्च महिन्याच्या शेवटी शाखांवर अभ्यासाचे वातावरण तयार होण्यासाठी इंग्रजी, गणित, विज्ञान, इतिहास, भूगोल, मराठी या सर्व विषयांच्या वार्षिक परीक्षा घेण्यात आल्या. परीक्षेसाठी तज्ज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पेपर काढणे, प्रत्यक्ष परीक्षा घेणे, उत्तरपत्रिका तपासणे आणि आवश्यक त्या सुधारणा वर्धक–वर्धिकांना सुचवणे अशा टप्प्यांवर सर्व कामे शाखेच्या युवा गटाने अतिशय उत्साहाने केली.

## उत्कृष्ट शाखा चषक बक्षीस वितरण

दि. २६ जानेवारीला पाढे पाठांतर स्पर्धेचे बक्षीस वितरण श्रीमती लताताई पुरंदरे तर हस्ताक्षर स्पर्धेचे बक्षीस वितरण श्री. अरविंद केळकर यांच्या हस्ते करण्यात आले.

**पाढे पाठांतर विजयी वर्धक –** इ. ५ वी – दितिक्षा चव्हाण, श्लोक पवार

इ. ६ वी – वरद पवार, सार्थक खांडेकर इ. ७ वी – वरद काळे, वेदांत ठोंबरे

इ. ८ वी – आयुष बडंबे, समर्थ मटकर इ. ९ वी – सागर शिंदे

**हस्ताक्षर विजयी वर्धक –** इ. ५ वी – दितिक्षा चव्हाण, गौरवी आचार्य

इ. ६ वी – मयुरंग खापरे, कैवल्य कवळे इ. ७ वी – वरद काळे, भावना कांबळे, गौरव कांबळे

इ. ८ वी – कार्तिकी येवले, विठ्ठल एकलोरे इ. ९ वी – नेहा परदेशी, नम्रता ब्यागरी

**विज्ञान दिन स्पर्धा –** लहान गट – इ. ५ वी ते ७ वी–प्रथम – चैतन्य शिंदे,
द्वितीय – प्रतीक चव्हाण, श्रीओम गंगणे,
तृतीय – आयुष दुधाने, वैभव एकनुरे (सर्व वर्धक – स्वामी दयानंद सरस्वती शाखा)

मोठा गट – इ. ८ वी ते १० वी – प्रथम – सुदीप दिवटे, अथर्व बडदे (स्वामी दयानंद सरस्वती शाखा),
द्वितीय – स्वामी अभेदानंद शाखा,
तृतीय – आर्य शेरला, किसन गौतम, मंदार पवार (स्वामी श्रद्धानंद शाखा)

**इतिहास प्रश्नमंजूषा स्पर्धा –** इ. ५ वी – स्वामी दयानंद सरस्वती शाखा, स्वामी शिवानंद शाखा

इ. ६ वी – स्वामी दयानंद सरस्वती शाखा

इ. ७ वी – स्वामी श्रद्धानंद शाखा, स्वामी अभेदानंद शाखा

इ. ८ वी – स्वामी दयानंद सरस्वती शाखा, स्वामी सुबोधानंद शाखा, राजर्षी शाहू शाखा

इ. ९ वी – स्वामी दयानंद सरस्वती शाखा, धर्मवीर शंभूराजे शाखा, राजर्षी शाहू शाखा

**भूगोल प्रश्नमंजूषा स्पर्धा –**

प्रथम – स्वामी दयानंद सरस्वती शाखा , द्वितीय – धर्मवीर शंभूराजे शाखा

**प्रकल्प लेखन स्पर्धा –**

प्रथम – स्वामी ब्रह्मानंद शाखा द्वितीय – समर्थ रामकृष्ण शाखा तृतीय – धर्मवीर शंभूराजे शाखा

**उत्कृष्ट शाखा चषक विजेते – २०२२–२३**

प्रथम क्रमांक – स्वामी दयानंद सरस्वती शाखा द्वितीय क्रमांक – समर्थ रामकृष्ण शाखा

तृतीय क्रमांक – धर्मवीर शंभूराजे शाखा उत्तेजनार्थ – भगिनी निवेदिता शाखा

● ● ●




### खेळ खूप खेळुनी सतेज व्हायचे –

### वार्षिक क्रीडादिन

यावर्षीचा वैयक्तिक क्रीडादिन दि. २६ नोव्हेंबरला चंद्रशेखर आगाशे कॉलेज येथे तर सांघिक क्रीडादिन दि. १० डिसेंबरला स. प. महाविद्यालय येथे संपन्न झाला. वैयक्तिक क्रीडा दिनात ६४० वर्धक-वर्धिकांनी सहभाग घेतला. वैयक्तिक क्रीडादिनाचा बक्षीस वितरण समारंभ श्री. शुभम जगताप आणि श्री. पुष्कर वाडेकर यांच्या हस्ते तर सांघिक क्रीडादिन बक्षीस वितरण श्री. विश्वास कुलकर्णी, श्री. विनोद बिबवे यांच्या हस्ते संपन्न झाला.

### –: वैयक्तिक स्पर्धा :–

#### गोळा फेक

५ वी – आदिनाथ चव्हाण (दयानंद), अंश कन्होजीया (रामकृष्ण), पार्थ साळवी (सुबोधानंद)
६ वी – हर्ष कांबळे (रामकृष्ण), वैभव घाडगे (दयानंद), स्मरण धुमाळ (अखंडानंद)
७ वी – मयुरेश खापरे (दयानंद), अथर्व उंडे (ब्रह्मानंद), नीरज मौर्य (नरवीर)
८ वी – शुभम वाघमारे (नरवीर), अनुराग कदम (शिवानंद), देवांग आंग्रे (योगानंद)
९ वी – ओम बेंडगे (दयानंद), संदीप गौतम (रामकृष्ण), आर्यन सावंत (शाहू)
१० वी – सुदीप दिवटे (दयानंद), ओम शिळीमकर (अखंडानंद), विश्वजीत पासवान (शिवानंद)
११ वी – आयुष भोर (रामकृष्ण), अथर्व दासरी (श्रद्धानंद), ओंकार चाळेकर (दयानंद)
१२ वी – संतोष म्हेत्रे (दयानंद), गणेश शिंदे (शाहू), अवधूत जावळे (दयानंद)
Fy ते Ty - विपुल शिंदे (शंभुराजे), रितेश शिंदे (नरवीर), अभिषेक पाटोळे (शिवानंद)

● ● ●

#### १६०० मी. धावणे

५ वी – साईनाथ सूर्यवंशी (नरवीर), ऋत्विज गवळी (योगानंद), पार्थ साळवी (सुबोधानंद)
६ वी – सुरेश बने (दयानंद), शैलेश चव्हाण (नरवीर), रुद्र बिराजदार, (रामकृष्ण)
७ वी – अमित सोमवंशी (दयानंद), समर्थ बिराजदार (श्रद्धानंद), प्रवीण उल्गेप्पा (रामकृष्ण)
८ वी – प्रतीक चव्हाण (दयानंद), दिनेश डोंगरे (अभेदानंद), श्लोक भरम
९ वी – साई पवार (दयानंद), आदर्श गायकवाड (शाहू), यश चव्हाण (नरवीर)
१० वी – श्रीनिवास पांचाल (नरवीर), सुदीप दिवटे (दयानंद), शुभम गुदुळकर (शाहू)
११ वी – सौरभ शिंदे (योगानंद), राहुल शहाबदी (विवेकानंद), प्रेम दळवी (शाहू)
१२ वी – गौरव सुतार (शंभूराजे), अक्षय औजी (शाहू), हरीश अडेप (दयानंद)

Fy ते Ty – प्रज्वल डिंबळे (शंभूराजे), श्रीराज गुर्साळे (रामकृष्ण), निशांत घोडे (रामकृष्ण)

• • •

**१०० मी. धावणे**

५ वी – ओम मोटे (शंभूराजे), श्रेयस मुंडेबर (शाहू), श्रेयस मोटे (अभेदानंद)
६ वी – अस्मित हुडे (शिवानंद), नैतिक अलार (श्रद्धानंद), आशिष विश्वकर्मा (शंभूराजे)
७ वी – प्रथमेश सणस (दयानंद), सोहम लोखंडे (अभेडानंद), ओम पोकळे (शंभूराजे)
८ वी – प्रज्वल थोरात (श्रद्धानंद), साहिल जाधव (दयानंद), क्रिश वाघमारे (नरवीर)
९ वी – आर्यन तनपुरे (सुबोधानंद), करण सरोज (रामकृष्ण), अविनाश कसबे (शिवानंद)
१० वी – गौरव जावळे (सुबोधानंद), साजित खान (शिवानंद), सुमित शेट्टी (रामकृष्ण)
११ वी – विपुल आंबेकर (शाहू), यश गायकवाड (शंभूराजे), गौरव कानल (सुबोधानंद)
१२ वी – आकाश साखरे (अभेदानंद), मेदांत मंचेकर (ब्रह्मानंद), आदित्य सुळे (शंभूराजे), प्रणव दोमा (दयानंद)

• • •

**लांब उडी**

५ वी – कार्तिक सूर्यवंशी (नरवीर), स्वराज पवार (सुबोधनंद), आराध्य बिबवे (अखंडानंद)
६ वी – आयुष दुधाने (दयानंद), नैनिक आलाट (श्रद्धानंद), पुरुषोत्तम लांडगे (नरवीर)
७ वी – प्रथमेश सणस (दयानंद), सोहम लोखंडे (अभेडानंद), श्रीनिवास गिरी (नरवीर)
८ वी – समर्थ खोपडे (योगानंद), शुभम अत्तेकर (ब्रह्मानंद), साहिल अरे (अखंडानंद)
९ वी – करण सरोज (रामकृष्ण), कृष्णा तदगे (शंभूराजे), अविनाश कसबे (शिवानंद)
१० वी – प्रशांत सुतार (शंभूराजे), सुमित शेट्टी (रामकृष्ण), तपती सोनार (शाहू)

• • •

**–: सांघिक स्पर्धा निकाल :–**

**लंगडी**

५ वी ते ७ वी – एकूण सहभागी संघ – २२
विजेते – नरवीर तानाजी मालुसरे शाखा, उपविजेते – समर्थ रामकृष्ण शाखा

**कबड्डी**

८ वी ते १० वी – एकूण सहभागी संघ – १८
विजेते – समर्थ रामकृष्ण शाखा, उपविजेते – स्वामी सुबोधानंद शाखा

**कबड्डी**

११ वी ते १२ वी – एकूण सहभागी संघ – १०
विजेते – राजर्षी शाहू शाखा, उपविजेते – स्वामी योगानंद शाखा

**फुटबॉल**

एफ. वाय. ते टी. वाय. – एकूण सहभागी संघ – ८
विजेते – भाग ३, उपविजेते – स्वामी श्रद्धानंद शाखा

**व्हॉलीबॉल**

एकूण १५ संघ

विजेते – स्वामी श्रद्धानंद शाखा, उपविजेते – स्वामी ब्रह्मानंद शाखा

**समता स्पर्धा**

विजेते – स्वामी दयानंद सरस्वती शाखा उपविजेते – समर्थ रामकृष्ण शाखा, स्वामी सुबोधानंद शाखा

• • •

**तासिका विभाग विशेष – पूर्वपीठिका शिबिर**

यावर्षीचे पहिले शिबिर दि. २२ व दि. २३ जुलैला ८ वी ते १० वीच्या वर्धक-वर्धिकांसाठी आयोजित केले गेले. यामध्ये अभ्यासाच्या पायऱ्या, अभ्यास नियोजनाच्या पद्धती, वाचन कौशल्ये, १० वीला सामोरे जाताना अशा विविध विषयांवरील सत्रांचे आयोजन करण्यात आले.

दि. १७ डिसेंबरला १० वी आणि १२ वी साठी विशेष अभ्यास शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये टीपण कौशल्य, लेखन कौशल्य, Paper Presentation, यासोबतच प्रेरणा जागरण यावर आधारित सत्रांचा समावेश होता.

**शिवरायांसी आठवावे...**

३५० व्या शिवराज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने वर्धिनीच्या ८ वी ते युवा गटातील वर्धकांसाठी **'गोष्ट इथे संपत नाही – मोहिम मांडली मोठी'** या विशेष कथाकथन कार्यक्रमाचे दि. १० सप्टेंबरला आयोजन करण्यात आले. श्री. सारंग भोईरकर, श्री. सारंग मांडके हे पुण्यातील दोन हरहुन्नरी तरुण त्यांच्या इतर सहकाऱ्यांच्या मदतीने मराठ्यांच्या इतिहासातील विविध विषयांवर गोष्टी, कविता, संदर्भ मांडणी अशा अनोख्या स्वरूपात सादर करतात. या सादरीकरणाचा लाभ वर्धिनीच्या कार्यकर्त्यांना या निमित्ताने घेण्यात आला.

सर्व शाखांमध्ये छ. शिवाजी महाराजांच्या ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त शिववंदना, शिव आरती, व्याख्याने, कथाकथन असे कार्यक्रम झाले. शाहू शाखेत भाग्येश दादा व लक्ष्मीकांत दादा यांनी राज्याभिषेक सोहळ्याची माहिति सांगितली. स्वामी अभेदानंद शाखेत अनिरुद्ध दादाने मुलांना शिवचरित्रातील न अभ्यासलेल्या कथा सांगितल्या. स्वामी अभेदानंद शाखेतील वर्धक एरंडवणा मित्र मंडळाने आयोजित केलेल्या शिवराय पालखी सोहळ्यात सहभागी झाले. समर्थ रामकृष्ण शाखेत भूमेश दादाचे कथाकथन तर स्वामी विवेकानंद शाखेत 'छत्रपती शिवरायांचा त्रिवार जयजयकार...' या पद्याचे मुलांनी सादरीकरण केले. स्वामी विवेकानंद शाखा वर्धापन दिनानिमित्त दि. ०२ जुलै रोजी संत रामदास स्वामी विद्यालय, पांडवनगर येथे 'छत्रपती शिवराय' या विषयावर आधारित शाखेचा वर्धापन दिन साजरा झाला. शिवरायांच्या जन्माआधीची परिस्थिती, महाराजांचा जन्म, महाराजांची जडणघडण, रायरेश्वर मंदिर शपथ, अफजलखान वध, तुकाराममहाराज शिवराय भेट, शिवरायांपासून क्रांतिकारकांची प्रेरणा, शिवराज्याभिषेक – या विषयांवर नृत्य, नाट्य यांचे ४० मिनिटांचे सादरीकरण झाले. प्रमुख वक्ते मा. प्रशांतजी डोंगरे यांनी महाराजांच्या प्रसिद्ध लढायांतून मिळालेली शिकवणूक व दैनंदिन शाखा स्वतःच्या प्रगतीसाठी कशी महत्त्वाची आहे हे सांगितले. धर्मवीर शंभूराजे शाखेत जुलै महिन्याच्या दर सोमवारच्या परिपाठामध्ये महाराजांच्या विविध पैलूंचे दर्शन घडवून देण्याचा प्रयत्न केला तर स्वामी अभेदानंद शाखेत 'वेड इतिहासाचे' उपक्रमांतर्गत शिवरायांच्या जीवनावर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली.

## वर्षभरातील विशेष कार्यक्रम

● **रक्षाबंधन –** सर्व शाखांतील मुलांनी परिसरातील स्वच्छता कर्मचारी, पोलिस अधिकारी, अग्निशमन अधिकारी, बस डेपो मधील कर्मचारी यांना राखी बांधून सामाजिक रक्षाबंधन साजरे केले. धर्मवीर शंभूराजे शाखेतील वर्धक वानवडी येथील दिव्यांग कल्याणकारी संस्थेत जाऊन तिथल्या दिव्यांग मुलांना आणि स्वामी ब्रह्मानंद शाखेतील वर्धकांनी वडगाव जवळील 'आजोळ' या शांतीवन संस्थेच्या प्रकल्पाला भेट देऊन तेथील मुलांना राखी बांधली. स्वामी सुबोधानंद शाखेतील वर्धकांनी शाखेजवळच्या निरामय फौंडेशनच्या केंद्रात जाऊन त्या सर्व मुलींकडून राख्या बांधून घेतल्या.

● **होळी पौर्णिमा –** भगिनी निवेदिता शाखेत पायल ताईने होळीचे महत्त्व सांगून प्रत्येक मुलीला आपल्यातल्या वाईट गोष्टींची यादी तयार करून ती होळीत जाळून टाकण्यास सांगितली. समर्थ रामकृष्ण शाखेने घरचा नैवेद्य होळीत न टाकता प्रत्येक वर्धकाने घरून किमान दोन पोळ्या आणल्या व ते सर्व पदार्थ गरजूंना दिले.

● **वारी विशेष –** पंढरपूरच्या वारीसाठी राजर्षी शाहू शाखेने परिसरात आलेल्या २५ वारकऱ्यांना शिधावाटप (साबुदाणा व शेंगदाणे) केले. तसेच सम्राट अशोक विद्यामंदिर शाळेत वारकऱ्यांसाठी झालेल्या स्नेहभोजन कार्यक्रमात वाटप व्यवस्थेत सर्व वर्धक सहभागी झाले. वर्धिनीच्या कामाचा व व शाखेचा प्रचार-प्रसार व्हावा या उद्देशाने स्वामी शिवानंद शाखेतील वर्धक पुण्यात तुकाराम व ज्ञानेश्वरांच्या पालख्यांच्या मुक्कामाच्या दिवसात दगडूशेठ गणपती मंदिर, लाल महाल, शनिवार वाडा, नाना पेठ, भवानी पेठ इत्यादी ठिकाणी आकर्षक घोषवाक्य लिहिलेले तक्ते हातात धरून, घोषणा देत सर्व वारकऱ्यांचे स्वागत करत होते. काही वर्धकांनी नागरिकांना, पोलिसांना माहितीपत्रके देऊन वर्धिनीची माहिती सांगितली.

### नवरात्र – जागर स्त्री शक्तीचा

प्रत्येक क्षेत्रात पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून स्त्री उभी आहे. आर्थिक स्वातंत्र्य अनुभवायला शिकली आहे. तिच्या गुणांना, मतांना घरात आणि समाजातही किंमत आहे. विविध क्षेत्रे तिने पादाक्रांत केली आहेत. अशा स्त्रीशक्ती विषयी कृतज्ञता शाखांनी विविध कार्यक्रमांतून व्यक्त केली.

स्वामी श्रद्धानंद आणि सावित्री शाखेने मिळून नवरात्रीनिमित्त नवमीच्या दिवशी शाखेत शक्ती पूजनाचा कार्यक्रम घेतला. स्त्रियांप्रती आदर, संवेदनशीलता व समानता यावी या विचाराने चराचराला चैतन्य देणाऱ्या या स्त्री शक्तिचे पूजन मुलांनी केले. उपस्थित महिला पालकांचे पाय धुवून गंध लावून, ओवाळून त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त केली. 'एक शाखा आपल्या आई-ताईसाठी' असे म्हणत स्वामी अभेदानंद शाखेत महाभोंडल्याचा कार्यक्रम घेण्यात आला. खेळ, गप्पा, गाणी अशा उत्साही वातावरणात कार्यक्रम संपन्न झाला.

दसऱ्यानिमित्त स्वामी सुबोधानंद व स्वामी योगानंद शाखेत शस्त्र व साहित्य पूजन झाले. तसेच स्वामी सुबोधानंद शाखेने राजे शिवराय प्रतिष्ठान यांनी आयोजित केलेल्या शस्त्र पूजनाला भेट देऊन मुलांनी शस्त्राची माहिती घेतली. स्वामी दयानंद सरस्वती शाखेत शस्त्र व मैदान पूजन करून श्री. भरत सूर्यवंशी यांचे 'शिवकालीन शस्त्रे' या विषयावर व्याख्यान झाले तर स्वामी शिवानंद शाखेत राम पूजन व रामायणातील गोष्टी सांगून विजयादशमी साजरी झाली.

● **दिवाळी विशेष – क्रांतिज्योती सावित्री शाखेत** दि. ९ नोव्हेंबर दिवाळीच्या पहिल्या दिवशी वर्धिकांनी स्वतः पणत्या रंगवून शाखा सजवली. याशिवाय या काळात पाककला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, भातुकली, भारुड गायन, एकत्रित फराळ व भाऊबीजेला स्वामी श्रद्धानंद शाखेसोबत भाऊबीज अशा अनेक कार्यक्रमांची रेलचेल शाखेत होती. **स्वामी शिवानंद शाखेत** धनत्रयोदशीनिमित्त पुस्तकरूपी धनाचे पूजन करण्यात आले. लक्ष्मीपूजनाला

पद्मावती मंदिरात उपासना घेण्यात आली. **स्वामी सुबोधानंद शाखेत** महाशिबिराच्या संकल्पनेवर आधारित दीपोत्सव साजरा झाला. **स्वामी दयानंद शाखेत** दिवाळी आनंद मेळावा व दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले. वर्धक, पालक, परिसरातील परिचित कार्यक्रमाला उपस्थित होते.

**राजर्षी शाहू शाखेने** दिवाळीचे औचित्य साधून वर्धकांमधील विक्री कौशल्य व संवाद कौशल्य विकसित व्हावे यासाठी दि. ७ नोव्हेंबर ते दि. १० नोव्हेंबर या चार दिवसांमध्ये उटणे विक्री उपक्रम घेतला. या चार दिवसांमध्ये मुलांनी उटण्यांच्या १,१०० पाकिटांची विक्री केली. या उपक्रमासाठी आवश्यक भांडवल शाखेतील युवकांनी दिले. शाखेतील नववीतील वर्धक यश जाधव याने सर्वाधिक म्हणजे उटण्यांच्या १०० पाकिटांची विक्री केली.

**शाखांचे इतर विशेष उपक्रम**

**क्रांतीज्योती सावित्री शाखा –** दि. २७ फेब्रुवारीला 'राज्य भाषा दिना'निमित्त वर्धिकांनी पूर्वतयारी करून विषय मांडणी केली.

**स्वामी श्रद्धानंद शाखा –** फेब्रुवारी महिन्यात लेखक शिवाजी सावंत लिखित 'छावा' पुस्तक परिचय, स्वा. सावरकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या कार्याची माहिती, राज्य भाषा दिनानिमित्त रोजच्या वापरातील इंग्रजी शब्दांऐवजी मराठी शब्दांच्या वापराची सवय, 'आपली संस्कृती आणि आपली परंपरा' या विषयावर श्री. तुषार मुढे तर गणित या विषयावर सौ. दीप्ती डोळे यांचे सत्र असे अनेक उपक्रम घेण्यात आले. दि. २१ मार्चला 'क्षणभर गप्पा' कार्यक्रमात कु. ऋतुजा नराल हिने इतिहास व भूगोल या विषयांचा अभ्यास कसा करावा यावर व श्री. प्रसाद दासरी याने 'पर्यावरण जपताना' हा विषय मांडला. श्रीमती मनिषा शिंदे यांनी वाढत्या वयात मुलांनी वावरताना घ्यायची दक्षता, आई वडिलांशी साधलेल्या संवादामुळे होणारे फायदे या विषयावर मुलांशी चर्चा केली.

**स्वामी दयानंद सरस्वती शाखा –** दि. ५ मार्चला शाखेने कचरा वर्गीकरण केंद्र, अप्पर डेपो, बिबवेवाडी येथे भेट दिली. केंद्राचे प्रमुख श्री. तुषार राख यांनी वर्धकांना हा प्रकल्प समजावून सांगितला. कचरा वर्गीकरणाचे महत्त्व वर्धकांच्या लक्षात आले.

**भगिनी निवेदिता शाखा –** १ जूनला शाखेला ३५ वर्षे पूर्ण झाली. वर्धापन दिनानिमित्त शाखेत भगिनी निवेदितांच्या चरित्रातील प्रेरणादायी गोष्टींचे कथन झाले आणि उपस्थित सर्व वर्धिकांनी आपल्यातील दुर्गुण दूर करून सद्‌गुणांच्या वाढीचा संकल्प केला.

**समर्थ रामकृष्ण शाखा –** शाखेत दि. २० जूनला श्री शिरीष पटवर्धन सरांनी 'एका अनोख्या कलेक्टरची कहाणी' आईने दाखवलेले स्वप्न साकारताना अडथळ्यांवर मात करत जिद्दीने अभ्यास करून आयएएस ऑफिसर झालेल्या आदिवासी भागातील मुलाची गोष्ट सांगितली. दि. २२ जुलै रोजी लो. टिळक जयंती निमित्त कु. समृद्धी यादव ताईचे व्याख्यान झाले. वर्धकांना पारतंत्र्यातील भारत, छोटा बाळ ते लोकांचे लोकमान्य पर्यंतचा प्रवास व टिळकांनी भारताला स्वातंत्र मिळवून देण्यासाठी केलेले प्रयत्न याची सविस्तर माहिती ताईंनी दिली.

**धर्मवीर शंभूराजे शाखा –** दि. ३ जून पर्यावरण व सायकल दिनानिमित्त, शाखा ते सेव्हन वंडर पार्क, स्वारगेट अशी ४२ वर्धकांची सायकल सहल झाली.

वृक्षारोपण संकल्प – दि. ९ जुलै रोजी शाखेतले वर्धक व युवक तळजाई टेकडीवर वृक्ष लागवड करण्यासाठी गेले. शाखेने ५० वृक्ष लावण्याचा संकल्प केला होता व तो ५१ वृक्ष लावून पूर्ण करण्यात आला. मुलांना यावेळी वृक्ष लावणे काळाची गरज आहे हे लक्षात आले. वृक्ष नसतील तर आपले काय होईल? वृक्ष आपल्याला काय देतात? आपण लावलेला एक वृक्ष पर्यावरणात काय बदल घडवू शकतो? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे मुलांना नंतर झालेल्या चर्चेतून नक्कीच मिळाली. यावेळी वर्धकांना प्रोत्साहन देण्यासाठी श्री अजय दादा कदम, श्री विनोद बिबवे सर, शाखेचे युवक प्रमुख श्री. संदीप जोगळे सर व त्यांचे सहकारी सहभागी झाले. त्यानंतर सर्व वर्धकांनी स्वच्छता

मोहीम राबवून परिसर स्वच्छ केला.

**राजर्षी शाहू शाखा –** मानसिक विकास बैठकीत वर्धिनीचे प्रार्थनेतील चार चरणांपैकी प्रत्येक रविवारी एका चरणाचा अर्थ मुलांना समजावून सांगितला. मुलांचे तीन गट करून प्रत्येक गटाने प्रार्थनेतील चरणाचा त्यांना समजलेला अर्थ लिहिणे, गटाने लिहिलेल्या अर्थाचे सादरीकरण करणे असा उपक्रम झाला.

'भारत इतिहास संशोधन मंडळ' येथील क्षेत्रभेटीत ऐतिहासिक गोष्टी दाखवण्यात आल्या. शाखेत 'आदर्श पद्यवही' ही स्पर्धा सुरू आहे, त्यात आठवड्यातून एक पद्य लिहायचे व ते पाठ करायचे अशा प्रकारे स्पर्धा पुढेही चालू राहणार आहे.

**स्वामी सुबोधानंद शाखा –** शाखेत दि. १६ जूनला खजिना शोध गटशः स्पर्धा झाली. शाखेतील परिसरातील वस्तीची, वर्धकांची घरे सर्वांना परिचयाची व्हावीत म्हणून केळेवाडी व गणेश नगर या वस्तीतील पालकांच्या घरी चिठ्ठ्या लपवून, मुलांनी पालकांच्या उपस्थितीत ठराविक वेळात ठरवून दिलेली घरगुती कामे करणे अशी स्पर्धा झाली. शाखेचा ३० वा वर्धापनदिन दि. ७ ऑगस्टला श्री. विलास कुलकर्णी व श्री. निलेश धायरकर यांच्या उपस्थितीत साजरा झाला. श्री. निलेश सरांनी वर्धिनीच्या उपक्रमांची माहिती व शाखेतून तयार झालेल्या वरिष्ठ अधिकारी व त्यांची धडपड मार्गदर्शनातून मांडली.

**स्वामी शिवानंद शाखा –** दि. १८ जुलै रोजी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पुण्यतिथी निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व लोकशाहीर अण्णाभाऊ यांचे विचार, त्यांनी केलेला संघर्ष, दिलेली हक्कासाठीची लढाई, लोककलेतून केलेले जनमनाचे पुर्ननिर्माण, प्रभावी लेखणीतून व अनमोल वाणीतून वंचिताच्या व्यथा मांडणारे लोकशाहीर, लेखक, समाजसुधारक स्वातंत्र्य चळवळ आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील अग्रगण्य व्यक्तिमत्त्व याला अनुसरून अण्णा भाऊ साठे यांचे जीवनचरित्र सांगण्यात आले.

**स्वामी ब्रह्मानंद शाखा –** एक वेगळा प्रयोग शाखेवर घेण्यात आला. आठवीच्या वर्धकांनी शाखेची धूरा सांभाळली. शाखा भरवण्यापासून, व्यायाम, खेळ, समता, प्रार्थना, परिपाठ, प्रश्नमंजुषा, मारुती स्तोत्र या सर्व गोष्टी आठवीच्या वर्धकांनी घेतल्या. सगळे युवक वर्धक होऊन शाखेत वावरत होते. शाखा घेताना मुलांमध्ये खूप उत्साह आणि स्फूर्ती दिसून आली. एकमेकांना समजून घेत त्यांनी शाखा घेतली.नियोजन उत्तमरित्या पार पाडले.

● ● ●

## उन्हाळी शिबिर

वर्धिनीच्या मनुष्य जडणघडणीच्या प्रयोगातील अतिशय महत्त्वाचा भाग म्हणजे निवासी शिबिर. 'सहवासातून शिक्षण आणि शिक्षणातून संस्कार' हे ब्रीद जपणारी शिबिरे या वर्षीही पार पडली. वर्धक-वर्धिकांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविधांगी विषयांची पेरणी या शिबिरांच्या माध्यमातून केली जाते. या वर्षी लहान गट, मोठा गट आणि वर्धिका गट अशा तीन वेगवेगळ्या शिबिरांचे आयोजन करण्यात आले. लहान गट आणि वर्धिका गटात एका महान व्यक्तीच्या चरित्राची मांडणी करण्याचा प्रयत्न केला गेला तर मोठ्या गटाच्या शिबिरात आगामी काळात येणारी आव्हाने वर्धकांना समजावीत यासाठी उद्योजकतेसारख्या विषयाची ओळख मुलांना करून देण्यात आली.

**वर्धक – लहान गट – कालावधी ३ मे ते ७ मे, स्थळ – लोकसेवा ई–स्कूल, पाषाण.**

**विषय – छत्रपती शिवाजी महाराज, शिबिरार्थी संख्या – ११५**

**प्रेरणा सत्र –** उद्घाटन सत्रात श्री. बापू शिंदे यांनी 'शिवाजी महाराजांचे बालपण' व श्री. विश्वास कुलकर्णी सरांनी 'शिवाजी महाराजांचे नियोजन' हे विषय मांडले. श्री. प्रमोद बोराडे यांनी 'शिवाजी महाराज व साहस' हा विषय कवितेतून मांडला. यातून महाराजांचे बालपण, अफझलखान वधाची पूर्वतयारी, महाराजांची दूरदृष्टी ही वैशिष्ट्ये त्यांनी सांगितली. श्री. मोहन शेटे सरांनी 'जिजामाता व शिवबा' हा विषय कथाकथनातून मांडला. साहसी

जिजामातेच्या संस्कारातूनच महाराष्ट्रात सत्तेवर असणाऱ्या पाच मुस्लिम घराण्यांशी त्यांनी दिलेली टक्कर हा इतिहास मुलांना समजला. 'संघटक छत्रपती शिवराय' हा विषय श्री. महेश पवळे यांनी मांडताना लहानपणापासून शिवरायांनी घरोघरी जाऊन जमवलेल्या मावळ्यांच्या गोष्टी ऐकताना नकळत संपर्क कसा असावा हा संस्कार मुलांच्यावर झाला.

'छत्रपती शिवरायांचा त्रिवार जयजयकार' ह्या पद्याच्या प्रत्येक कडव्याचा अर्थ वर्धिनीच्या युवा कार्यकर्त्यांनी मुलांना प्रबोधन सत्रात सांगितला. पद्य समजून घेताना ऐकलेल्या गोष्टींतून शिवरायांचे वेगवेगळे गुण मुलांना समजले आणि त्यामुळेच समारोप सत्रात याचे सादरीकरण अर्थपूर्ण झाले.

**स्पर्धा व कृतीसत्र –** विषयाला अनुसरून किल्ल्यांची व मावळ्यांची नावे लिहिणे, खजिना शोध, शिवपालखी सोहळा, मैदानी खेळ झाले.

**वर्धक मोठा गट – कालावधी ३ मे ते ७ मे, स्थळ – भावे हायस्कूल, सदाशिव पेठ, पुणे**
**विषय – उद्योजकता विकास, शिबिरार्थी संख्या – १२०**

शिबिराच्या सुरुवातीला मुलांना विषयाची ओळख व्हावी या हेतूने समुपदेशन विभागाच्या प्रमुख सौ. मेघा नगरे यांनी 'माझी व्यवसायाची आवड' (बिझनेस इंटरेस्ट टेस्ट) ही कलचाचणी घेतली. यातून वेगवेगळ्या उद्योगांची व त्यातील विविध पर्याय यांची माहिती मिळाली.

**व्यावसायिकांच्या मुलाखती –**

* 'कैलास जीवन'चे श्री. रामभाऊ कोल्हटकर यांची डॉ. विनेश नगरे सरांनी मुलाखत घेतली. यातून उद्योगाची सुरुवात कशी करावी, यासाठी कोणत्या गोष्टी, कौशल्ये आवश्यक असतात, त्याचे तंत्र व मंत्र यावर चर्चा झाली.
* 'उद्योगाचे शिखर कैलास' – कैलास भेळ, खेड शिवापूरचे श्री. व सौ. शिवराज मिठारे यांना श्री. अरविंद केळकर सरांनी बोलते केले. लहानपणीच्या सवयीतून लागलेली व्यवसायाची आवड, सुरू झाल्यावर आलेल्या अडथळ्यांवर केलेली मात आणि यातील पत्नीचे योगदान यातून व्यवसायपूरक मार्गदर्शन विद्यार्थ्यांना झाले.
* समारोप सत्रात 'काका हलवाई'चे श्री. युवराज गाडवे यांच्या श्री. मंदार रायरीकर सरांनी घेतलेल्या मुलाखतीमधून गेली १३१ वर्षे त्यांनी जपलेल्या परंपरेतून समृद्ध केलेल्या व्यवसायाची माहिती मिळाली.

**स्पर्धा –** ❊ विविध व्यवसायांची पोस्टर बनवणे, इंटरनेटच्या माध्यमातून गुगल, टाटा ग्रुप, रिलायन्स ग्रुप, अदानी ग्रुप अशा व्यावसायिकांची माहितीचे गटशः सादरीकरण झाले. ❊ माझा व्यवसाय माझी जाहिरात – स्वतःला भावलेल्या व्यवसायाच्या विद्यार्थ्यांनी जाहिराती बनवल्या व याचे परीक्षण श्री. विलास कुलकर्णी व श्री. हेमंत भुजबळ यांनी केले.

**चला भेटू या व्यावसायिकाला –** 'उद्योजकता विकास' होताना वेगवेगळे व्यवसाय कसे चालतात, त्यासाठी कसे कष्ट घ्यावे लागतात, कोणत्या गोष्टींचा आग्रह धरायला लागतो, अडचणींवर कशी मात करतात हे माहीत व्हावे म्हणून वर्धकांनी प्रत्यक्ष जाऊन वेगवेगळ्या सहा व्यवसायांची माहिती घेतली.

**प्रत्यक्ष व्यवसायाचा अनुभव –** वर्धकांनी शिबिर स्थळाच्या बाहेर जाऊन परिसरात चिठ्ठीद्वारे निवडलेल्या व्यवसायाचा अनुभव घेतला. प्रत्येक गटाने व्यवसायाचे पूर्ण अंदाजपत्रक बनवले. त्यांना काही रक्कम भांडवल म्हणून दिली होती. अजून रक्कम हवी असल्यास कर्ज कसे घ्यावे याची माहिती दिली. साहित्य खरेदीसाठी गटातून दोघांनी जबाबदारी घेऊन ठराविक वेळात हे काम केले. त्यानंतर दुपारी ४ ते ८ ठरलेल्या ठिकाणी जाऊन प्रत्येक गटाने यशस्वीरीत्या व्यवसायाचा अनुभव घेतला.

**वर्धिका व युवती शिबिर**

**कालावधी – २५ ते २८ मे, स्थळ – न्या. रानडे बालक मंदिर**

**विषय – स्वातंत्र्यवीर सावरकर, शिबिरार्थी संख्या – ५५**

**व्याख्याने –** * शिबिराचे उद्घाटन श्री. मोहन शेटे सरांच्या 'क्रांतीसूर्य सावरकर' व्याख्यानाने झाले. सावरकरांचे प्रेरणादायी चरित्र सर्वांसमोर मांडले गेले. * 'सावरकर आणि समरसता' हा विषय श्रीमती माधुरीताई जोशी मांडताना सावरकरांच्या आवडीच्या गोष्टी, त्यांचे बालपण यातील उद्बोधक प्रसंग सांगितले. * श्री. शिरीष पटवर्धन सरांनी राष्ट्रभक्ती जागवणाऱ्या सावरकरांच्या प्रेरणादायी कथा सांगितल्या. * सौ. किरणताई भट्ट्ड यांनी त्यांनी नुकत्याच पूर्ण केलेल्या 'एव्हरेस्ट बेस कँप'चे अनुभवकथन केले. यातून जिद्द व आत्मविश्वासाच्या जोरावर असाध्य गोष्टी आपण साध्य करू शकतो हे सगळ्यांना जाणवले. * मोठ्या गटातील वर्धिका व युवतींनी 'त्रिवेणी' हे नाटक पाहिले. स्वा. सावरकरांच्या पत्नी व त्यांच्या दोन्ही वहिनी यांचे समर्पण नाट्यमय प्रसंग, नृत्य, गीते यातून लक्षात आले. * श्रीमती तेजाली शहासने यांनी फोटोच्या माध्यमातून सावरकरांनी भोगलेली अंदमानच्या सेल्युलर जेलमधील काळ्या पाण्याची शिक्षा कथन केली.

* समारोप सत्रात ॲड. मा. निलिमाताई गोखले यांनी सावरकरांचे चरित्र थोडक्यात मांडले. नवीन शैक्षणिक वर्षासाठी शाखाशः कामाच्या युवतींच्या नियुक्त्या यावेळी जाहीर करण्यात आल्या.

**कृतिसत्रे –** * 'व्यक्तीचित्रं कशी काढावीत' हा विषय श्री. हर्षद दादा पेंढार यांनी छोटी छोटी चित्रे काढून समजून सांगितला व त्याप्रमाणे मुलींकडून चित्रे काढून घेतली.

* 'स्वातंत्र्यवीर सावरकर' हा चित्रपट मुलींनी बघितला आणि त्यातील काही प्रसंगांचे गटशः सादरीकरण केले.

* लहान गटाची राजा केळकर संग्रहालयाला स्थळभेट झाली. दीपाताई, मनिषा ताई यांनी संग्रहित वस्तूंमागील इतिहास मुलींना सांगितला.









## युवा विभाग

''निर्माणों के पावन युग मे, हम चरित्र निर्माण ना भुले...'' या पद्याच्या ओळीतून अभिप्रेत असणारे ध्येय समोर ठेवून युवा विभाग सतत कार्यरत आहे. राष्ट्रासाठी समर्पित कार्यकर्त्यांची मांदियाळी तयार करत आहे.

### वार्षिक सहल

दरवर्षीप्रमाणे १० वीच्या एकूण ४९ युवकांची सहल ३१ मार्च ते २ एप्रिल ह्या कालावधीत हरिश्चंद्रगडावर नेण्यात आली. या सहलीचा मुख्य उद्देश क्षमता संवर्धन, इतर शाखेतील युवकांशी संघटनेसाठी मैत्री वाढवणे आणि वर्धिनी म्हणून माझी ओळख काय, याची स्पष्टता येण्यासाठी होती. या सहलीत ध्येय निश्चिती, स्व. ज्ञानेश पुरंदरे यांचे चरित्र, पद्यमंजुषा आणि हरिश्चंद्रगडाचा ऐतिहासिक वारसा समजून घेणे हे मुख्य कार्यक्रम होते.

इयत्ता १२ वीच्या ३४ युवकांची सहल ढाक भैरी येथे दि. २४ व २५ मार्चला गेली. या सहलीचा मुख्य उद्देश साहस ओळख, गिर्यारोहण प्रशिक्षण व पुढील शिबिरांचे नियोजन हा होता.

### बारावी पूर्वपिठीका शिबिर

बारावीच्या परीक्षेची पूर्वतयारी म्हणून युवकांचे दैनंदिन नियोजन करून घेण्यात आले.

दिनक्रम आणि अभ्यासाच्या सोप्या पद्धती – श्री. श्रीराम इनामदार

लेखन कौशल्य आणि उत्तरपत्रिका लेखन – श्री. अक्षय कदम

टिपण कौशल्य आणि उजळणी कशी करावी – श्री. विराज देवचक्के

समारोप सत्र – कोणतीही परीक्षा यशस्वी करण्यासाठी प्रेरणा – श्री सुमित डोळे

परीक्षेच्या दृष्टीने योग्य दिनक्रम, उजळणी करण्याचा सोप्या पद्धती, स्वयं अध्ययनाचे महत्त्व, उत्तम आरोग्य आणि योग्य आहार, लेखन कौशल्यातील महत्त्वाच्या पायऱ्या, टिपण कसे काढायचे अशा विषयांची सखोल मांडणी वक्त्यांनी केली.

### नाशिक सटाणा सर्वेक्षण मोहीम

नाशिक आणि सटाणा जिल्हा सर्वेक्षणाचा मुख्य उद्देश युवकांना ग्रामीण भागातील आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीमध्ये होणारा बदलांची ओळख हा होता. नाशिक मधील सटाणा तालुक्यातील १४५ गावांमध्ये सामाजिक विषयांवर सर्वेक्षण करण्यात आले. यात एकूण २८ युवक सहभागी होते. सर्वेक्षणाचा कालावधी दि. ६ एप्रिल ते ९ एप्रिल २०२३ होता. युवकांना गावांमधल्या परिस्थितीची ओळख झाली.

### युवक शिबीर

**कालावधी –** १८ ते २१ मे २०२३, **ठिकाण –** दिव्यांग कल्याणकारी संस्था, वानवडी. **एकूण शिबिरार्थी –** ८५

**शिबिराविषयी** – सर्व युवा कार्यकर्ते वर्षभर तळमळीने, मनपासून शाखेचे काम करीत असतात पण त्याला नियोजनाची, अनुभवाची जोड दिल्यास शाखेचे काम गुणवत्तापूर्ण येईल या हेतूने या शिबिरात 'प्रशिक्षण' हे केंद्रस्थानी ठेवून विविध कृतीसत्रे, गटकार्य व व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले.

**दि. १८ मे २०२३ –*** डॉ.संजय तांबट यांनी 'शाखा गाथा' या मालिकेतून युवकांना प्रबोधन केले. वर्धिनीच्या स्थापनेपासून ते शाखा विस्ताराची साखळी व त्यामागील प्रेरणा असा विषय त्यांनी मांडला).

* श्रीमती बागेश्री दीदी पोंक्षे यांनी वर्धिनीचे काम, सहवासातून शिक्षण, सेवेकरी निर्माण यासाठी शाखा सूत्र कसे उपयुक्त ठरते हे स्पष्ट केले.

* श्री. सुमित डोळे यांनी औपचारिक व अनौपचारिक शिक्षण पद्धती, त्याचे महत्त्व संवादात्मक रूपाने सर्व कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचवले.

* श्री. सुनील देवधर यांच्या भारतीय समाजापुढील आव्हाने या विषयांतून अनेक कार्यकर्त्यांना आपल्या आजूबाजूला असलेले प्रश्न व त्याच्या गांभीर्याचे भान आले.

**दि. १९ मे २०२३ –** * शाखेच्या घडणी प्रक्रियेतील एक महत्त्वाचा नित्य उपक्रम म्हणजे मानसिक विकास बैठक. ही बैठक कशी घ्यावी, कशासाठी घ्यावी याचे प्रशिक्षण भागश: चर्चा व लेख वाचनातून घेण्यात आले. हे प्रशिक्षण श्री. विलास कुलकर्णी, डॉ. विनेश नगरे, श्री. संदीप मोरे, श्री. निशिकांत वाईकर व श्री. मंदार पोफळे यांनी घेतले.

* शाखेच्या कामाचे नियोजन करताना नियोजनाचे टप्पे काय आहेत याचे कृतीसत्र श्री. सुरेश पवार याने घेतले.

* श्री. मंदार अक्कलकोटर यांनी युवकांना प्रथमोपचार वर्गाचे प्रशिक्षण दिले. आपत्कालीन स्थितीत हार्ट अटॅक आल्यास CPR कसा द्यावा व मैदानावर अशा संभाव्य घटना घडल्यास काय करावे याचे प्रशिक्षण दिले.

* श्री. भरत अमदापुरे यांनी प्रेरणा सत्रात 'भारतीय समाजापुढील आव्हाने' हा विषय मांडला. समाज म्हणून आपल्या आजूबाजूला घडण्याऱ्या घटनांची उदाहरणे देत त्यांनी जागरूक राहण्याचे संकेत दिले.

**दि. २० मे २०२३–*** शाखेतील कामे, व दिलेली व्यवस्था उत्तम रीतीने पार पाडता यावी म्हणून व्यवस्था:श त्यांचे प्रशिक्षण घेऊन शंकाचे निरसन करून त्यांच्या व्यवस्थेचे प्रोफाइल देखील देण्यात आले.

* Drone Acharya (द्रोणाचार्य) या संस्थेचे अक्षयदादा यांनी ड्रोन विषयातील करियर विषयी मार्गदर्शन केले. ड्रोनचा वापर कसा केला जातो याचे प्रात्यक्षिक सादर केले.

* शाखा स्तरावर करत असलेले काम तंत्रज्ञानाद्वारे सोपे व्हावे म्हणून IT विभागामार्फत MS Teams चे प्रशिक्षण देण्यात आले. श्री. केदार भंडारी व श्री. शुभम जगताप यांनी सदर सत्र घेतले.

* प्रेरणा सत्रात 'हिंदू साम्राज्य दिनाने आपल्याला काय दिले?' हा विषय ह.भ.प. शिरीषजी मोरे यांनी मांडला. त्यांनी आजवर झालेली आक्रमणे जसे की निजाम, औरंगजेब, खिलजी यांच्या कालखंडावर प्रकाश टाकला.

**दि. २१ मे २०२३ –** भागश: सर्व व्यवस्थांचे वार्षिक नियोजन करण्यात आले.

समारोप सत्रात – श्री. मुरलीधर कचरे यांनी दिव्यांग कल्याणकारी संस्थेविषयी माहिती व संघ प्रचारक म्हणून काम करताना आलेले प्रेरणादायी अनुभव त्यांनी सांगितले.

अशा प्रकारची शिबिरे नेहमीच कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवणारी, दिशा देणारी आणि प्रेरणा जागवणारी ठरतात.

## जागृती अभ्यास वर्ग

वर्धिनीच्या कार्यकर्ता जडणघडणीच्या प्रक्रियेतील महत्त्वाचा भाग म्हणजे युवांना बौद्धिक, वैचारिक चालना देणारे अभ्यास वर्ग. असाच वर्ग दि. २८ ते ३० जुलै वर्धिनीच्या कौशल्य विकास केंद्र, चऱ्होली या नवीन वास्तूत झाला.

*** वाचन व माहितीपट –**

ज्ञापु नावाचा परीस – लेखक – मंदार पोफळे दादा,

पूर्वपुण्याईची शाळा 'स्व'–रूपवर्धिनी – लेखक – प्रा. रामभाऊ डिंबळे सर

ह्या दोन लेखांचे वाचन होऊन त्यावर गटचर्चा झाली व वर्धिनी संदर्भातील काही माहितीपट दाखवण्यात आले.

*** अनौपचारिक गप्पा –** मानसिकता, आकर्षण, कॉलेज लाईफ व दुनियादारी, शाखेतील व्यावसायिक युवकांची ओळख या विषयांवर युवकांचे ५ गट पाडून अनौपचारिक गप्पांचा कार्यक्रम झाला.

**इतर उपक्रम – *** शिबिराच्या पहिल्या दिवशी व शेवटच्या दिवशी सर्व युवकांची पूर्वपरीक्षा घेण्यात आली. यात त्यांना वर्धिनीबद्दलचे प्रश्न, त्यांना वर्धिनीबद्दल किती माहिती आहे व त्यांची आताची मानसिकता कशी आहे हे या चाचणीतून जाणून घेण्यात आले.

*** 'क्राओ मागा' युद्धकला –** युवकांना 'क्राओ मागा' युद्धकला प्रकार शिकवण्यात आला. याचे एकूण चार टप्प्यात प्रशिक्षण झाले. यातून त्यांना अनेक स्व–सरंक्षणाचे प्रकार समजले.

**शिबिरात झालेली व्याख्याने व प्रबोधन**

| विषय | वक्ते |
|---|---|
| आपले संस्थापक किशाभाऊ | श्री. अरविंद केळकर |
| वर्धिनीपण म्हणजे काय ? | डॉ. संजय तांबट |
| वर्धिनीचा कार्यकर्ता कसा असावा ? | श्री. शिरीष पटवर्धन |
| ज्ञा. पू. एक समर्पित कार्यकर्ते | श्री. महेश पवळे |
| सेवेकऱ्यांची मांदियाळी | श्री. निलेश धायरकर |
| स्व–विकास शाखा, देश, समाजासाठी | डॉ. विनेश नगरे |



**कोजागिरी पौर्णिमा –** कोजागिरी पौर्णिमेनिमित्त सर्व युवकांचे भागश: एकत्रिकरण करण्यात आले. जुन्या आणि नव्या फळीतील कार्यकर्त्यांच्या अनौपचारिक एकत्रीकरणातून नाती दृढ व्हावीत आणि वर्धिनीच्या आगामी कार्यक्रम, उपक्रम व उद्दिष्टांसाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत यासाठी हा खऱ्या अर्थाने दुग्ध शर्करा योग जुळून आला. सर्व भागात कोजागिरी पौर्णिमेनिमित्त दुधाचा आस्वाद घेऊन अनेक विषयांवर विचार मंथन झाले.

**युवक क्रीडा दिन –** 'पदी धैर्य बाहुत शौर्य स्फुरावे...' या उक्तीला साजेशी युवा पिढी तयार करण्यासाठी दैनंदिन शाखेत मैदानी खेळला विशेष महत्त्व आहे. शारीरिक क्षमतांचा कस लागावा, खिलाडूवृत्ती जोपासली जावी या उद्देशाने डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात क्रीडादिन संपन्न झाला. निर्माण गटासाठी (इ. ११ वी आणि इ. १२ वी) म्हणजेच कबड्डी, नेतृत्व गटासाठी (महाविद्यालयीन, पदवीधर गट) फुटबॉल आणि प्रेरणा गटासाठी व्हॉलीबॉल (व्यावसायिक गट) अशा खेळांच्या स्पर्धा घेण्यात आल्या.

**देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे, घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावेत –**
याची प्रचिती वर्धिनीत आली. सदानंदनगर वस्तीत राहणारा एक युवक, लहानपणी घरची परिस्थिती अत्यंत बेताची, वडिलांच्या भेळेच्या गाडीवर संपूर्ण कुटुंबाची गुजराण होत होती. वर्धिनीत बालशाखा–आजोळ–समर्थ शाखा–रामकृष्ण शाखा असा त्याचा प्रवास. घरापासून शाळा दूर. जाण्यायेण्यात खूप वेळ जायचा. आव्वांच्या सांगण्यावरून कै. किशाभाऊंनी त्याला सायकल घेऊन दिली आणि वेळ व श्रम वाचले. कालांतराने हॉटेल मॅनेजमेंटमध्ये शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुण्यातल्या जे. डब्ल्यू. मेरिएट या प्रथितयश हॉटेलमध्ये शेफ म्हणून नोकरी सुरू झाली. स्वतःच्या पायावर सक्षमपणे उभे राहिल्यावर लहानपणीची परिस्थिती न विसरता, किशाभाऊंनी केलेल्या मदतीचे स्मरण ठेवून आज एक नवी कोरी उत्तम सायकल एका होतकरू गरजू वर्धकाला देण्यासाठी म्हणून तो वर्धिनीत आला. ही सायकल स्वतःच्या नाही तर अव्वांच्याच हस्ते द्यावी अशी त्यांनी विनंती केली. अशाच वर्धकांमुळे वर्धिनीचा वटवृक्ष बहरतो आहे आणि अशा अनेक पारंब्यांनी पसरतोही आहे.

## समर्पण दिन

।। अर्पित करलो तन-मन धन, माँग रहा बलिदान वतन ।।

संस्थापक कै. किशाभाऊ पटवर्धन यांच्या कल्पनेतून आणि अथक परिश्रमातून सुरू झालेल्या वर्धिनीचा कल्पवृक्ष कायम फुलत रहावा व या सामाजिक कामाला आर्थिक हातभारासोबतच पुरेसे मनुष्यबळ मिळत रहावे म्हणून संस्थेचे सर्व कार्यकर्ते, कै. किशाभाऊंच्या जन्मदिनानिमित्त दरवर्षी समर्पण दिनाचे आयोजन करतात आणि आर्थिक समर्पणासोबतच वेळेच्या समर्पणाचा संकल्प करतात. यंदाही समर्पण दिन कार्यक्रमांमध्ये अकरावीपासून ते व्यावसायिक युवकांचा सहभाग अतुलनीय होता.

## नेतृत्व संवर्धन वर्ग

वर्धिनीच्या नियमित कामांमध्ये उत्तम कामगिरी करणाऱ्या आणि पुढे जाऊन वर्धिनीचे नेतृत्व करू शकतील अशा २५ युवकांची निवड करून त्यांना नेतृत्व संवर्धन केंद्र, ज्ञानप्रबोधिनी येथे संघटनात्मक नेतृत्व कौशल्य आणि क्षमता यांचे वर्षभर प्रशिक्षण देण्यात आले. ह्याला अनुभव उपक्रमांची जोड देण्यात आली. त्यात मुख्यतः साहस शिबिर, बीड अभ्यास दौरा आणि सहवासातून शिक्षण – स्वामी विवेकानंद अभ्यास शिबिर हे उपक्रम होते. ह्या संपूर्ण वर्गात एकूण ६० तासिका झाल्या. त्यात युवकांना स्व ओळख विकास व व्यवस्थापन, नेतृत्वगुण संवर्धन, ध्येय आणि प्रेरणा जागरण, गटबांधणी कौशल्य, नियोजन आणि कार्यवाही कौशल्य, अभ्यास व विचार कौशल्य यांचा समावेश होता.

### क्षण अभिमानाचे...

* शंभूराजे शाखेचे युवक प्रमुख **श्री. संदेश मनवल** यांची नाबार्डमध्ये 'गट अ अधिकारी' (NABARD Grade officer) म्हणून निवड झाली आहे.

**वर्धकांनी करंडक जिंकला आणि मनंदेखील... –** * टाटा मोटर्स आयोजित कबड्डी स्पर्धेमध्ये वर्धिनीच्या कबड्डी संघाने प्रतिस्पर्धी संघांशी शर्थीची लढत देऊन विजय प्राप्त केला. ज्या संघाने साखळी सामन्यात आपल्याला पराभूत केले; अंतिम सामन्यात त्याच संघाला पराभूत करत जबरदस्त विजय मिळवत आपल्या खेळाने सगळ्यांचे लक्ष तर वेधून घेतले व कौतुकाची थाप घेतली. संपूर्ण कार्यक्रम संपल्यावर आवर्जून न विसरता वर्धिनीच्या संस्काराने संपूर्ण मैदानाची स्वच्छता, खुर्च्यांची आवराआवर, यासाठी कर्मचाऱ्यांना मदत करून आपल्या वर्धक व युवकांनी सर्व टाटा मोटर्स कर्मचाऱ्यांची मनं जिंकली. विभागाचे पालक डॉ. विनेश नगरे, प्रशिक्षक जितेंद्र काळे व सतीश बिराजदार, शाखाप्रमुख पुष्कर सागडे व सर्व खेळाडू वर्धकांचे अभिनंदन.

* कलानगरी कोल्हापूर मराठी फिल्म फेस्टिव्हलमध्ये * सर्वोत्कृष्ट साहस दृश्य – चित्रपट – विसर्जन, * सर्वोत्कृष्ट विनोदी अभिनेता व * सर्वोत्कृष्ट नृत्य दिग्दर्शन – चित्रपट – ईमेल फिमेल असे पुरस्कार स्वामी विवेकानंद शाखेतील युवक **श्री. योगेश जाधव** यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटांना मिळाले.

* वर्धिनीचा युवा कार्यकर्ता **रवी महतो** याला आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत – १० km क्रॉस कंट्री, यात तिसरा क्रमांक मिळाला. **श्रेयस खंडाळे** यास पुणे जिल्हा जुनिअर अथलेटिक चॅम्पियनशिप स्पर्धेत ३००० मीटर स्टीपल चेस स्पर्धेत तिसरा क्रमांक मिळाला. पुणे जिल्हा क्रीडा परिषद व पुणे महानगरपालिका आयोजित शालेय 'कुस्ती स्पर्धा' ग्रीको रोमन स्टाईल या खेळामध्ये १९ वर्षाखालील वयोगटात राजर्षी शाहू शाखेतील युवक **विपुल आंबेकर** याने प्रथम क्रमांक (गोल्ड मेडल) व **अक्षय औजी** याने द्वितीय क्रमांक (सिल्व्हर मेडल) पटकावला व त्यांची 'पुणे विभागीय स्पर्धेसाठी' निवड झाली.

**कार्यकर्ता मासिक प्रशिक्षण –** विभागामध्ये कसबा, भवानी व लष्कर भागातील अभ्यासिकांमधील मुलांच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक विकासासाठी विविध खेळ, सत्राच्या माध्यमातून कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण घेण्यात येते. या प्रशिक्षणामध्ये अभ्यासिका प्रमुखांना मासिक पुस्तिकांचे वाटप करण्यात येते. याशिवाय विविध विषयांवर सत्रांचे आयोजन करण्यात आले. श्रीमती अंजलीताई लेले यांनी मुलांना करियरविषयी मार्गदर्शन दिले. 'मेधास्वी'च्या श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी यांनी सर्व अभ्यासिका प्रमुखांना मुलांची एकाग्रता, निरीक्षण क्षमता, कल्पकता, शोधक वृत्ती वाढावी यासाठी उपयुक्त मराठी शैक्षणिक साहित्याचे प्रशिक्षण दिले. श्री. निलेश धायरकर सरांनी अभ्यासिका प्रमुखांना ध्येय निश्चिती आणि नेतृत्व या विषयावर मार्गदर्शन केले. 'आपण बदलाचे भाग आहोत, बदल घडविणारे आहोत म्हणून आत्मविश्वास ठेवून कार्य करा', असे सांगितले.

**वार्षिक नियुक्ती कार्यक्रम २०२३ –** दि. २ जुलैला विभागाचा वार्षिक नियुक्ती कार्यक्रम संपन्न झाला. नवनियुक्त कार्यकर्त्यांना शुभेच्छा देण्यासाठी संस्थेचे कार्यवाह श्री. विश्वास कुलकर्णी, विभाग पालक श्री. संदीप मोरे, विभाग समिती सदस्य श्रीमती अनुजा पाटील, किशोरी प्रकल्प पालक श्रीमती पुष्पाताई नडे, विभाग प्रमुख श्री. उमेश माळेकर उपस्थित होते. श्री. विश्वास सरांनी संघटन आणि सामाजिक काम याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

**दूर्गराज रायगड युवक – युवती सहल –** दि. २७ ऑगस्टला आयोजित केलेल्या या सहलीत विभाग पालक, विभाग प्रमुख, समन्वयक, युवक व युवती मिळून एकूण ३२ जणांचा सहभाग होता. गडावर बालेकिल्ला, राजदरबार, तलाव, होळीचे मैदान, शिवाजी महाराजांची समाधी, जगदिश्वराचे मंदिर, अष्टप्रधान मंडळ रचना, महादरवाजा, धान्याचे कोठार हे सर्व पाहताना गड परिसर शिवरायांच्या नावाचा जयघोष आणि शिव पद्यांमधून फुलून गेला. शिवरायांच्या विचारांची प्रेरणा घेऊन कार्यकर्ते परतले.

**कार्यक्रमांची मांदियाळी**

* दि. ८ मार्च महिला दिन प्रियदर्शनी अभ्यासिकेत मुलांनी स्वतः शुभेच्छा कार्ड बनवून आईला शुभेच्छा देत तर महात्मा फुले भागात मुलांच्या पालकांचे एकत्रीकरण करून हा दिवस साजरा केला.

* २१ जूनला उत्थान विभाग, स्पर्धा परीक्षा केंद्र, समता प्रतिष्ठान यातील कार्यकर्त्यांनी मिळून जागतिक योग दिन साजरा केला.

RSB Foundation चे श्री राजीव जोशी (CA) व श्री चेतन कुसाळकर यांनी वर्धिनीला भेट दिली. सर्व अभ्यासिका प्रमुखांशी प्रश्नोत्तराच्या माध्यमातून चर्चा केली. त्यानंतर गृहभेटीसाठी अभ्यासिका सहाय्यक शालिनी गोस्वामीच्या घरी गेले. त्या भेटीदरम्यान वर्धिनी मुलांना घडविण्यासाठी, कार्यकर्ता निर्माणासाठी कशा प्रकारे कार्य करते ही बाब स्पष्ट झाल्याचे पाहुण्यांनी सांगितले. गृहसंपर्कानंतर नाना पेठेतील ज्ञानज्योती अभ्यासिकेला भेट दिली. वर्धिनी वस्ती पातळीवर उतरून आपुलकीने करत असणाऱ्या कामाचे कौतुक केले.

* छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त विभागातील तिन्ही भागात १२ मार्च ते १८ मार्च या कालावधीत शिव चरित्रावर आधारित वक्तृत्व, निबंध, चित्रकला, शिवचरित्र वाचन, प्रश्नमंजुषा अशा विविध स्पर्धा घेत शिवसप्ताह मोठ्या उत्साहाने पार पडला.

* डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंती निमित्त **पुस्तक विक्री** हा उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमामध्ये **एक व्यक्ती एक पुस्तक** अशी २५० पुस्तकांची विक्री झाली. यासोबतच भारतीय संस्कृती संवर्धन संस्था व आरोग्यभारती यांच्यातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सेवा वस्तीमध्ये आरोग्य शिबीर घेण्यात आले. वस्तीतील गरजू ६५ जणांनी शिबिराचा लाभ घेतला.

* आषाढी वारीनिमित्त वारकऱ्यांची सेवा आणि भोजन वाटपात मदत करून मुले भक्तिरसात रंगली.

* १४ ऑगस्ट २०२३ ला श्री. अमोल नाचन सरांनी भवानी पेठ भागातील ज्ञानज्योती अभ्यासिकेवर अखंड भारत याविषयी मुलांना माहिती सांगितली. प्रश्नोत्तराच्या माध्यमातून त्यांनी मुलांशी संवाद साधला. अखंड भारतात कोणकोणती राज्ये समाविष्ट होती, तसेच कोणता भाग फाळणीदरम्यान वेगळा झाला ही गोष्ट त्यांनी मुलांना अतिशय सोप्या शब्दात समजावून सांगितली.

* महात्मा फुले भाग आयोजित स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव कार्यक्रमाला दामिनी पथकाच्या श्रीमती श्वेता वलेकर व श्रीमती अनुजा पाटील उपस्थित होत्या. या कार्यक्रमाअंतर्गत स्वातंत्र्याचे महत्त्व आणि दामिनी पथकाचे काम मुलांना सांगितले. मुलींवर होणारे अत्याचार व कौटूंबिक अत्याचार रोखण्यासाठी हे पथक काम करीत आहे.

* सर्व अभ्यासिकेमधील वर्धक व वर्धिकांनी पोलिस कर्मचारी, वाहतूक पोलिस, शासकीय आरोग्य केंद्र कर्मचारी, पेट्रोल पंप, रिक्षा चालक तसेच वस्तीमधील वरिष्ठ मंडळी यांच्यासोबत रक्षाबंधन कार्यक्रम साजरा करण्यात आला.

* दिवाळीच्या निमित्ताने पणती रंगविणे, आकाशकंदील तयार करणे, ग्रीटिंग बनविणे, चित्रकला स्पर्धा, दिवाळी फराळ अशा उपक्रमांमध्ये अभ्यासिकेतील विद्यार्थी आनंदाने सहभागी झाले.

सिंहगड सहल (वार्षिक सहल) – संघटन, कार्यकर्ता जोडणी, व कार्यकर्ता जडणघडण या उद्देशाने महात्मा फुले भागातील इ. ८ वी ते १० वीतील एकूण २२ विद्यार्थी सहलीत सहभागी झाले.

एकत्रीकरण – आगरकर हायस्कूलमध्ये ८ वी ते १२ वी तील मुलांचे एकूण ४३ मुलांचे एकत्रीकरण करून विविध मैदानी खेळ घेण्यात आले. यानंतरचे एकत्रीकरण केशवराव जेधे शाळेत घेण्यात आले. या सर्व मुलांचे वर्धिनीशी नाते दृढ व्हावे यासाठी अनौपचारिक गप्पा, संवाद साधण्यात आला.

**गुणवत्ता वाढीसाठी विशेष प्रयत्न**

* गुणवत्ता पूरक शिक्षण – यावर्षी विभागाने मुलांच्या गुणवत्ता वाढीसाठी मासिक अभ्यास पुस्तिका, वर्धन कृती पुस्तिका उपक्रम घेऊन ८ वी ते १० वीच्या मुलांसाठी विशेष तासिका घेतल्या.

* उन्हाळी सुट्टीत महात्मा फुले भागातील अभ्यासिकांमधील मुलांसाठी विज्ञानाचे प्रयोग दाखविण्यात आले. ज्ञानप्रबोधिनीचा ज्ञान सेतू उपक्रमातील एक गटाने आठवड्यातून एकदा प्रयोगसत्र घेतले.

* पूर्व–पीठिका शिबीर – परीक्षेची पूर्वतयारी म्हणून ६ ऑगस्टला झालेल्या शिबीरामध्ये निलेश धायरकर सर, आदित्य घोरपडे दादा, हर्षल सोनार दादा, ऋतुजाताई नराल यांनी ८ वी, ९ वी, १० वीच्या वर्धक–वर्धिकांना अभ्यासाच्या संबंधी अतिशय महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. त्यातले काही महत्त्वाचे मुद्दे –
१) पूर्ववाचन २) श्रवण कौशल्य, निरीक्षण ३) लिखाण (टिपण व प्रश्नोत्तरे) ४) अभ्यासाची मांडणी ५) स्मरणशक्ती वाढवणे ६) स्वतःमधली कौशल्ये ओळखून ती विकसित करणे ७) सरावाचे महत्त्व ८) नियोजनपूर्वक अभ्यास ९) आरोग्याची काळजी

शिबीर समारोपाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे श्री. राहुल पुंडे सर आले होते. त्यांनी आपले माजी राष्ट्रपती श्री. अब्दुल कलाम यांच्या चरित्रातील उदाहरणे देऊन दैनंदिन वेळापत्रक, वेळेचे काटेकोर नियोजन, वाचनाचे महत्त्व आणि अभ्यासाच्या रोजच्या सरावातून वाढणारा आत्मविश्वास याचे महत्त्व सांगितले.

**नवीन पर्व के लिये नवीन प्राण चाहिये**

नवीन वर्षाचे संकल्प विभाग समितीच्या सहमतीने ठरविल्यानंतर कामाचा विस्तार व गुणवत्ता वाढावी यासाठी विभागाने जोरदार घोददौड करत कामाचा विस्तार विविध भागात केला.

भवानी माता मंदिर (संस्कार वर्ग) – लष्कर–भवानी भाग.

कामगार मैदान अभ्यासिका – महात्मा फुले विभाग, पालखी विठोबा चौक.

शिवराय अभ्यासिका – महात्मा फुले विभाग, गंज पेठेत.

मनिकर्णिका अभ्यासिका – भवानी भाग, भिमाले संकुल काशेवाडी.

श्रमिक नगर अभ्यासिका – कसबा भाग, श्रमिक नगर.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर खेळ वर्ग – कसबा भाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर.

स्वरूप अभ्यासिका – कसबा भाग, चांभार व बेलदार वस्ती.

भिमाई अभ्यासिका – कसबा भाग, २२४, मंगळवार पेठ.

**माहिती व सल्ला–मार्गदर्शन केंद्र (समुपदेशन)**

विभागाच्या उद्दिष्ट निश्चिती बैठकमध्ये येत्या वर्षभरामध्ये पुढील आयाम ठरविण्यात आले.

१. अभ्यास कौशल्ये – टिपण काढणे, मुलांची स्मरणशक्ती वाढविणारे उपक्रम ठरविणे, त्यांना गोल सेट करता येईल यासाठी प्रयत्न करणे.

२. करिअर मार्गदर्शक – नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन करणारी टीम तयार करणे.

३. किशोरी विकास प्रकल्प – वयात येणारे प्रश्न व बदल यावर जागृती करणे.

४. पालक – पालकत्वासंदर्भात विशेष उपक्रम घेणे.

**किशोरी विकास प्रकल्प**

विभागांतर्गत किशोरी गटासाठी किशोरी प्रकल्प चालविण्यात येत आहे. त्यामध्ये तलवार बाजी, यष्टी (छोटी लाकडी टिपरी) तसेच विविध विषयावरील विशेष महत्त्वपूर्ण सत्र मुलींसाठी भागशः घेतली जातात. प्रकल्पाच्या पहिल्या सत्रात खेळ अभिनय गीत, गप्पा झाल्या. श्रीमती अंजलीताई लेले यांनी किशोरवयीन मुलींमध्ये होणारे बदल यावर संवाद साधला व मुलीही मनमोकळेपणाने ताईंशी बोलल्या. ओंकार सभागृहामध्ये दादांनी मुलींना तलवार, ढाल याची माहिती दिली. तलवार हातात घेण्यापूर्वी वंदन झाले आणि मुलींचे ढाल आणि तलवार हातात घेऊन प्रारंभिक प्रशिक्षण झाले.

यष्टी प्रशिक्षण – कसबा भागातील किशोरी एकत्रिकरण झाले. मुलींची संख्या ४० पर्यंत होती. यावेळेस मुलींना यष्टी हा प्रकार शिकवण्यात आला. अभ्यासिकेतील शुभांगी यामजले व जान्हवी लांडगे ताईंनी मुलींना यष्टी उत्तमरित्या शिकविली. श्रीमती हेमांगीताई ठाकूर यांनी मुलींना आरोग्य व स्वच्छता या विषयावर मार्गदर्शन केले.

भवानी भागाचे प्रथम किशोरी एकत्रीकरण १५ ऑक्टोबरला करण्यात आले. प्रकल्प समन्वयक रणविर कांबळे यांनी मुलींना शिक्षण या विषयावर मार्गदर्शन केले.

मासिक पाळी विषयावर मार्गदर्शन – १२ ते १८ वयोगटातील मुलींना मासिक पाळी या विषयावर चित्रफित दाखवण्यात आली तसेच किशोरी समन्वयक मोनाली यंदे यांनी मासिक पाळीविषयी माहिती मुलींना सांगितली.

# उत्थान विभाग




# फिरती प्रयोगशाळा



# महिला विभाग



# पाकोळी बालवाडी




'स्व'-रूपवर्धिनी




'स्व'-रूपवर्धिनी








महिला









'स्व'-रूपदर्शन महाशिबीर २०२
# आम्ही महाशिबीरार्थी





### येथे स्वप्नं खरी होतात

कु. शालिनी गोस्वामी ही पाचवीपासूनची प्रियदर्शिनी अभ्यासिकेची वर्धिका. अतिशय लाघवी, मनमिळावू आणि बेधडक बोलणारे असे व्यक्तिमत्त्व. चालणारे उपक्रम, रोज घेतले जाणारे खेळ आणि अभ्यासाची नियमितता यामुळे तिला अभ्यासिकेचा लळा लागला व एकही दिवस सुट्टी न करता रोज अभ्यासिकेत येऊ लागली. हळू-हळू अभ्यासिकेत येणे तिच्या अंगवळणी पडले व सर्व उपक्रमांमध्ये उत्साहाने ती भाग घेऊ लागली.

यावर्षी १० वीची परीक्षा ६८ टक्के गुणांनी उत्तीर्ण झाल्यानंतर शालिनी आता अभ्यासिका प्रमुखांना मदत करते. पहिली ते पाचवीच्या मुलांना ती शिकविते. त्यांना एकत्र करून खेळ घेणे, अभ्यास घेणे, कृतीशील उपक्रम घेणे यात सहभागी असते. सध्या ती अकरावी कॉमर्समधून शिक्षण घेत आहे.

शिक्षण पूर्ण करून वकील बनण्याची तिची इच्छा आहे व समाजकार्य करायचे असे तिचे स्वप्न आहे. 'तुला वकीलच का व्हायचे आहे ?' असे विचारल्यावर ती म्हणाली की 'समाजात अनेक अशा व्यक्ती आहेत, मुली आहेत, त्या अन्यायाने पिडल्या आहेत. कित्येक वर्ष निघून जातात तरी त्यांना न्याय मिळत नाही. अशा लोकांना मला न्याय मिळवून द्यायचा आहे. ही प्रेरणा 'न्याय दंडाधिकारी' या चित्रपटातून मिळाली.'

शालिनी म्हणते, 'वर्धिनीच्या या कामातून मी संघटन शिकले. संघटन म्हणजे एकी. कुठलेही काम करताना सगळे एकजुटीने काम करतात. लहान-मोठा, गरीब-श्रीमंत असा भेद वर्धिनीत केला जात नाही हे मला विशेष आवडते.'









विभागाच्या वतीने '**संचय ऊर्जेचा, अविष्कार विज्ञानाचा**' या स्पर्धेचे आयोजन केले. दि. १५ नोव्हें. ते २४ डिसें. २०२२ या काळात व्हॉट्सॲपद्वारे शालेय गटावर रोज एक प्रश्न विचारण्यात आला. याची उत्तरे दि. ३१ डिसेंबरपर्यंत विभागाकडे जमा केली. २१३६ विद्यार्थ्यांनी छोट्या संशोधन प्रबंध स्वरूपात उत्तरे सादर केली. यापैकी २० क्रमांक निवडले. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाबरोबरच ऊर्जेची आवश्यकता, गरज भागवण्यासाठी येणाऱ्या आर्थिक प्रश्नाबरोबर इतरही प्रश्न समजावेत, याबद्दलची जागरूकता वाढावी हा हेतू होता.

**'संचय ऊर्जेचा अविष्कार विज्ञानाचा' स्पर्धेचे बक्षीस प्राप्त विद्यार्थी**

| क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | शाळेचे नाव |
|---|---|---|
| १ | मृणाली दत्तात्रय नाईकडे | नवीन माध्यमिक विद्यालय, मरकळ, तालुका खेड, जिल्हा पुणे |
| २. | कादंबरी शिवाजी जाधव | श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, किकवी, तालुका भोर, जि पुणे |
| ३. | वेदिका विनायक साकुरे | रामचंद्र गायकवाड माध्यमिक विद्यालय, दिघी, ता. हवेली, जि. पुणे |
| ४. | रिद्धी गजानन काकडे | श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, किकवी, तालुका भोर, जि पुणे |
| ५. | साक्षी विष्णूभगवान जगदाळे | श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, किकवी, तालुका भोर, जि पुणे |
| ६. | प्रज्ञा वैजीनाथ सानप | महात्मा गांधी विद्यालय, राजगुरुनगर, तालुका खेड, जिल्हा पुणे |
| ७. | संस्कृती शेटे | न्यू इंग्लिश स्कुल, उत्रोली, तालुका भोर, जि पुणे |
| ८. | आदिती अंकुश शेजाळ | रामचंद्र गायकवाड माध्यमिक विद्यालय, दिघी, ता. हवेली, जि. पुणे |
| ९. | प्रेम आमिष टेकाळे | नवोन्मेष विद्यामंदिर, चाकण, तालुका खेड, जिल्हा पुणे |
| १०. | प्रियांका मारुती गायकवाड | ज्ञानदा प्रशाला, किरकटवाडी, तालुका हवेली, जिल्हा पुणे |
| ११. | सुर्वेश विठ्ठल जामदार | बालक मंदिर संस्था इंग्लिश स्कूल, कल्याण, |
| १२. | तनिष्का निलेश खुस्पे | रामचंद्र गायकवाड माध्यमिक विद्यालय, दिघी, ता. हवेली, जि. पुणे |
| १३. | श्रावणी रत्नाकर झुंजारराव | कर्नल रवींद्र माधव ओक हायस्कूल, कल्याण |
| १४. | मयुरी संतोष शिंदे | भैरवनाथ विद्यालय, दौंदे, तालुका खेड, जिल्हा पुणे |
| १५. | प्रतीक्षा संतोष होजगे | सरस्वती विद्यालय, औदर, तालुका खेड, जिल्हा पुणे |
| १६. | श्रेया उमेश पाटोळे | भैरवनाथ विद्यालय, दौंदे, तालुका खेड, जिल्हा पुणे |
| १७. | सुजाता सहादू देवकर | ज्ञानदा प्रशाला किरकटवाडी, तालुका हवेली, जिल्हा पुणे |
| १८. | अनुष्का नारायण करपे | नवोन्मेष विद्यामंदिर, चाकण, तालुका खेड, जिल्हा पुणे |
| १९. | सई सुधीर पिंगळे | श्री. म्हाळसाकांत विद्यालय, आकुर्डी, पुणे |
| २०. | राज शशिकांत तापकीर | नवोन्मेष विद्यामंदिर, चाकण, तालुका खेड, जिल्हा पुणे |
| २१. | तेजल अशोक देशमुख | सरस्वती विद्यालय, औदर, तालुका खेड, जिल्हा पुणे |

प्रत्येक सहभागी शाळेतील पहिल्या तीन क्रमांकांना प्रोत्साहन बक्षीस व सर्व सहभागींना प्रमाणपत्र दिले. शाळेच्या पटाच्या प्रमाणात जास्त सहभागी संख्या असलेल्या – १) भैरवनाथ विद्यालय, करंजविहीरे, ता. खेड, जि. पुणे, २) नवोन्मेष विद्यालय, चाकण, ता. खेड, जि. पुणे, ३) भाऊसाहेब राऊत विद्यालय, घोटवडी, ता. खेड, जि. पुणे या शाळांना प्रथम तीन क्रमांक देण्यात आले.

**गुणगौरव समारंभ** – विभागाने घेतलेल्या 'संचय ऊर्जेचा अविष्कार विज्ञानाचा' या स्पर्धेचा गुणगौरव समारंभ दि. २४ जूनला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विज्ञान शिक्षण आणि संप्रेषण केंद्रात आयोजित करण्यात आला. ओम्कार पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर जिवाणूच्या मॉडेलचे अनावरण कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.मोहन वाणी, (संचालक – राष्ट्रीय पेशी विज्ञान केंद्र, पुणे विद्यापीठ), श्री. सुहास काणे व श्री. विश्वास कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. प्रा. डॉ. राजेंद्र देवपूरकर यांनी या केंद्राची माहिती सांगितली.



सर्व सहभागी ३५ शाळातील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना प्रा. डॉ. वाणींच्या हस्ते बक्षीस व प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच सहभागी शाळांना स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात मार्गदर्शन करताना प्रा. वाणी म्हणाले, 'स्पर्धा हे निमित्त असते. तुमच्या ज्ञानात वाढ होणे हा खरा त्यामागील हेतू असतो. विद्यार्थ्यांनी साहस, जिद्द व चिकाटीच्या जोरावर अपयशाने निराश न होता, खचून न जाता यश प्राप्त होईपर्यंत सातत्याने प्रयत्न करत राहिले पाहिजे.'

या कार्यक्रमानंतर सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी केंद्रातील विज्ञान दालनातील विविध प्रयोग पाहिले. केंद्रातील सात मार्गदर्शक या प्रयोगाची सर्वांना माहिती देत होते. या कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक आणि व वर्धिनीचे कार्यकर्ते असे १२५ जण सहभागी झाले.

## विद्यार्थी मनोगते

**प्रियांका मारुती गायकवाड,** ज्ञानदा प्रशाला, किरकिटवाडी, इ. नववी – मला विज्ञान हा विषय लहानपणापासून आवडतो. स्पर्धेचा विषय समजल्यावर मी त्यात सहभागी व्हायचे ठरवले. रोजचा एक प्रश्न विचारल्याने तीस प्रश्न कसे संपले हे लक्षात आले नाही. या प्रश्नांपैकी काही प्रश्न बॅटरीवर आधारित होते. बॅटरीचा शोध कोणी लावला एवढेच मला माहीत होते. परंतु या प्रश्नामुळे बॅटरीमध्ये सुधारणा डॅनियल यांनी केली हे मला समजले. अशी बॅटरीची खूप माहिती, पर्यावरणाचे संतुलन कसे राखले जाईल, हे समजले. इलेक्ट्रिक वाहनामुळे प्रदूषण कसे कमी होते हे लक्षात आले. काही प्रश्नांची उत्तरे शोधताना आठवी ते बारावीपर्यंतची पुस्तके वाचण्यास लागली. मी प्रश्नांची उत्तरे विस्तृत व सुबक आकृत्या काढून पूर्ण केली. तेव्हा मला बक्षीस मिळेल याची खात्री वाटत नव्हती. प्रथम क्रमांक मिळाल्याचे कळल्यावर खूप आनंद झाला. शाळेत झालेल्या सत्कारामुळे व 'स्व'-रूपवर्धिनी संस्थेमार्फत मिळालेल्या विद्या-धनम् शिष्यवृत्तीमुळे भारावून गेले आहे. मला शाळेच्या शिक्षिका व माझी आई यांचे सहकार्य मिळाले.

## कार्यशाळा व अभ्यास दौरा

विभाग प्रमुख श्री. विश्वास कुलकर्णी आणि विभागाचे पालक श्री. सुनील कुलकर्णी, श्री. सुहास काणे सर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि गटाच्या समन्वयक मनीषाताई पाठक यांच्या नेतृत्वाखाली दि. १५ जुलै ते २० जुलै **नर्मदालय संस्थेचा** अभ्यास दौरा झाला. श्री. रविराज पाटील, श्री. योगेश तांबट, सौ. दीप्ती

डोळे, कु. सई देशपांडे, सौ. रेवतीताई गोरे, श्री. ओम गोरे, श्री. शशांक बनकर, कु. साकार दिवेकर दौऱ्यात सहभागी होते.

रविवार सकाळी ११ वाजता लेपा येथे पोहचलो. नर्मदालयाच्या संस्थापिका मा. भारतीताई ठाकूर यांच्यासोबत बैठक झाली. यामध्ये सर्वांचा परिचय झाला व पुढील नियोजन करण्यात आले.

दि. १७, १८ जुलैला रामकृष्ण सारदा निकेतन हायस्कूल, लेपा पुनर्वास, ता. कासारवत, जि. खरगोन व रामकृष्ण सारदा निकेतन हायस्कूल, छोटी खरगोन, ता. कासारवत, जि. खरगोन या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी विज्ञान आणि गणित कार्यशाळा घेण्यात आली. कार्यक्रमाची सुरवात दीप्तीताई यांनी हिंदीतून विज्ञान गीत घेऊन केली. विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. मिथुन राठोड आणि मुख्याध्यापिका सौ. बिंदू कुशवाह यांनी सर्वांचे स्वागत केले.

विज्ञानातील संकल्पना स्पष्टीकरणावर विविध प्रयोगातून भर होता. यासाठी पाचवी ते सातवी विद्यार्थ्यांचे तीन गट आणि ८ वीच्या पुढील विद्यार्थ्यांचा एक गट असे गट पाडले होते. पहिला गट – ओम गोरे – गतीवर आधारित प्रयोग, दुसरा गट – शशांक बनकर – भिंगे आरसे आणि दुर्बिणीवर आधारित प्रयोग, तर तिसरा गट – सई देशपांडे – चुंबकाचे प्रकार व त्यावर आधारित प्रयोग मुलांना दाखवले. श्री. सुहास काणे सरांचे 'अंटार्क्टिका'चे अनुभव कथन तर सर्व उपक्रमात मेरूमणी होता. तेथील शिक्षकांनीही विज्ञान प्रयोगात भाग घेऊन सहकार्य केले. रोज संध्याकाळी शाखेतील मैदानी खेळ घेण्यात आले.

रोबोटिक्स, इलेक्ट्रॉन संरचना मॉडेल, विज्ञानातील एकेका संकल्पनेवर आधारित प्रयोग, दीप्तीताईंचे गणिताचे कृतीयुक्त उपक्रम, विशेषत: कागदी टोप्या तयार करून त्यातून भूमितीय संकल्पना समजावून घेणे, मैदानी खेळ, गाणी अशा अनेक उपक्रमात मुले उत्साहाने सहभागी झाली. ओम, शशांक, साकार आणि सई यांचा सहभाग उत्तम होता. सर्व संकल्पना समजावून घेऊन मुलांना स्पष्टीकरण देत होते. नाविन्यपूर्ण खेळातून गणितातील संकल्पना स्पष्ट होत होत्या. मुलामुलींच्या चेहऱ्यावरील आनंद आम्हाला काम करताना समाधान देत होता.

अशाच प्रकारचे उपक्रम श्री गणेश विद्या मंदिर ऊ. मा. विद्यालय, १३२, पळसीकर कॉलनी, इंदोर येथेही घेण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. नीता दुर्वे यांनी सर्वांचे स्वागत केले आणि समारोपात संस्थेच्या अध्यक्षा सौ. स्नेहल महाजन व सचिव श्री. नकुल उपासनिक यांनी आभार मानले.

**विज्ञान प्रयोगाचा उपक्रम**

विष्णुबुवा ब्रह्मचारी सामाजिक केंद्र, माणगाव आणि 'स्व'–रूपवर्धिनी यांच्या समन्वयाने रायगड जिल्ह्यातील कुंडलिका विद्यालय, पटनूस, माणगाव, मेहता माध्यमिक विद्यालय, विळे, माणगाव, न्यू इंग्लिश स्कूल, शिरवली, माणगाव, संत नामदेव माध्यमिक विद्यालय, नांदलगाव, माणगाव, रायगड माध्यमिक विद्यालय, कांदलगाव, माणगाव, आदर्श विद्यालय, कुडली, माणगाव, माध्यमिक विद्यालय, वांगणी, रोहा या शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये प्रयोगांच्या माध्यमातून विज्ञानाची आवड निर्माण व्हावी या हेतूने विद्यार्थ्यांना प्रयोग करून दाखवण्यात आले.

या अंतर्गत आठवीतील विद्यार्थ्यांना आर्किमिडीजचे तत्त्व, विद्युत बेल, विद्युत सुवाहक आणि दुर्वाहक, ड्युएल स्विच विद्युत जोडणी, व्होल्ट मीटर आणि रेग्युलेटर यांचे कार्य तसेच रक्तदाब यंत्राची माहिती करून दिली. नववीतील विद्यार्थ्यांसाठी आम्ल, आम्लारी आणि त्यांचा सामू (pH) तपासण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवले तर दहावीतील विद्यार्थ्यांसाठी भिंगे आणि त्यांचा उपयोग, दुर्बीण, साधा व संयुक्त सूक्ष्मदर्शी, होलोग्राम यांचे कार्य कशा प्रकारे चालते याची विस्तृत माहिती दिली. विद्यार्थ्यांनी येणाऱ्या विजयादशमीच्या अनुषंगाने व्यक्तिगत संकल्प केले – रोज ५ इंग्रजी शब्द पाठ करणे, हस्ताक्षर सुधारण्यासाठी नियमित शुद्धलेखन लिहिणे.


या उपक्रमात वर्धिनीच्या कार्यकर्त्यांबरोबर सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि ६४६ विद्यार्थी, विष्णुबुवा ब्रह्मचारी सामाजिक केंद्राचे कार्यकर्ते सहभागी झाले.

# समुपदेशन विभाग

## समुपदेशन विभागाचे मुख्य उद्दिष्ट

विविध कौशल्याची जाणीव करून देणे आणि मानसिकरित्या वर्धक-वर्धिकेला सक्षम बनवणे हे विभागाचे मुख्य ध्येय आहे. एका दृष्टिक्षेपात २०२३ मधील विभागाचे काम -








ध्येय पुर्ततेसाठी विभागाने यावर्षात खालील मुख्य चार विषयात काम केले.

१. वैयक्तिक समुपदेशन - शाखा विभाग, उत्थान विभाग, स्पर्धा परीक्षा केंद्र, रुग्ण सहाय्यक वर्ग या उपक्रमांसाठी.

२. विविध मानसशास्त्रीय चाचण्या - बुद्धिमापन चाचणी, कल चाचणी.

३. पालकत्व - शाखा विभाग, बालवाडी, इतर शाळा यातील पालकांसाठी.

४. वयात येताना - शाखा विभागातील युवा, रुग्ण सहाय्यक वर्ग, इतर शाळा, कार्यकर्ते.

## वैयक्तिक समुपदेशन

**अनुभव -** ● मी प्रसाद दत्तात्रय दासरी. ५ वीत असल्यापासून शाखेत येत आहे. शाखेमुळे मला आजपर्यंत अनेक प्रकारची मदत झाली आहे. माझा शारीरिक बौद्धिक आणि मानसिक विकास हा फक्त शाखेमुळे झाला. कोरोनाच्या भयंकर काळानंतर घरची आर्थिक परिस्थिती खूप खालावली होती. यामुळे मानसिकदृष्ट्या मी खचलो होतो. कॉलेजच्या ॲडमिशनसाठी पुरेसे पैसे नव्हते. त्यामुळे महाविद्यालयात प्रवेश घेणे अवघड झाले होते. समुपदेशन विभागातील ताईंशी झालेल्या मुक्त संवादाने मी सावरलो. त्यांनी मला करिअरबाबतही मार्गदर्शन केले आणि मग वर्धिनीने दिलेल्या आर्थिक मदतीमुळे मी ठरवलेल्या क्षेत्रात व महाविद्यालयात प्रवेश घेऊ शकलो.

● मी आर.एस.पी., स्पर्धा परीक्षा केंद्राच्या २०२०-२१ बॅचचा विद्यार्थी. २०२२ च्या परीक्षेसाठी पात्र झाल्यावर मला मनावर परीक्षेच्या भीतीने दडपण आले होते. या भीतीचा माझ्या अभ्यासावर परिणाम होऊ लागला. तेव्हा मित्राने सुचवल्यामुळे समुपदेशन विभागातील ताईंशी संवाद साधला. परीक्षेच्या आधी मनमोकळा संवाद झाल्याने माझ्या मनावरचा ताण खूप कमी झाला आणि आत्मविश्वासाने मी परीक्षा देऊ शकले. योग्य वेळी मिळालेल्या

मार्गदर्शनाचा मला निश्चितच फायदा झाला. (हेतूतः नाव लिहिलेले नाही)


वैयक्तिक समुपदेशनात संवाद किती महत्त्वाचा आहे हे वरील दोन्ही अनुभव वाचल्यावर लक्षात येईल. **संभाषण आपल्या रोजच्या जगण्यात महत्त्वाची भूमिका बजावते आणि संवाद हा त्याचा आधार असतो.** विचार व्यक्त करण्यासाठी, परस्पर संबंध निर्माण होण्यासाठी संभाषण उपयोगी ठरते. संघर्ष टळतो, गैरसमज रहात नाहीत, अंतर भरून निघते, नातेसंबंध मजबूत आणि अधिक जोडले जातात. सामंजस्यपूर्ण समाज निर्माण होण्यासाठी हे गरजेचे आहे. म्हणूनच विभागाने वैयक्तिक संवादातून वर्तणूक समस्या, मानसिक ताण, कौटुंबिक समस्या व करियर मार्गदर्शन या महत्त्वाच्या बाबींवर काम केले.




वर्तणूक समस्या – ६



मानसिक ताण – १०



कौटुंबिक समस्या – १९



करीयर मार्गदर्शन – ११५

### विविध मानसशास्त्रीय चाचण्या

शाखेत गुणवत्तापूर्ण वर्धक वर्धिकांची निवड व्हावी याकरिता बुद्धिमापन चाचणी घेतली जाते. २०१९ सालापासून समुपदेशन विभागाने अभ्यासपूर्वक चाचणीची यास जोड दिली. या चाचणीद्वारे मुलांचे भाषिक ज्ञान, संख्याज्ञान, आकलन तपासले जाते. एकूण १६८९ मुलांची विविध शाळांमधून चाचणी झाली.

### वयात येताना – युवा गट

**अभिप्राय –** श्रुतिका पेटकर, सेनापती बापट विद्यालय, माले – इ. ९ वी

मेघाताईंनी आमच्या वर्गात महिला दिनाची माहिती सांगून मैत्री, आकर्षण, ओळख स्पर्श व प्रसारमाध्यम यावर सोप्या व मनाला पोहोचेल अशा शब्दात मार्गदर्शन केले. त्यानंतर वर्गात सर्व मुलींनी गटचर्चेत मोकळेपणाने भाग घेतला. त्यांनी सांगितलेल्या गोष्टी, सवयी रोजच्या दिनचर्येत वापरायचा मी प्रयत्न करणार आहे. अभ्यासाबरोबर घरी रोजच्या कामात आईला मदतही महत्त्वाची आहे हे लक्षात आले. त्यांनी सांगितलेल्या उदाहरणातून आईचे आम्हाला मोठे करण्यासाठीची धडपड लक्षात आली. मैत्री करताना, समाजात वावरताना संयम किती महत्त्वाचा आहे हे लक्षात आले. ताईंच्या सतत मिळणाऱ्या मार्गदर्शनामुळे त्यांच्याशी व मधुबाला ताईंशी जवळीक निर्माण झाली आहे.

### विविध विषयांवरील सत्रांचे आयोजन

**आरोग्य आणि फिटनेस –** डॉ. विनेश नगरे सरांनी विभागातील सर्व कार्यकर्त्यांसाठी आरोग्य आणि फिटनेस या विषयावर सत्र घेतले. सर्वात प्रथम त्यांनी आरोग्याची व्याख्या काय आहे हे सांगितले. मानसिक आणि शारीरिक क्षमता चांगली असावी, कुठल्याही वयोगटाशी जुळवून घेता आले पाहिजे व झोप चांगली झाली पाहिजे याला आरोग्य म्हणता येईल. शरीराला धारण करणारे तीन दोष, वात, पित्त आणि कफ याचे काय प्राधान्य आहे ते त्यांनी

सांगितले. इंद्रिय म्हणजेच ज्ञानेन्द्रिय आणि कार्मेंद्रिय आणि त्याचबरोबर मन, आत्मा प्रसन्न असणे हे निरोगी माणसाचे लक्षण आहे असे देखील सांगितले. वेळेवर जेवण हे अत्यंत महत्त्वाचे असते, नाहीतर भूक न लागणे, अपचन, शरीराला आवश्यक असणारे घटकांचे शरीरात शोषण न होणे, परिणामी अपचित घटकद्रव्य शरीरात साठल्याने वेगवेगळ्या आजारांची निर्मिती होऊ शकते, याकडे त्यांनी लक्ष वेधले. जेवताना घाईगडबडीने न जेवता सावकाश छोटे छोटे घास घेणे व दोन घासात अंतर ठेवणे हे सुद्धा आवश्यक आहे. वेळेवर झोपणे व सकाळी लवकर उठणे शरीरासाठी किती फायदेशीर ठरते हे त्यांनी टेनिसमधील उत्तम खेळाडू रॉजर फेडरर याचे उदाहरण देऊन सांगितले. अशा प्रकारे सरांनी आरोग्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व गोष्टींची माहिती सांगितली.

| वक्ते | विषय |
|---|---|
| श्री. वैभव धोत्रे | अभ्यास कौशल्यांचा परिचय, आपले आरोग्य, १० वी ची पूर्व तयारी, महत्त्व शाखेचे, ओळख 'स्व' ची, उद्दिष्ट निश्चिती, ध्येय निश्चिती |
| डॉ. विनेश नगरे | आरोग्य आणि फिटनेस |
| श्री. शिरीष पटवर्धन | समन्वय |
| सौ. मेघा नगरे | किशोरवयीन वयातील अडचणी, अभ्यास कौशल्यांचा परिचय, स्व परिचय, मानसिक आरोग्य |

**समन्वय**

श्री. शिरीष पटवर्धन सर यांनी सर्व विभागातील कार्यकर्त्यांसाठी 'समन्वय' या विषयावरील सत्र घेतले. एकत्रीकरणातून एकमेकांचे विचार कळतात. काम करणारी प्रत्येक व्यक्ती महत्त्वाची आहे. सगळ्यांनी मिळून काम केले पाहिजे तेव्हा त्या कामाची उत्तमता दिसते. स्वतःच्या कामाइतकेच महत्त्व इतरांच्या कामाला सुद्धा दिले पाहिजे. आपला विभाग सोडून इतर विभागाशी आपला संपर्क वाढवला पाहिजे हे स्पष्ट होण्यासाठी सरांनी मुंग्यांवरची एक छोटी फिल्म दाखवली. कोणालाही कुठलेही नियम सांगितले नव्हते, तरी सुद्धा त्या मुंग्या 'एकी हेच बळ' असे समजून आपले ध्येय पूर्ण करण्यात मग्न होत्या. काम करताना एकमेकांवरचा विश्वास हा खूप महत्त्वाचा आहे हे त्यातून लक्षात येत होते. सहजतेने समन्वयता साधता येते, काम करताना तक्रार न करता ते काम कसे सोप्या पद्धतीने आपण लवकर करू शकतो यासाठी मार्ग शोधला पाहिजे. सत्राच्या शेवटी सरांनी सांगितलेल्या कथेतून असे समजले की परिस्थितीनुसार आपली जबाबदारी स्वीकारण्याची तयारी असली पाहिजे. कुठलेही काम करताना सर्वांचा सहभाग घेतला पाहिजे व कुठलेही काम कमी दर्जाचे व आपले काम उच्च दर्जाचे असे होत नाही. वेळप्रसंगी सर्व काम आपलेच आहे असे समजून केले पाहिजे. आपण किती काम केले हे महत्त्वाचे नसून त्या कामातील मनःपूर्वक सहभाग महत्त्वाचा आहे. आपण स्वतः बदललो तर समोरचा बदलतो. संवादातील भाषा बदलते व आपले काम छान सहजतेने समन्वयतेने पार पडते.

**पालक कट्टा**

अनेक शाळांमध्ये पालकांबरोबर काम करत असताना काही गोष्टी जाणवल्या, त्या म्हणजे पालकाने काळानुसार स्वतःमध्ये बदल करायला हवा. आनंददायी पालकत्व हे महत्त्वाचे आणि विकासाच्या प्रक्रियेचे माध्यम आहे. सुखी आणि समृद्ध परिवारातील आदर्श पालकत्वात, पालकांना त्यांच्या मुलांचे स्वास्थ्यपूर्ण, सकारात्मक आणि सुखद जीवन असणे हे मुख्य लक्ष्य असते. आनंददायी पालकत्वात पालकांना त्यांच्या मुलांवरील प्रेम आणि नाते संबंधाचं अद्वितीय महत्त्व असते. हे महत्त्व लक्षात येण्यासाठी पुढील व्याख्याने झाली –

| व्याख्याते | विषय |
|---|---|
| पुष्पा नडे | पालकांची भूमिका |
| मेघा नगरे, वनिता जगताप | पालकसभा आढावा |
| वैभव धोत्रे | मुलांना समजून घेताना |
| मेघा नगरे | आनंदमय पालकत्व |

**अभिप्राय –** सौ. अनिता अनिल गिरमे, स्वामी दयानंद सरस्वती शाखा, अप्पर इंदिरानगर

माझी दोन्हीही मुले स्वामी दयानंद शाखेत जातात. शाखेतील प्रत्येक दादाने दिलेली शिकवण, लावलेली शिस्त माझ्या मुलांना पावलोपावली उपयोगी पडते. १० वी नंतर काय ? असा मला मोठा प्रश्न पडला होता, पण समुपदेशन विभागाने घेतलेल्या कलचाचणीमुळे व वेळोवेळी झालेल्या व्याख्यानांमुळे मला व मुलांना योग्य मार्गदर्शन मिळाले. कलचाचणीमुळे आम्हाला करियर ठरवताना सोपे गेले आणि मुलांनी ठरवलेल्या करियरबद्दल ताईंचे योग्य मार्गदर्शन मिळाले व याबद्दल वर्धिनीचे व समुपदेशन विभागाचे खूप धन्यवाद.

**प्रशिक्षण कार्यकर्त्यांसाठी**

REBT Training (Rational Emotive Behavioral Therapy) – या कार्यशाळेसाठी ज्ञानप्रबोधिनी प्रशालेत वर्धिनीच्या सर्व विभागातील एकूण २५ कार्यकर्ते (दि. १ ते ५ डिसेंबर) सहभागी झाले. कार्यशाळेत गटचर्चा, कृतीसत्रे, प्रसंगनाट्य सादरीकरण व पद्य यातून 'स्व'ची ओळख, काम करताना भावनांचे समायोजन कसे करावे अशा अनेक गोष्टी स्पष्ट केल्या गेल्या. या प्रशिक्षणातून सर्वांना आपल्या भावनांच्या आणि विचारांच्या सागराला कसे शांत ठेवायचे याचे तंत्र व त्याचे समायोजन कसे करता येईल याचे उत्तर मिळाले.

'भाव अंतरीचे हळवे, जसे जुई फूल, स्वतःच्याच सुगंधाची स्वतःलाच भूल'

या कवितेच्या ओळींप्रमाणे स्वतःच्या भावनांची, विचारांची, विवेकपूर्ण ओळख जाणून घेण्याचा प्रयत्न या प्रशिक्षणाच्या माध्यमातून झाला. हळवेपणा, राग, चिडचिड, संताप, दुःख, आनंद या भावना मदतीसाठी कसे काम करतात हे लक्षात आले. व्यक्ती, वेळ आणि घटना यांचा योग्य ताळमेळ साधणे गरजेचे आहे हे कृतीसत्रातून लक्षात आले. प्रत्येक व्यक्ती शंभर टक्के बरोबर असते असे नाही तर व्यक्ती तितक्या प्रकृती हे लक्षात घेऊन स्वतःच्या मतावर ठाम असणे व ते पटवून सांगणे गरजेचे असते. हे करताना काही वेळा दोन पावले मागे यायला लागतात. स्वीकारशीलता वाढवावी लागते, आपल्यातील कमतरता नुसत्याच जाणून न घेता त्या स्वीकारून आपल्यात बदल करणे गरजेचे असते या गोष्टी गटचर्चेतून लक्षात आल्या. या प्रशिक्षणामुळे काम करताना येणारे वेगवेगळे अनुभव सहजतेने स्वीकारून काम करण्यासाठीची योग्य दिशा व विचार मिळाला.







देश–प्रेमी जागता, भेदभाव संपती, संघ–शक्ती पाहता, स्वार्थ सारे लोपती
बंधु बंधु चालले, एक ध्येय जीवनी... मातृभूस वंदुनी वीरवेश लेवुनी, शूर चालले रणी ।।

केंद्राचे उद्घाटन एप्रिल २०२३ मध्ये झाले तरी यापूर्वी १ सप्टेंबर २०२१ पासून चऱ्होलीतील डॉ. विकास गायकवाड यांच्या साईश्रद्धा हॉस्पिटलमध्ये रुग्ण सहाय्यक वर्गाला सुरुवात झाली. सात मुलींची पहिली बॅच २०२२ ला पूर्ण झाली आणि त्यापैकी चौघीजणी दवाखान्यात काम करू लागल्या. २०२२-२३ मध्ये नवीन संकुलातील दुसरी बॅच अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करून ऑनलाईन पद्धतीने सुरू झाली. या वर्गाच्या सहाही विद्यार्थिनी उत्तम गुणांनी परीक्षा पास झाल्या व त्यातील चौघीजणी नोकरी करीत आहेत.

२०२३-२४ च्या वर्गासाठी कार्यकर्त्यांनी परिसरातील वाड्या-वस्त्या निवासी सोसायट्यांमध्ये संपर्क केला आणि त्यातून महाराष्ट्र राज्य शासनाच्या मान्यता मिळालेल्या G.N.M. Asst. वर्गासाठी दहा व रुग्ण सहाय्यक वर्गासाठी ४ नवीन प्रशिक्षणार्थींनी प्रवेश घेतला. १० जुलै २०२३ पासून हे दोन्ही वर्ग सुरू झाले. त्याचबरोबर कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या सहाय्याने संकुलात फॅशन डिझायनिंगच्या दोन तुकड्या झाल्या आणि ११ महिलांनी याचा लाभ घेतला.

नव्याने सुरू झालेल्या केंद्रात अनेक मान्यवरांच्या भेटी झाल्या. त्यातील काही प्रमुख - मा. भैय्याजी जोशी, मा. आमदार श्री. चंद्रकांतदादा पाटील, मा. श्री. महेशदादा लांडगे, मा. श्री. अनिरुद्ध देशपांडे, मा. श्री. भव्या शहा या सर्वांच्या शुभेच्छांनी संस्थेची वाटचाल होत आहे.



**ऋणानुबंध असे हा मोठा...**

कै. यशवंत गणेश पटवर्धन हे वर्धिनीच्या कामाशी आणि त्याहीपेक्षा वर्धिनीचे संस्थापक कै. किशाभाऊ पटवर्धन सरांशी गेल्या ५० वर्षांहून अधिक काळ जोडलेले होते. त्यामुळे वर्धिनीच्या स्थापनेपासून ते तिच्या सर्व विस्ताराचे ते स्वतः जवळूनचे साक्षीदार होते. स्टेट बँकेत अधिकारी असलेल्या कै. यशवंत पटवर्धन यांनी अत्यंत कष्ट करून स्वतःचे कर्तृत्व घडवले होते. वर्धिनीला शक्य तेव्हा आणि शक्य तेवढी अधिकाधिक आर्थिक मदत त्यांनी केली होती.



चऱ्होली येथे सुरू होत असलेल्या कौशल्य विकास प्रशिक्षण, हा प्रकल्प पाहायला यायचे त्यांनी नक्की ठरवले होते. पण दुर्दैवाने कोरोना काळात त्यांचे अकस्मात दुःखद निधन झाले.

त्यांच्या निधनानंतर त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांच्या पत्नी श्रीमती अमितताताई पटवर्धन यांनी चऱ्होली प्रकल्पाला १० लाख रुपयांची फिजिओथेरपी विभागासाठी देणगी दिली. दि. ३ नोव्हेंबरला त्या स्वतः, त्यांचे बंधू व कै. यशवंत पटवर्धन यांचे मामेभाऊ यांनी चऱ्होली केंद्राला भेट दिली. त्यांच्या उपस्थितीत **फिजिओथेरपी लॅबला कै. यशवंत गणेश पटवर्धन यांचे नाव देण्यात आले.** वर्धिनीच्या कामाच्या विस्ताराला अशा दात्यांमुळे पाठबळ मिळत आहे.

महिला सबलीकरण, संघटन या उद्देशाने १९८९ मध्ये महिला विभाग कार्यरत झाला. त्यातील विभागांचा आढावा.

**रुग्ण सहाय्यक वर्ग**

**शिबिर –** दि. ३ ते ५ फेब्रुवारीला झालेल्या निवासी शिबिरात पुणे, माले व चऱ्होली या तीनही वर्गांतील (२०२२–२३) ७० मुली सहभागी झाल्या.

कार्यक्रम पत्रिका

| वक्ते | विषय |
|---|---|
| दि. ३ फेब्रुवारी – सौ. नंदिनी जाधव | अंधश्रद्धा |
| डॉ. लीना बावडेकर | मसाल्याचा डबा |
| सौ. दीपाली अवकाळे | कुटुंब आणि मी |
| दि. ४ फेब्रुवारी – श्री. किशोर काळोखे | माझे करियर घडवताना |
| डॉ. माधव केळकर | अतिदक्षता विभागात काम कसे करावे ? |
| सौ. नेहा दिवे | मुलाखतीला सामोरे जाताना |

व्याख्यानातील काही विशेष मुद्दे –

* सौ. नंदिनीताईंनी विषय मांडताना काही प्रात्यक्षिके करून दाखवली. त्यात मुलींनाही सहभागी करून घेतले आणि त्यामुळे त्यातील विज्ञान सगळ्यांच्या लक्षात आले. त्या म्हणाल्या, ''सर्वत्र दिसणाऱ्या चमत्कारांमागे हातचलाखी जास्त असते. त्यामागील विज्ञान आणि तंत्र आपण स्वतः ओळखून वागलं पाहिजे. श्रद्धा असावी पण तिला अंधश्रद्धेचे स्वरूप देऊ नका. आत्मविश्वास वाढवून तुम्ही ठरवलेले ध्येय गाठा आणि यशस्वी व्हा.''

* प्रत्येक महिलेचे स्वयंपाकघराशी अतूट नाते असते. पदार्थ बनवताना अनेक प्रकारचे मसाले वापरले जातात. त्याचे औषधी गुणधर्म डॉ. लीनाताईंनी सोप्या भाषेत सहज संवादातून स्पष्ट केले. रोजच्या वापरातला मसाल्याचा डबा हा औषधाचा बटवा आहे, त्याचा आपण वापर केला पाहिजे हे सगळ्यांच्या लक्षात आले.

* सौ. दीपालीताईंनी संवादातून, खेळांतून, कुटुंबात आणि समाजात माझे स्थान कसं असलं पाहिजे, त्यासाठी माझे आचार–विचार कसे असावेत हे सांगितले. कुटुंबात मला स्वातंत्र्य हवे असेल तर मी आर्थिकदृष्ट्या, शारीरिकदृष्ट्या आणि भावनिकदृष्ट्या स्वतंत्र असली पाहिजे आणि यासाठी मी विचारपूर्वक, कृतीपूर्वक स्वतःला वाढवायला हवे असे प्रतिपादन केले.

* श्री. किशोर काळोखे सरांनी नर्सिंग पेशातील 'सेवा व समाधान' या महत्त्वाच्या गोष्टी मुलींशी प्रश्नोत्तरातून स्पष्ट केल्या. काही प्रेरणादायी कविता, गाणी एकत्रित म्हटल्याने विषय नीट पोहोचला.

ते म्हणाले, 'आपण जेव्हा रुग्णाशी आत्मियतेने, प्रेमाने बोलत असतो ते एक प्रकारे त्याचे समुपदेशन असते. होणाऱ्या त्रासातून तो लवकर बरा होतो. ज्याप्रमाणे आपल्या वर्तणुकीमुळे आपले कुटुंब, घर ओळखले जाते त्याप्रमाणेच आपण शिकत असलेली संस्था आपल्या कामाने, सर्व कार्यकर्त्यांमुळे मोठी होते, तिची खरी ओळख

समाजाला पोहोचते. म्हणून हे लक्षात असू द्या 'माझी ओळख म्हणजे माझे काम.''

* डॉ. माधव केळकर सरांनी ICU - अतिदक्षता विभागातल्या कामाची ओळख व जबाबदारी मुलींना स्पष्ट केली. याचा उपयोग त्यांना कोर्स पूर्ण झाल्यावर निश्चितच होईल.

* शिबिराचा समारोप करताना सौ. नेहा दिवे ताईंनी मुलाखतीचे तंत्र व मंत्र तसेच नोकरीसाठी अर्ज कसा करावा हे सांगितले. दवाखान्यात काम करताना काळजी बाळगून आणि निरीक्षण करून सतत शिकत रहा. नवीन साधनांची/विषयांची ओळख करून घ्या. त्यासाठीचे अभ्यासवर्ग करायची संधी सोडू नका असेही सांगितले.

दि. ५ फेब्रुवारीला पुणे दर्शन सहलीने शिबिराची सांगता झाली. पुण्यातील आगाखान पॅलेस, इस्कॉन मंदिर, तळजाई मंदिर व टेकडी, सिंबायोसिसचे डॉ. आंबेडकर संग्रहालय, चतुःश्रुंगी मंदिर ही ठिकाणे सर्वांनी बघितली.

बऱ्याच विद्यार्थिनींना सहल आणि शिबिर हा अनुभव नवीन होता. शिबिरातून सर्व वर्गातील मुलींची ओळख झाली. एकत्रितपणे सर्व व्यवस्थांमध्ये काम करताना, विविध गुणदर्शन कार्यक्रमातून वेगळे गुण अनुभवतानाचा आनंद सगळ्यांना मिळाला.

**शुभेच्छा समारंभ**

दि. १५ एप्रिलला पुणे व चऱ्होली वर्गातील विद्यार्थिनींसाठी शुभेच्छा समारंभ झाला. वर्गाच्या माजी विद्यार्थिनींचा मुलींशी संवाद झाला. **सौ. सोनाली कुलकर्णी ही सध्या पर्ल हॉस्पिटलमध्ये IVF साठी मार्केटिंग विभागात काम करते. ती म्हणाली, ''या कोर्समुळे आत्मविश्वासाने मुलाखत देऊ शकले आणि येणाऱ्या स्त्रियांना योग्य मार्गदर्शन करू शकते.' कु. ऋतुजा झांजे के.ई.एम. हॉस्पिटलच्या IVF Centre मध्ये नोकरी करते. या विषयातले पुढचे ट्रेनिंग इथल्या कोर्समुळे सोपे झाले. त्यामुळे ती सेंटरची सगळ्यात विश्वासू, हुशार आणि माहितगार नर्स म्हणून ओळखली जाते.** याचा आम्हाला पण अभिमान वाटतो.

वर्गात मुली मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या,

● ''शिक्षकांनी सोप्या पद्धतीने सर्व विषय समजावून सांगितले. त्यामुळे पुढे GNM करायचे ठरवले आहे.

● हॉस्पिटलमधील कामाच्या अनुभवातून नर्सिंग विषयाची खोली, व्याप्ती लक्षात आली.

● खेळीमेळीच्या वातावरणात १० पेक्षा जास्त वर्षानंतरही शिकताना आत्मविश्वास वाढला. घरच्या अडचणींचा विसर पडला आणि आता आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होणार याचा वेगळाच आनंद आहे.

● याआधी शाळा ते घर ह्यापुरतेच मी वावरत होते. पण या वर्गात आल्यावर वेगवेगळ्या स्वभावाच्या, वेगवेगळ्या परिस्थितीतून आलेल्या मैत्रिणी मिळाल्या आणि समाजाची वेगळी ओळख झाली.

● १२ वी झाल्यावर घरी फक्त लग्नाचा विषय चर्चिला जात होता. पण आता हा वर्ग पूर्ण झाल्यावर मी माझ्या पायावर उभी राहणार यामुळे तो विषय बंद झाला आणि मला प्रोत्साहन मिळाले.''

दि. १९ एप्रिलला माले वर्गाच्या शुभेच्छा समारंभाला डॉ. नीता मंडलेचा (श्री गणेश हॉस्पिटल, घोटावडे फाटा) या प्रमुख पाहुण्या म्हणून तर टाटा पॉवरच्या अधिकारी सौ. कल्पना हबडे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

डॉ. नीताताई म्हणाल्या, ''मुलगी म्हणून वाढताना लहानपणापासून समाजाकडून खूप चांगले-वाईट अनुभव मिळाले आणि त्यामुळेच महिलांच्या समस्या सोडवताना खूप वेगळा आनंद मिळतो. आयुष्यभर नवनवीन शिकत रहा. काम करताना तुमच्या नजरेत आत्मविश्वास दिसला पाहिजे. या कामामुळे अनेक प्रकारची माणसं संपर्कात येतील पण ती ओळखायला, वाचायला शिका.''

मनोगत व्यक्त करताना मुली म्हणाल्या -

● ''कुंभाराप्रमाणे या वर्गाने आम्हाला चांगले घडवले. काम करताना समाजाची ओळख झाली. आत्मविश्वासाने काम करू शकते.

● हॉस्टेलमुळे समजूतदारपणा वाढला. कामाचे, अभ्यासाचे नियोजन करायला शिकलो.

● नर्सिंग विषयाची आवड निर्माण झाली. त्यामुळे नोकरी करून B.Sc. नर्सिंग करायचे ठरवले आहे.

## प्रशस्तीपत्रक वितरण

दि. १४ ऑगस्टला २०२२-२३ च्या पुणे व माले वर्गाचा प्रशस्तीपत्रक वितरण कार्यक्रम डॉ. नीता मंडलेचा यांच्या उपस्थितीत झाला. कार्यक्रमाला टाटा पॉवरच्या अधिकारी सौ. कल्पनाताई हबडे व वर्धिनीचे श्री. विश्वास कुलकर्णी, श्रीमती पुष्पाताई नडे व मंजुषा कुलकर्णी उपस्थित होते. मुलींनी मनोगतातून वर्षभर झालेल्या विविध उपक्रमांचे व रुग्णालयातील कामांचे अनुभव सांगितले. डॉक्टरांनी मुलींना मार्गदर्शन करताना शिकत असताना दवाखान्यातील कामाचे महत्त्व काय असते हे स्पष्ट केले. तसेच यापुढेही मिळालेल्या प्रत्येक संधीचा उपयोग स्वतःचे ज्ञान वाढवण्यासाठी करीत रहा हे सांगितले. पाहुण्यांच्या हस्ते सर्व मुलींना प्रशस्तीपत्रकाचे वितरण झाले.

● विभागातून प्रथम - माले - तन्वी सुतार, पुणे - अरुणा घोरपडे, चऱ्होली - सुवर्णा गायकवाड

● विषयात प्रथम - प्रसुतीशास्त्र - मानसी भोसले, शरीरशास्त्र - स्नेहा कांबळे, आरोग्य संवर्धन - प्रणाली आंबेकर.

● आदर्श विद्यार्थिनी - पुणे - अश्विनी लोहार, माले - मीरा भोंडणे.

● उत्तेजनार्थ - पुणे - शरीफा सय्यद, माले - दिया भुवड



२०२३-२४ शैक्षणिक वर्षासाठी रुग्ण सहाय्यक पुणे वर्गात २५ मुली, माले वर्गात १५ मुली, चऱ्होली वर्गात ५ मुलींनी प्रवेश घेतला आहे. हे वर्ग जुलै महिन्यात सुरू झाले.

## सामाजिक रक्षाबंधन

**पुणे वर्ग –** रक्षाबंधनाच्या दिवशी सर्वजणी पुणे रेल्वे स्टेशनवरील रेल्वे इंजिन चालकांना राखी बांधण्यासाठी गेल्या. या सर्वांचे रक्षाबंधन घरी होत नाही, त्यामुळे मुलींनी राखी बांधल्यावर सण साजरा झाल्याचा आनंद सर्वांना मिळाला. हजारो प्रवाशांना इच्छुक स्थळी पोचवून त्यांचा प्रवास सुखकर करणाऱ्या या 'चक्रधर स्वामीं'च्या रोजच्या कामाची ओळख मुलींना झाली. काही मुलींनी पहिल्यांदाच रेल्वे स्टेशन पाहिले.

**माले वर्ग –** परिसरातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये जाऊन मुलींनी तेथील डॉक्टर, स्टाफ, पेशंट व आय.टी.आय.मधील विद्यार्थी यांना राख्या बांधल्या. कामासाठी घर सोडून आलेल्या सुरक्षारक्षकांना राख्या बांधल्यावर त्यांना आनंद झाला.

## अभ्यास सहल

पुणे, माले, चऱ्होली वर्गातील सर्व विद्यार्थ्यांची (संख्या ५०) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील, विज्ञान शिक्षण संप्रेषण केंद्रात दि. १ नोव्हेंबर रोजी अभ्यास सहल झाली. रक्ताभिसरण, पर्यावरण, महापूर या विषयांचे दृकश्राव्य मॉडेल शो तसेच स्टॅटिक इलेक्ट्रिसिटी, डीएनए मॉडेल, ध्वनी लहरी या विषयांवरील प्रयोग त्यांनी बघितले. काही प्रयोग परत स्वतः करून बघितल्याने व शरीरशास्त्रातील काही संस्थांची मॉडेल हाताळल्याने अभ्यासातील संकल्पना स्पष्ट होण्यास मदत झाली. वर्धिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते डॉ. देवपूरकर सरांच्या मार्गदर्शनाचा लाभ सर्वांना मिळाला. तसेच केंद्रातील प्रगती कदम व शमिका जाधव यांनी सर्व प्रयोग समजावून सांगितले व मुला-मुलींच्या शंकांचे निरसन केले.

**यशस्विता का राज**

जीवन आव्हानयुक्त असणं चांगलं कारण आव्हानांचा स्वीकार करून त्याचा यशस्वी सामना करून आपल्या जीवनाचा अपेक्षित असा झालेला विकास पाहण्यातील आनंद वेगळाच असतो. ह्याचे जिवंत उदाहरण म्हणजे **विराज गायकवाड.** घरची परिस्थिती बिकट म्हणून नोकरीच्या शोधात गाव सोडून मुंबईमध्ये आला. विषम परिस्थितीत झगडण्याचा संकल्प करत एका लहान दवाखान्यात काम करू लागला. अशातच विराजच्या मावशीने त्याला 'स्व'-रूपवर्धिनी मध्ये सुरु असलेल्या रुग्ण सहाय्यक वर्गाबद्दल माहिती दिली. कोर्सला प्रवेश घेण्यासाठी विराज मुंबई सोडून पुण्यात आला आणि त्याने वर्गाला प्रवेश घेतला खरा पण अडथळे काही त्याची पाठ सोडत नव्हते. प्रवेश घेतल्यावर विराजसमोर मोठा प्रश्न उभा राहिला राहायचं कुठे आणि जेवायचं कसं ? त्याने हिम्मत सोडली नाही काही मित्रांच्या ओळखीने त्याला पिंपरी येथे राहण्याची जागा मिळाली आणि एका क्लिनिकमध्ये नोकरी.

रुग्ण सहाय्यक वर्गात विद्यार्थ्यांच्या अभ्यासाबरोबर सर्वांगीण विकासावर जास्तीत जास्त लक्ष दिले जाते. वेगवेगळ्या विषयावर मार्गदर्शन केले जाते. व्याख्याते बोलविले जातात. तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य शिबिर घेतले जाते, पथनाट्याद्वारे समाजप्रबोधन अशा उपक्रमांमधून नैतिक आणि सामाजिक मूल्ये रुजवली जातात. त्यामुळे विराजमध्ये कमालीचा बदल झाला. खूप मेहनती, हुशार, असल्यामुळे त्याने अथक प्रयत्नांनी नर्सिंग वर्ग पूर्ण केला. वर्ग पूर्ण केल्यामुळे त्याला पिंपरी येथील कामत हॉस्पिटलमध्ये चांगल्या पगाराची नोकरी मिळाली. विराजचे शिक्षण बारावीपर्यंत झाले होते, आपण नर्सिंग क्षेत्रात पुढील शिक्षण घ्यावे अशी इच्छा त्याच्या मनात निर्माण झाली. वर्धिनींने त्याच्या या संकल्पाला दहा हजार रुपये मदत देऊन प्रोत्साहन दिले. त्याला G.N.M. ला प्रवेश मिळाला. मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी असलेल्या योजनेतून शिष्यवृत्ती मिळाली. त्याने G.N.M. सुद्धा यशस्वीरित्या पूर्ण केले. आज विराज मोशी येथील सर्वज्ञ हॉस्पिटलमध्ये नोकरी करत आहे.

आपली यशाची वाटचाल सुरु असताना त्याने आपल्या लहान भावाला B.Sc. करण्यासाठी बंगलोरला पाठवले. त्याला मिळणाऱ्या पगारातून तो भावाचे शिक्षण पूर्ण करीत आहे. **विराज अभिमानाने सांगतो की जेव्हा माझ्या पाठीशी कोणीही नव्हते त्यावेळेस वर्धिनीने मला आधार दिला, शिक्षणाच्या वाटा खुल्या करून दिल्या. मी शिकलो आणि आता माझा लहान भाऊही शिकू शकतोय.** माझ्यावर थोडी घरची जबाबदारी आहे पण ज्या वर्धिनीच्या आधारामुळे आमच्या घरची परिस्थिती बदलली त्या वर्धिनीसाठी मलासुद्धा काहीतरी करायचे आहे आणि मी नक्की करेन.

**– शब्दांकन : सुनीता गंगावणे**

**विस्तार**

विष्णुबुवा ब्रह्मचारी सामाजिक केंद्र, माणगाव यांच्या सहकार्याने रुग्ण सहाय्यक वर्ग बोर्ली पंचतन, ता. श्रीवर्धन येथे २ ऑक्टोबर २०२३ रोजी सुरू झाला. वर्गात १३ मुली व महिलांनी प्रवेश घेतला आहे. डॉ. सुजाता बापट, यशोदा हॉस्पिटल यांच्या मार्गदर्शनाखाली हा वर्ग सुरू आहे. यामुळे स्थानिक महिला व मुलींना स्वतःच्या पायावर उभं राहण्याची नवीन वाट सापडली आहे.

## जिजामाता जयंती

दि. १२ जानेवारीला लाल महालात जिजामाता जयंतीनिमित्त युवती कार्यकर्ती कु. समृद्धी यादव हिचे व्याख्यान झाले. जिजाबाईंच्या प्रेरणादायी चरित्राबरोबर तिने वेगवेगळ्या क्षेत्रातल्या यशस्वी महिलांचे कार्य व जिजाबाईंचा वारसा घेऊन आज घरोघरी मुलांचे भविष्य घडवणाऱ्या मातांची उदाहरणे सर्वांसमोर मांडली. टाळ्यांच्या गजरात समृद्धीचे सर्वांनी कौतुक केले. या कार्यक्रमास बालवाडी, नर्सिंग विभाग शिक्षिका व महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

## महिला कार्यकर्ता शिबिर

वर्धिनीच्या सर्व विभागातील महिला कार्यकर्त्यांचे दिनांक २ जून ते ७ जून 'कार्यकर्ता जडणघडण' या विषयाला अनुसरून शिबिर झाले. यातील काही विशेष –

* उद्घाटन – शिबिराच्या उद्घाटन सत्रात श्री सुमित डोळे यांनी 'रागावर नियंत्रण' हा विषय मांडला. हे नियंत्रण राखण्यासाठी आपल्या मनावर, बुद्धीवर, वेगावर आणि अवयवांवर नियंत्रण ठेवणे जास्त गरजेचे आहे हे संवादातून स्पष्ट केले.
* सौ. दीपा पवार यांनी छ. शिवाजी महाराज, ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले इत्यादी व्यक्तिमत्त्वांची उदाहरणे देत, त्यांच्या चरित्रातील प्रेरणादायी गोष्टीतून कौशल्यक्षम, दूरदृष्टी असणारा, सातत्याने नवनिर्मिती करणारा, मान–अपमान कणखर मनाने सहन करणारा 'आदर्श कार्यकर्ता' हा विषय मांडला.
* सौ. दिपाली अवकाळे यांनी 'व्यक्तिमत्त्व विकास' हा विषय मांडताना अंतरिक सौंदर्य कसे खुलवावे हे योगाभ्यासातील पंचकोशांचे महत्त्व सांगून स्पष्ट केले. प्रत्येक टप्प्यातील आत्मिक संवादाचे महत्त्व यातून सर्वांच्या लक्षात आले.
* सहकारी कसा असावा हे श्री. निलेश धायरकरांनी सर्वांना वेगवेगळ्या प्रकारच्या खेळांमध्ये सहभागी करून स्पष्ट केले. तसेच छ. शिवाजी महाराजांनी तानाजी मालुसरे, बाजीप्रभू देशपांडे, हंबीरराव मोहिते यांच्या साथीने यशस्वी केलेल्या मोहिमांची व या साथीदारांच्या वैशिष्ट्यांची उदाहरणे दिली.
* सौ. प्राजक्ता कोळपकर यांनी अनुभव कथनातून 'वक्तृत्व कसे फुलवावे' हा विषय मांडला. त्या म्हणाल्या, 'मिळालेल्या प्रत्येक संधीचा आत्मविश्वासाने, अभ्यास करून फायदा घ्या. सतत वाचन करत रहा. समाजातील व्यक्तींना वाचायला शिका.'
* समारोप सत्रात श्री. विश्वास कुलकर्णी सरांनी वेगवेगळ्या क्षेत्रातील स्त्रियांचे प्रेरणादायी कार्य थोडक्यात मांडले. ते म्हणाले, 'खूप कठीण परिस्थितीतही महिला आत्मविश्वासाने आपली ध्येयप्राप्ती करू शकतात. त्यांचा आदर्श घेऊन आपणही आपले काम वाढवले पाहिजे व आपली प्रगती केली पाहिजे.'

❖ ❖ ❖

## शिवण वर्ग

महिलांना व्यवसाय पूरक वेगळी संधी उपलब्ध व्हावी या हेतूने शिवण वर्गातील विद्यार्थिनी, शिक्षिका व वर्धिनीतील कार्यकर्ते यांनी नानावटी मणीलाल व्होकेशनल इन्स्टिट्यूट, महर्षी कर्वे शिक्षण संस्था, कर्वेनगर येथील फॅशन डिझायनिंग वर्गास भेट दिली. तिथे चालणारे शिवण विषयातील वेगवेगळे उपक्रम बघितले. यातून सर्वानुमते 'बॅग मेकिंग' हा वर्ग सुरू करावा असे ठरले. दि. ७ ऑगस्ट पासून एक महिन्याचा वर्ग सुरू झाला. संस्थेच्या प्राचार्या श्रीमती शोभाताई सुपेकर यांनी वर्गाच्या उद्घाटन कार्यक्रमात सर्वांना मार्गदर्शन केले. श्रीमती छायाताई वरगणे यांच्या मार्गदर्शनाखाली २२ मुलींचा वर्ग झाला. सर्वांनी उत्साहाने वेगवेगळ्या प्रकारच्या पिशव्या शिवल्या. यातून काही जणींचा व्यवसायही सुरू झाला आहे. दि. २५ सप्टेंबरला कर्वे संस्थेचे अध्यक्ष श्री. रवी देव सर यांच्या

हस्ते मुलींना प्रशस्तीपत्रक मिळाले. सरांनी मार्गदर्शन करताना 'मिळालेल्या प्रत्येक संधीचा सोन्यासारखा उपयोग करून घ्या. आपल्यातील कलागुणांना वाव द्या' असे सांगितले. मुलींनी आपल्या मनोगतात 'अशा प्रकारच्या वेगवेगळ्या वर्गात आम्ही निश्चित सहभागी होऊ आणि नवीन नवीन शिकत राहू' असा विश्वास दर्शवला.

❖ ❖ ❖

**बचत गट**

यावर्षी महिला दिनानिमित्त भागश: कार्यक्रम झाले.

● **कर्वेनगर भागाचा** कार्यक्रम पं. दीनदयाळ उपाध्याय विद्यालय येथे दि. ८ मार्च रोजी झाला. वर्धिनीच्या कार्यकर्त्या सौ. लताताई सत्तूर यांनी महिलांना ॲनिमियाबद्दलची शास्त्रीय माहिती दिली. तो टाळण्यासाठी आपला आहार कसा असावा, रोजच्या नाष्ट्याचे महत्त्व ताईंनी सांगितले.

● दि. १० मार्चला **पांडवनगर भागातील** महिलांचे एकत्रीकरण रामदास स्वामी माध्यमिक विद्यालय येथे झाले. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे श्री. गजानन बिराजदार व श्री. विवेक सांबरे यांनी प्रात्यक्षिकांच्या सादरीकरणातून शास्त्रीय माहिती देत अंधश्रद्धेला बळी पडू नका असे आवाहन केले.

● दि. १५ मार्चला **बिबवेवाडी भागाचा** कार्यक्रम गोपीनाथ मुंडे सभागृहात झाला. राष्ट्रसेविका समितीच्या पुणे महानगराच्या सह बौद्धिक प्रमुख सौ. शर्वरी आपटे यांनी 'माझी सामाजिक बांधिलकी' हा विषय मांडताना समितीच्या संस्थापिका वंदनीय मावशी, बीजमाता राहीबाई पोपेरे, अनाथांची माता सिंधुताई सपकाळ यांच्या जीवनातील प्रसंग सांगितले. त्या म्हणाल्या, 'समाजाबरोबर देशाचाही विचार केला पाहिजे. प्रत्येकाने आपली भाषा, वेशभूषा, संस्कृती पूरक विचारांचा आग्रह धरला पाहिजे. देशविरोधी कामाला विरोध केला पाहिजे. यासाठी एकत्र येण्याची आवश्यकता आहे.'



● **वर्धिनी परिसरातील** बचत गटातील महिलांचे एकत्रीकरण दि. २० मार्चला झाले. राष्ट्रसेविका समितीच्या पुणे महानगराच्या संचालिका सौ. मीनाताई कानडे यांनी मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या, 'आपल्याला नैसर्गिकपणे मिळालेल्या शक्तींचा वापर आपण वेळोवेळी केला पाहिजे. आपल्या देवाधिकांच्या गोष्टींमधून हेच लक्षात येते की संकट काळी समाजाचा त्रास दूर करण्यासाठी दैवी शक्ती उभी राहिली. शंकर-पार्वती-गणपती-कार्तिकेय या देवाच्या कुटुंबातून प्रत्येक जण समाजाचे दुःख हरण्यासाठी पुढे झाला. पार्वती देवीच्या मातृशक्तीमुळे हे शक्य झाले. हाच आदर्श पुढे ठेवून आपण आपली पुढची पिढी घडवली पाहिजे ज्यामुळे आपला समाज देश प्रगतीपथावर जाईल.'

**नवरात्र**

नवरात्रात भोंडल्याच्या कार्यक्रमात गटातील महिला उत्साहाने सहभागी झाल्या. दि. १६ ऑक्टोबरला कर्वेनगर भागाचा मेगा सिटी वसाहत येथे, दि. १८ ऑक्टोबरला गोखले नगर भागात पांडव नगर येथे व दि. २७ ऑक्टोबरला वर्धिनीमध्ये परिसरातील गटांचा भोंडला झाला. वर्धिनीमध्ये गटातील महिलांनी मंगळागौरीचे खेळ उत्साहाने सादर केले तर बालवाडीच्या शिक्षकांनी 'शिवरायांचे आठवावे प्रताप' हे पथनाट्य सादर केले.

**जानेवारी २०२३ ते डिसेंबर २०२३ वर्षातील एकूण उलाढाल –**

**जमा झालेली बचत – रु. ९४,५२,८८२, दिलेले कर्ज – रु. ४८,४२,३००,**

**बचत गटाची संख्या – ५२, सदस्य संख्या – ७३५**

## पाकोळी बालवाडी

बालवाडीत ३ ते ६ वयोगटातील मुलांच्या पंचज्ञानेंद्रियांचा मानसिक व बौद्धिक विकास वेगवेगळ्या उपक्रमांतून, पाठांतून होत असतो. त्यातील काही विशेष उपक्रम –

**संक्रांत उत्सव**

जानेवारी महिना म्हणजे संक्रांत उत्सवाची लगबग, तयारी जोरदार सुरू असते. संक्रांत उत्सवाची संकल्पना स्व. लता दीदींना आदरांजली अशी होती. त्यांनी गायलेल्या 'आज गोकुळात रंग...', 'ऐरणीच्या देवा तुला...', 'वल्हव रे नाखवा...', 'वेडात निघाले...', 'खेळ मांडीयेला...' या गाण्यांवर बालचमूंनी व बाल शाखेतल्या मुलांनी मनमोहक नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

दि. २४ जानेवारी २०२३ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनात झालेल्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित सौ. दीपालीताई अवकाळे यांनी पालकांशी 'आनंदी पालकत्व' या विषयावर संवाद साधला. एका गोष्टीतून पालकांनी बदलत्या काळानुसार आपल्यात बदल का व कसे करावेत, त्याचा आपल्या पाल्यावर कसा परिणाम होतो, घरात मोठ्या व्यक्तींच्यात संवाद कसा असावा हे त्यांनी सांगितले. गोष्टीला सर्वांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला. वर्धिनीचे उपाध्यक्ष श्री. शिरीष पटवर्धन, कार्यवाह श्री. विश्वास कुलकर्णी, मा. पुष्पाताई नडे यांनीही बाळगोपाळांना कौतुकाची थाप दिली. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

दि. २७ जानेवारीला बोरन्हाण आणि त्या महिन्यातील मुलांचे वाढदिवस साजरे झाले. छोट्या गटातील मुलांच्या पालकांनी मुलांसाठी हलव्याचे दागिने बनवले होते. बोर, ऊस, गोळ्या वेचण्याचा आनंद मुलांनी घेतला.

**राज्य भाषा दिन –** दि. २७ फेब्रुवारी मराठी राज्यभाषा दिनानिमित्त मोठ्या गटातील वर्गात मुळाक्षरांवर पिस्त्याच्या साली लावून अक्षर ओळख तर मधल्या गटात पॅनल बोर्डवर मुळाक्षरांच्या जोड्या लावा हे पाठ झाले.

**विज्ञान दिन –** दि. २८ फेब्रुवारी विज्ञान दिन तीनही गटात साजरा झाला. छोट्या गटातील मुलांनी पंचज्ञानेंद्रियांचे गाणे अभिनयातून सादर केले. मधला गटातील मुलांनी स्पर्श ओळखा–गुळगुळीत–खरखरीत आणि हत्तीचा परिचय हे प्रयोग सादर केले. मोठ्या गटातील मुलांनी जलचक्र, विरघळणारे–न विरघळणारे, तरंगणारे–बुडणारे पदार्थ ओळखा, मूळ रंग ओळखा इत्यादी प्रयोग सादर केले. श्री. विश्वास कुलकर्णी, श्री. शिरीष पटवर्धन, श्रीमती पुष्पाताई नडे हे या सादरीकरणात सहभागी झाले. त्यांनी विचारलेल्या प्रश्नांना मुलांनी आत्मविश्वासाने उत्तरे दिली.

**शिवजयंती –** दि. १० मार्चला शाळेत शिवजयंती साजरी केली. शिवराय आणि त्यांच्या मावळ्यांची वेशभूषा करून आलेल्या बालचमूंना सौ. मनीषा जाधव ताईंनी शिवछत्रपती महाराजांची गोष्ट सांगितली. बालवाडी प्रशिक्षण वर्गाची विद्यार्थिनी सौ. स्नेहल पाटणे व वर्गशिक्षिका प्रीती जाधव यांनी गोंधळ सादर केला.

**हनुमान जयंती –** दि. ६ एप्रिलला हनुमान जयंती उत्साहात साजरी झाली. छोट्या गटातील आरव लांडगे हनुमानाची वेशभूषा करून आला होता. त्याच्या हस्ते अयोध्येतून आलेल्या विजयध्वजाचे पूजन झाले.

**प्रगतीपुस्तक वाटप –** दि. ११ एप्रिलला छोट्या व मधल्या गटातील मुलांना प्रगतीपुस्तक देण्यात आले. यासाठीच्या कागदी पिशव्या मुलांनी सुशोभित करून आणल्या होत्या. सर्व मुलांसाठी, पालकांसाठी व कार्यकर्त्यांसाठी या दिवशी 'गुजर आईस्क्रीम'कडून आईस्क्रीम पार्टीचे आयोजन झाले.

**निवासी शिबिर –** दि. १२ व १३ एप्रिलला मोठ्या गटातील मुलांना शुभेच्छा देण्यासाठी 'स्वावलंबन' ह्या विषयावर निवासी शिबिर झाले. मुलांनी दोन दिवस आपल्या शिक्षिकांबरोबर व मित्रांबरोबर आनंदात घालवले.

शिबिराचे उद्घाटन सौ. तेजश्री बाभुळगावकर यांच्या हस्ते झाले. ताईंनी गोष्टीतून मुलांना व्यायामाचे महत्त्व सांगितले. दोन दिवसांच्या निवासात मुलांना कागदी वस्तू, पद्य, श्लोक शिकवले. संध्याकाळी पर्वती दर्शन सहल झाली. पर्वतीवर देवदर्शन झाल्यानंतर चौकोनात बसून मुलांनी परिपाठ, पद्य, भजन म्हटले. दुसऱ्या दिवशी सकाळी उठून व्यायाम, खेळ, स्पर्धा झाल्या. मुलांनी पपेट शो बघितला.

शिबिराच्या समारोपात मुलांनी 'स्वराज्याची शपथ' हे प्रसंगनाट्य तर मुलींनी 'अनादि निर्गूण...' हा जोगवा सादर केला. पालकांनी आपल्या मनोगतातून बालवाडीतील सर्व उपक्रम आवडल्याचे सांगितले. शिक्षक व शाळेबद्दलची आपुलकी व्यक्त केली. मोठ्या गटातील मुलांना प्रगतीपुस्तक व भेटवस्तू दिल्या. आम्ही तुम्हाला भेटायला परत येऊ असे सांगत मुले घरी गेली.

## नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात (२०२३–२४)

जून महिना आला आणि बालवाडी शिक्षकांची मुलांच्या स्वागतासाठी तयारी करण्याची लगबग सुरू झाली. कार्डशीट कागदापासून स्मायलीच्या फुलांची साखळी करून त्यांच्या तोरणांनी, वर्गातील फळ्यांवर प्राण्यांची–फुलांची चित्रे काढून, वर्गाच्या दारात रांगोळ्या काढून सर्व वर्गांची सजावट झाली.

दि. १५ जूनला बालवाडीच्या नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाली. श्रीमती पुष्पाताई नडे व सर्व शिक्षिकांनी मुलांचे औक्षण करून स्वागत केले. वाटेत मांडलेल्या ट्रॅक सिस्टीम वर खेळत, बालगीतांचा आनंद घेत मुलं वर्गात येत होती तर मोठ्या गटात यावर्षी पहिलीत गेलेल्या बालवाडीच्या माजी विद्यार्थिनी मुलांचे स्वागत करत होत्या. वर्गात आल्यावर मांडलेल्या खेळांचा, सायकल–घोडा खेळण्याचा आनंद मुलांनी घेतला. यावर्षी १८० मुलांनी प्रवेश घेतला आहे.

**योग दिन –** बालवाडी सुरू होताच जवळ आलेला '२१ जून योग दिन' मुलांनी रोजच्या सरावातून उत्साहाने साजरा केला. मोठ्या गटातील मुलांनी प्रथम ओंकार उपासना केली व त्यानंतर पद्मासन, धनुरासन, वज्रासन, ताडासन, वृक्षासन, त्रिकोणासन, ह्या आसनांचे सादरीकरण केले.

**आषाढी एकादशी –** दि. २९ जूनला वर्धिनी व परिसर विठुरायाच्या गजरात न्हाऊन निघाला. वर्धिनी ते कण्वाश्रम विठ्ठल मंदिर विठुरायाचा, ज्ञानेश्वर–तुकारामांचा गजर करत, वारकऱ्यांच्या, संतांच्या व विठोबा रखुमाईच्या वेषभूषा करून मुले पालखी घेऊन सहभागी झाली. अभिमन्यू बालशाखेच्या मुलांनी चौका चौकात पारंपारिक खेळांचे रिंगणात सादरीकरण केले. परिसरातील नागरिकही विठोबाच्या गजरात उत्साहाने सहभागी झाले. पालखी देवळात पोहोचल्यावर **बालवाडी शिक्षिका छायाताईंनी 'स्वच्छता' हा विषय मुलांसाठी कीर्तनातून मांडला.** सर्व शिक्षिकांनी भजनाच्या तालावर पाऊल भजन सादर केले आणि विठोबाची आरती करून पालखी परत वर्धिनीत आली. छोट्या गटासाठी हा कार्यक्रम पावसामुळे वर्गातच दशमीच्या दिवशी झाला. सर्व मुलांनी यात उत्साहाने भाग घेतला.

## सणांचा श्रावण महिना

● गुरूपौर्णिमा – दि. ३ जुलैला सर्व गटात गुरूपौर्णिमा शिक्षकांच्या पूजनाने साजरी झाली. मोठ्या गटात छाया ताईंनी 'गुरुने दिला ज्ञानरूपी वसा...' हे गीत सादर केले. अश्विनी ताईंनी सोनु–मोनूच्या गोष्टीतून गुरूंचे महत्त्व

सांगितले.

● दीप अमावस्या – दि. १७ जुलैला दिव्यांचे पूजन झाले. वर्गात वेगवेगळ्या प्रकारचे दिवे उत्कृष्ट सजावट करून मांडले होते. या दिवसाची व मांडलेल्या वैशिष्ट्यपूर्ण दिव्यांची माहिती ताईंनी मुलांना सांगितली.

● श्रावणी शुक्रवार – सर्व गटात जिवती देवीची पूजा मांडून मुलांना गोष्ट सांगून प्रसाद दिला. छोट्या गटात शेवटच्या शुक्रवारी सरस्वती–लक्ष्मी–दुर्गा या देवींच्या वेशभूषा करून तीन मुली आल्या होत्या. प्रत्येक देवीचे पूजन कधी होते याची माहिती ताईंनी मुलांना सांगितली.

● नागपंचमी – मोठ्या गटातील मुलांनी मातीचे वारुळ बनवण्याचा आनंद घेतला. सर्वांनी त्याच्याभोवती फेर धरून नागोबाचे गाणे म्हटले. त्याची पूजा केली. ताईंबरोबर मुलांनी फुगड्या, झिम्मा खेळल्या.

● रक्षाबंधन – सर्व गटातील मुलांना ताईंनी राख्या बांधल्या. मधल्या गटातील मुलांनी 'नवी नवी छान मी साडी नेसणार' या गाण्यावर तर मोठ्या गटातील मुलांनी कोळी गीतावर नृत्य केले. **मोठ्या गटातील मुलांनी परिसरातील झाडांना राख्या बांधून रक्षाबंधन साजरे केले.** या राख्या मुलांनी ताईंच्या मार्गदर्शनाखाली वर्गात बनवल्या होत्या.

● दहीहंडी – 'हाथी घोडा पालखी, जय कन्हैयालाल की' अशा घोषणा देत वर्धिनीच्या परिसरात मुलांची प्रभात फेरी झाली. या फेरीतून पालकांनी, डेअरीतल्या काकांनी, किराणामालाच्या दुकानातून काल्यासाठी लाह्या, पोहे, दही दिले. शिक्षकांनी ओंकार सभागृहात दहीहंडी सजवून बांधली. छोट्या गटातील कन्हैयाने ताईंच्या मदतीने दहीहंडी फोडली. मोठ्या गटातील मुला–मुलींनी 'हरी सुंदर हरी नारायण हरी बोला' या गाण्यावर नृत्य केले.

● बैल पोळा – हा सण शहरात साजरा होताना दिसत नाही. त्याची माहिती ताईंनी मुलांना सांगितली. फळ्यावर बैलपोळ्याचे छान चित्र काढले व खेळण्यातील छोट्या बैलांची पूजा मुलांनी केली.

● स्थळ भेट – शेवटच्या श्रावणी सोमवारी दि. ११ सप्टेंबरला जंगली महाराज रस्त्यावरील पाताळेश्वर मंदिरात मोठ्या गटातील मुले व पालक यांची स्थळ भेट झाली. पुष्पाताईंनी या मंदिराचा इतिहास व लेण्यांची माहिती सांगितली. देवळात मुलांनी श्लोक व शंकराची गाणी म्हटली.

**अन्य उपक्रम**

● दि. २ जानेवारीला गुरुकुल चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेचा बक्षीस समारंभ दि. २६ जानेवारीला झाला. वर्धिनी पाकोळी बालवाडीला 'सातत्यपूर्ण सहभागाचे' विशेष सन्मानचिन्ह देण्यात आले.

● दि. २८ जानेवारी रथसप्तमीला सकाळी ६ वाजता वर्धिनीच्या माडगावकर सभागृहात शिक्षिकांनी गायत्री मंत्राचे पठण, उपासना करून सूर्यनमस्कार घातले. श्री. शिरीष पटवर्धन सरांनी सूर्यनमस्काराचे तंत्र स्पष्ट करताना कै. कवठेकर सरांच्या सूर्यनमस्काराच्या आठवणी सांगितल्या.

● दि. १५ फेब्रु.ला बजाज फायनान्स कंपनीच्या CSR विभागातील अधिकारी बालवाडीची कार्यपद्धती व शिक्षकांचे अनुभव ऐकण्यासाठी आले होते. या झालेल्या संवादातून त्यांनी चालू वर्षासाठी बालवाडीला आर्थिक मदत दिली आहे. तसेच दि. २२ फेब्रु.ला सेवा इंटरनॅशनल, दिल्लीचे कार्यकर्ते श्री. निलेश मंत्री व त्यांचे सहकारी यांनी बालवाडीला खेळांच्या साहित्याचे २५ कीट भेट दिले.

● समुपदेशन विभागाने पहिलीत जाणाऱ्या मोठ्या गटातील मुलांची चित्र पुस्तिकेच्या सहाय्याने बुद्धिमापन चाचणी घेतली.

● तारा मोबाईल क्रेचेस या बांधकाम कामगारांच्या मुलांसाठी चालवल्या जाणाऱ्या केंद्रांवर जाऊन सलग १० दिवस वेगवेगळ्या ठिकाणी शिबिर झाले. एकूण ४८७ मुलांनी याचा लाभ घेतला. रोहन बिल्डर, गोयलगंगा, गोदरेज बिल्डर, प्राईड वर्ल्ड सिटी अशा बांधकाम कंपनींच्या कामावर १ ते १० वयोगटातील मुलांचे पाकोळी बालवाडीच्या शिक्षिकांनी गाणी, गोष्टी, खेळ, हस्तव्यवसाय हे उपक्रम तर १० वर्षांपुढील वयोगटासाठी

प्रयोगशाळेच्या कार्यकर्त्यांनी विज्ञानाचे प्रयोग, गणितातील गमतीजमती हे उपक्रम घेतले. मुलांचा सर्व ठिकाणी उत्तम प्रतिसाद मिळाला.

● लोकमान्य टिळक जयंती – मोठ्या गटातील वरद घोलप याने टिळकांच्या वेशभूषेतून त्यांची प्रसिद्ध वाक्य सादर केली.

● कारगिल दिन – दि. २६ जुलै 'कारगिल दिन' मोठ्या गटात साजरा झाला. मुलांनी देशभक्तीपर गाणे सादर केले. मा. पुष्पाताई नडे यांनी कारगिलच्या लढाईची गोष्ट मुलांना सांगितली.

● आरोग्य तपासणी – दि. २२ ऑगस्टला सर्व मुलांची शारदा शक्ती या संस्थेच्या डॉक्टरांच्या सहकार्याने शारीरिक तपासणी झाली. डॉक्टरांनी विचारलेल्या प्रश्नांना मुले न घाबरता उत्तरे देत होती.

● शिक्षक दिन – मोठ्या गटातील मुलांनी मधल्या व लहान गटात शिक्षक म्हणून जाऊन बडबड गीत, अभिनय गीत सादर करून मुलांकडून म्हणून घेतले.

● गांधी जयंती – २ ऑक्टोबरला मधल्या व मोठ्या गटातील मुलांनी आपल्या वर्गाची, समोरील व्हरांडा, जिना यांची स्वच्छता केली.

## गणेशोत्सव

मोठ्या गटातील मुलांनी श्रावण महिन्यापासून रोज अथर्वशीर्ष पठणाची तयारी करून उत्सवात कसबा गणपती, त्वष्टा कासार गणपती या व परिसरातील इतर मंडळांपुढे, एकूण ९ ठिकाणी अथर्वशीर्ष पठण केले. मधल्या व मोठ्या गटातील मुलांनी शाळेच्या शिक्षिका सौ. मनीषाताई जाधव व सौ. अश्विनीताई महाडिक यांच्या घरी जाऊन गौरींचे दर्शन घेतले. केलेल्या सजावटीची व गौरी सणाची माहिती ताईंनी सांगितली.

## नवरात्र

नवरात्रात अनेक महिलांचे उपवास असतात, या विषयाला अनुसरून दि. २२ ऑक्टोबरला सर्व गटातील पालकांशी शारदा शक्तीच्या डॉ. सौ. कांचन खैराटकर यांनी 'आपले आरोग्य आणि आहार' या विषयावर संवाद साधला. स्त्रीमधल्या देवींच्या नऊ अवतारांची जाणीव त्यांनी सर्वांना करून दिली आणि त्याचे जागरण आपण केले पाहिजे असे आग्रहपूर्वक सांगितले. दि. १७ ऑक्टोबरला सर्व गटांचा एकत्रित भोंडला झाला. बालवाडीच्या माजी शिक्षिका सौ. मधुरा पारखी यांनी मुलांसाठी खिरापत आणली. सर्व वर्गांमध्ये खंडे नवमी, सरस्वती पूजन व शैक्षणिक साहित्याचे पूजन करून साजरी झाली. मोठ्या गटात नवरात्रीनिमित्त परडीमध्ये धान्य पेरून बी कसे रुजते, त्याची वाढ कशी होते याची ओळख रोजच्या निरीक्षणातून मुलांना करून दिली. या कृतिशील उपक्रमातून मुलांचे कुतूहल वाढल्याचे जाणवले.

बालवाडी शिक्षिका व प्रशिक्षण वर्गाच्या विद्यार्थीनींनी परिसरातील देवीच्या पाच मंडळात 'जिजामाता व शिवराय आले पुण्यनगरीत' हे सध्या दिसणाऱ्या आरोग्य, वाहतूक इत्यादी समस्यांवर कथन करणारे पथनाट्य सादर केले. त्यास नागरिकांकडून उत्तम दाद मिळाली.

## स्पर्धा

सर्व गटातील मुलांसाठी व पालकांचे वर्धिनीशी नाते दृढ व्हावे या हेतूने विविध स्पर्धा झाल्या.

* अथर्वशीर्ष पठण – मोठ्या गटातील अंतिम फेरीत पंधरा मुले निवडली गेली. यातील विशेष **बरसा मैटी, या बंगाली भाषिक मुलीचं खूप कौतुक झालं. घरी बंगाली भाषा बोलली जाते पण फक्त वर्गात झालेल्या सरावातून तिने न चुकता स्पष्ट उच्चारात अथर्वशीर्ष पठण केले.**

* फॅन्सी ड्रेस स्पर्धा – छोट्या गटात 'झाडे व फळे' या विषयावर स्पर्धा झाली. मुले वेगवेगळ्या फळांची तर काहीजण झाडांची वेशभूषा करून स्पर्धेत सहभागी झाली. त्याची माहिती सांगण्याचाही प्रयत्न त्यांनी केला.

मधल्या गटासाठी ‘फुले’ तर मोठ्या गटासाठी ‘कारागीर’ हा विषय होता. वेगवेगळी फुले, कुंभार, शेतकरी, डॉक्टर, कोळीण, लोहार, भाजीवाली, जवान इत्यादी वेशभूषा मुलांनी सादर केल्या. या वेशभूषा बघताना पालकांची कल्पकता व उत्साही सहभाग जाणवला.

● पाककला स्पर्धा – आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्षानिमित्त पालकांनी या धान्यापासून वेगवेगळे पदार्थ बनवले होते.

● रांगोळी स्पर्धा – नेहमीची रांगोळी व रंग न वापरता पर्यावरण पूरक साहित्य वापरून रांगोळी काढणे असा स्पर्धेचा विषय होता. विविध प्रकारची फुले, झाडांची पाने (ताजी व वाळलेली), विविध कडधान्ये, नारळाच्या शेंड्या याचा वापर करून रांगोळ्या काढण्यात आल्या.

**बक्षीसप्राप्त विद्यार्थी**

● वेशभूषा स्पर्धा –

छोटा गट – गट अ) प्रथम – वीर रणधीर खैरमोडे, द्वितीय – अमायरा सलीम शेख
गट ब) प्रथम – शिवेंद्र उमेश भोसले, द्वितीय – ओवी चैतन्य कवळे

मधला गट – प्रथम – मृणाल आश्विन जोशी, द्वितीय – सानवी सचिन कांबळे
उत्तेजनार्थ – वेदिका विशाल शिरसे

मोठा गट – प्रथम – समर्थ संदीप भांड, द्वितीय – नव्या तेजस तटकरे
उत्तेजनार्थ – वरद योगिता घोलप

● अथर्वशीर्ष पठण –प्रथम – देवांश रोहित आढाव, द्वितीय– संतोषी उमेश सकट, शर्वरी दीपक गायकवाड
उत्तेजनार्थ – बरसा विक्रम मेट्टी

**बक्षीसप्राप्त पालक**

● पाककला स्पर्धा – प्रथम – हर्षिता सागर पोटे, द्वितीय – सायली महेश वावरे
उत्तेजनार्थ – स्वप्नाली प्रविण भालसिंग, सुषमा रविंद काटाळे

● रांगोळी स्पर्धा – प्रथम – काजल राहुल रेणुकदास, द्वितीय – निशा दिपक गायकवाड
प्रतिभा शिवाजी नायकवडी
उत्तेजनार्थ – श्री. मनोज पतंगे








स्पर्धा परीक्षा केंद्रातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी वेगवेगळे उपक्रम होतात तसेच अधिकारी पदांवर कार्यरत असणारे केंद्राचे माजी विद्यार्थी व सामाजिक संस्थांमध्ये कार्यरत असणारे कार्यकर्ते भेट देतात.

**अनौपचारिक भेट**

'युवा चेतना मंच' ह्या सामाजिक संस्थेचे संस्थापक श्री. दत्ताजी शिर्के यांनी ९ फेब्रुवारीला स्पर्धा परिक्षा केंद्राला भेट दिली. नागपूर गडचिरोली भागात श्री. दत्ताजी शिर्के प्रेरणादायी कार्य करीत आहेत. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यातून विद्यार्थ्यांना गडचिरोली गडचिरोली भागातील समाज जीवनाची ओळख झाली. लोकसहभागातून पुलाचे बांधकाम पूर्ण केले. त्यामुळे या भागात दळणवळण आणि उत्तम संपर्क होण्यास मदत झाली. गडचिरोली भागात विद्यार्थ्यांची अधिकारीपदी निवड झाली तर हक्काने या भागात सेवेसाठी यावे असे आग्रहाचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

**शहीद दिन**

२३ मार्च शहीद दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. श्री. गणेश राऊत (लेखक, प्राध्यापक) आणि श्री. सागर मुळीक (राज्यसेवा २०२१ – ८९ वी रँक) उपस्थित होते. मार्गदर्शन करताना शहीद झालेल्यांचे बलिदान स्मरत संयुक्त पूर्व परीक्षा तयारी, वेळेचे नियोजन, परीक्षेला सामोरे जाताना अशा अनेक महत्त्वाच्या विषयांवर त्यांनी प्रेरणादायी संवाद साधला.

**कारगिल विजय दिन व सत्कार समारंभ**

२६ जुलै कारगिल विजय दिवस आणि २०२०/२१/२२ या वर्षांमध्ये राज्यसेवा तसेच इतर अनेक स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार याचे आयोजन वर्धिनीच्या ओम्कार सभागृहात झाले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे श्री. विजय चाफेकर (अतिरिक्त महासंचालक निवृत्त – भारतीय तटरक्षक दल), डॉ. संजय तांबट आणि श्री. विश्वास कुलकर्णी सर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात कारगिल युद्धामध्ये शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पण करून करण्यात आली.

श्री. चाफेकर सरांनी व्याख्यानातून देशाच्या सीमा संरक्षण करताना तटरक्षक दलाचे महत्त्व, त्यात झालेल्या सुधारणा याची माहिती दिली. पाहुण्यांच्या हस्ते श्री. यमाजी धुमाळ, श्री. अनिकेत कांबळे, PSI रोहित पाटील, PSI वर्षाराणी सुतार, कु. अश्विनी शिर्के यांचा सत्कार झाला.

**गणेशोत्सव**

विभागाने २०१३ पासून गणेशोत्सवाला सुरुवात केली. २०१४ पासून **'श्रमिकांचा बाप्पा'** हा उपक्रम जे समाजातील घटक वेगवेगळ्या प्रकारचे काम करीत असतात, पण त्यांच्या कार्याला प्रतिष्ठा लाभत नाही, अशा श्रमिकांच्या श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी आयोजित होतो. श्रमिक घटकांमध्ये स्वच्छता कर्मचारी, रिक्षा चालक, चहावाले काका, साफसफाई करणारे कर्मचारी इ. यांना बोलावून त्यांना 'श्री'च्या आरतीचा मान दिला जातो. आरतीबरोबर ते आपले मनोगत व्यक्त करतात.

दि. १९ सप्टेंबर २०२३ रोजी 'श्री'ची प्रतिष्ठापना तृतीयपंथी समाजसेविका अमित मोहिते उर्फ आम्रपाली यांच्या हस्ते करण्यात आली. आम्रपाली 'सावली सोशल फौंडेशन'च्या संस्थापक अध्यक्ष आहेत. तृतीयपंर्थींच्या न्याय हक्कासाठी काम करताना त्यांनी पुणे शहरात सहा ठिकाणी गरीब मुलांसाठी 'फुटपाथ शाळा' सुरु केल्या. संस्थेच्या माध्यमातून त्यांनी १४५ गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खर्च उभा केला. तसेच त्यांनी १९२ लोकांना छोटे व्यवसाय सुरु करून दिले आहेत.

आपले मनोगत व्यक्त करताना त्यांनी तृतीयपंर्थींविषयी समाजात कशा प्रकारे गैरसमज आहेत याविषयी वेगवेगळ्या उदाहरणांमधून माहिती दिली. त्या म्हणाल्या, 'आम्हाला दया नको, समान वागणूक हवी, तृतीयपंर्थींना सहानुभुती नव्हे तर समान वागणुकीची गरज आहे. तेही आपल्या समाजातील एक घटक आहेत हे मान्य करून त्यांना आपलेपणाने स्वीकारावे. रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.' संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. संजय तांबट, ज्येष्ठ कार्यकर्त्या श्रीमती पुष्पाताई नडे यांनी आम्रपाली मोहितेंचा भारतीय संविधानाचा सरनामा देऊन सन्मान केला.

दररोज आरती ही श्रमिक घटकातील मान्यवरांकडून, चहाचा व्यवसाय करणारे श्री. सुदामा वाघेले व श्री. सुनिल भंडाळे, मेस चालवणाऱ्या श्रीमती शोभा कोराळे, व्यायामशाळा प्रशिक्षक व वर्धिनीचे वर्धक श्री. आयुब शेख, सुरक्षारक्षक श्री. उमर शेख, श्री. सचिन पवार, श्री. केदार ब्राह्मणे व श्री. लक्ष्मण काशीद, स्वच्छता कर्मचारी श्री. मुकुंद लोणारी यांच्या हस्ते झाली.

श्री. उमर शेख हे सुरक्षारक्षक म्हणून काम करतात. त्याचबरोबर स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करता करता त्यांची नुकतीच मुंबई पोलीस म्हणून निवड झाली आहे. आपले मनोगत व्यक्त करताना त्यांनी सांगितले, 'अभ्यास कसा केला पाहिजे, स्वतःवर विश्वास ठेवून. शांतचित्ताने परीक्षेला सामोरे गेले पाहिजे. यामुळे आपल्याला निश्चितच यश मिळते.'

**स्वप्न सत्यात उतरताना...**

खरंच आयुष्यात एखाद्या व्यक्तीला कोणत्या प्रसंगामुळे कधी, केव्हा, कुठे, कशी प्रेरणा मिळेल हे सांगता येत नाही. अशी प्रेरणा घेऊन स्वप्न प्रत्यक्षात उतरवणारे श्री. स्वप्नील कांबळे.

पुण्यात फुटपाथवर त्यांचे बालपण गेले. फुटपाथवर रहात असताना डोळ्यासमोर अनेक व्यक्ती रोज जात होत्या. पण त्यातील लक्षात राहिलेली व्यक्ती म्हणजे वर्दी घालून फिरणारे पोलिस. लहानपणी या वर्दीचे सर्वांनाच वेगळे आकर्षण असते. पण स्वप्नील मात्र 'मी पण असाच वर्दी घालून फिरेन' हे स्वप्न उराशी धरून पुढे जात राहिला. त्यांची आई दोन लहान मुलं आणि पती यांना घेऊन संसाराचा गाडा ओढत होती. आपण जरी शिकलेलो नसलो तरी मुलांनी खूप शिकावे, शिक्षणाबरोबर अन्य खेळातही चमकावे ही माऊलीची धडपड. स्वप्नीलने ग्रॅज्युएशन पूर्ण केले आणि आता पुढे काय हा प्रश्न त्याला सतत भेडसावत होता.

अनेकांशी चर्चा केल्यावर स्पर्धा परीक्षा हा मार्ग त्यांनी निवडला. वर्धिनीच्या स्पर्धा परीक्षा केंद्रातील शिष्यवृत्ती वर्गात प्रवेश मिळवला आणि अभ्यास सुरू झाला. अधिकारी झालो तरच आपली व आपल्या घरची परिस्थिती बदलू शकते याचा ध्यास धरून स्वप्नील अभ्यास करत होता. रेल्वेमधील गट ४ ची परीक्षा देऊन ट्रॅकमनची नोकरी मिळवली आणि पुढील अभ्यास करत मोठ्या पदाची तयारी सुरू केली.

दिल्ली पोलिस फोर्समधील पोलिस सब-इन्स्पेक्टर पदाची पूर्वपरीक्षा, मुख्य परीक्षा आणि मुलाखत या टप्प्यांवरून जात उत्तम यश संपादन केले. सध्या नांदेड येथील सब-इन्स्पेक्टर पदाचे प्रशिक्षण पूर्ण करून दिल्ली पोलिस सब-इन्स्पेक्टर या पदावर तो रुजू झाला आहे. त्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरले आहे.

**मुलाखत मार्गदर्शन**

केंद्राने राज्यसेवा मुलाखत मार्गदर्शन वर्गाचे दि. ७ व ८ नोव्हेंबर २०२३ रोजी दुपारी २ ते ६ या वेळात आयोजन

केले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री. सतीश पाटील (UPSC-MPSC, विभाग प्रमुख, बार्टी), डॉ. राजीव रानडे (IRS) (Retd. Commissioner of Income Tax), श्री. रंगनाथ नाईकडे (IFS) (मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक), नागपूर सेवानिवृत्त), श्री. भानुप्रताप बर्गे (निवृत्त ACP) उपस्थित होते. एकूण २६ विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया –

मयुरी मारुती कापसे – तज्ज्ञांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. कमीतकमी वेळेत अतिशय दर्जेदार, उत्कृष्ट माहिती मिळाली. स्वतःतल्या चांगल्या गोष्टींची त्याचबरोबर कमी असलेल्या गोष्टींची ओळख झाली.

अर्जुन संजय ओमासे – मुलाखतीमध्ये विचारलेल्या प्रश्नांमुळे आत्मविश्वास जागा झाला. सर्व कार्यकर्त्यांचे उत्तम सहकार्य मिळाले.

**अभिनंदन**

| पद | विद्यार्थ्याचे नाव |
|---|---|
| उत्पादन शुल्क निरीक्षक | हर्षाली पवार |
| विक्रीकर निरीक्षक | तुषार नांगुर्डे, सिद्धांत पवळे, कुलदीप भोलाने, प्रिया गोरखे, गणेश तुरणार |
| पोलिस भरती | राहुल कांबळे, मेघा पवार, करण व्यवहारे, प्राजक्ता कोळेकर |
| उपजिल्हाधिकारी | विशाल यादव, विकास व्यवहारे |
| मुख्याधिकारी | सागर मुळीक, यमाजी धुमाळ, प्रिया गोरखे |
| लेबर ऑफिसर | कुलदीप भोलाने |
| पोलिस उपनिरीक्षक | मयुर डोंगरे, अक्षय अडवाल, प्रियंका बैस, अश्विनी शिर्के, रोहित पाटील |
| कर सहाय्यक | देवा काळे, सचिन पवार, पूजा कुऱ्हाडे, समीक्षा अत्रे, देवानंद काळे |
| लिपीक | अर्चना ढवळे, निलेश काकडे, शंतनु बाचे |
| पशुवैद्यकीय अधिकारी | अर्जुन गायकवाड |
| सहाय्यक सहकार अधिकारी | सचिन धुमाळ |
| औषध निर्माण अधिकारी | मनोज देसले |
| CM fellowship | सुमीत पाटील |

**सर्व यशस्वी विद्यार्थी, अधिकाऱ्यांचे वर्धिनी परिवाराकडून मनःपूर्वक अभिनंदन.**





## निधी संकलन

# अशा मिळाल्या देणग्या

(आकडे लाख रुपयात) जानेवारी २३ ते डिसेंबर २३

CSR 164.5 (65.6%)


\+

Other 86.4 (35.4%)

→ एकूण 250.9

# असे झाले खर्च

(आकडे लाख रुपयात) जानेवारी २३ ते डिसेंबर २३



या वर्षीच्या आर्थिक बाबींचे अवलोकन करताना काही गोष्टी विशेष नमूद कराव्याशा वाटतात.

* चऱ्होली येथील कौशल्य विकास केंद्राचा पहिला टप्पा संपूर्णपणे कार्यान्वित झाला. यावर्षी तिथे GNM असिस्टंट, रुग्ण सहाय्यक व फॅशन डिझायनिंग या वर्गांना सुरुवात झाली.

* नोव्हेंबर महिन्यातल्या महाशिबिराचे निधी संकलन मोठ्या प्रमाणात वस्तू स्वरूपात झाले. यासाठी 'स्व'-रूपवर्धिनीच्या सर्व विभागातील कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.

* वार्षिक कार्यवृत्तासाठी 'स्व'-रूपवर्धिनीच्या व्यावसायिक वर्धकांना (प्रेरणा शाखा) अंकाच्या पृष्ठ प्रायोजकत्वाचे आवाहन करण्यात आले. त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला.

* ऑनलाईन व्हाऊचर अॅप्रुव्हलसाठी सर्व विभागातील कार्यकर्त्यांना प्रशिक्षण दिले जात आहे. पुढील वर्षात त्याची कार्यवाही सुरू होईल.

कोरोनानंतर 'स्व'-रूपवर्धिनीच्या सर्व प्रकल्पांची व विस्ताराची कामे उत्साहाने सुरू झाली आहेत. यासाठी जुन्या व नवीन कार्यकर्त्यांचा सहभाग मिळत आहे. यावर्षी कार्यविस्तारानुरुप विभागशः ४,०३,००,००० रुपयांचा अर्थसंकल्प केला असून त्यातून समाजातील बदलत चाललेल्या परिस्थितीत गंभीर होत चाललेले प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न वर्धिनी करत आहे.

आजपर्यंत आपल्यासारख्या अनेक सहृदांच्या आधारानेच वर्धिनीचा हा वटवृक्ष बहरला आहे.
आपणा सर्वांचे सहकार्य असेच वर्धिष्णु होत राहील असा विश्वास आहे.




**कौशल्य विकास केंद्र, चऱ्होली - नवीन वास्तू**

# क्षण अभिमानाचे

* ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि भटके-विमुक्त आयोगाचे अध्यक्ष, रा. स्व. संघाचे माजी प्रांत कार्यवाह **मा. भिकुजी (दादा) इदाते** यांना समाजकार्यासाठी, तर ज्येष्ठ हिंदुत्ववादी लेखक आणि विचारवंत **मा. रमेश पतंगे** व लोकसाहित्याचे अभ्यासक ज्येष्ठ लेखक **प्रा. प्रभाकर मांडे** यांना साहित्यासाठी भारत सरकारने **पद्मश्री पुरस्काराने** सन्मानित केले.

* दि. ५ फेब्रुवारीला जोगळेकर कुल वृतांत समितीतर्फे कै. प्रभाकर शिवराम उर्फ मामासाहेब जोगळेकर यांच्या स्मरणार्थ **श्री. शिरीष पटवर्धन** (उपाध्यक्ष - 'स्व'-रूपवर्धिनी) यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

* सामाजिक कार्यात भरीव योगदान देणाऱ्या स्त्री कार्यकर्त्यांच्या प्रयत्नांची विशेष दखल घेऊन ८ मार्च - जागतिक महिला दिनानिमित्त रोटरी क्लब ऑफ पुणे युनिव्हर्सिटीने बचत गटाच्या संघटिका **सौ. वनिता जगताप** व रुग्ण सहाय्यक वर्ग, मालेच्या शिक्षिका **सौ. दुर्गा केणी** यांना रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ च्या डिस्ट्रिक्ट फर्स्ट लेडी डॉ. हेमाजी परमार यांच्या हस्ते **उल्लेखनीय सेवा पुरस्कार** देऊन सन्मानित करण्यात आले.

* मध्यवर्ती ज्येष्ठ नागरिक संघटना व आनंदी ज्येष्ठ नागरिक संघ संयुक्त सहकार्याने चऱ्होली प्रकल्पाच्या कार्यकर्त्या **सौ. चारुता कडुरकर** यांच्या वृद्ध सेवा कामाचे कौतुक महिला दिनानिमित्त सौ. मेधाताई कुलकर्णी यांच्या हस्ते पुरस्कार देऊन करण्यात आले.

* विज्ञान तंत्रज्ञान फिरत्या प्रयोगशाळेच्या माध्यमातून संपर्कात असणारी खेड-राजगुरुनगर येथील न्यू इंग्लिश स्कूल, लांडेवाडी, ता. आंबेगाव, जि. पुणे या शाळेची इयत्ता ९ वी मध्ये शिकत असलेली विद्यार्थिनी **कु. आराध्या सतीश देवरे** हिची ISRO YUVIKA Young Scientist Programme 2023 साठी निवड झाली.

* संस्थेचे उपाध्यक्ष **श्री. शिरीष पटवर्धन** यांना गीताधर्म मंडळ, पुणे यांच्यामार्फत यावर्षीचा पत्रमहर्षी ग. वि. केतकर पुरस्कार मिळाला.

* संस्थेचे कार्याध्यक्ष **डॉ. संजय विष्णू तांबट** हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामधील 'संज्ञापन आणि वृत्तपत्र विद्या' विभागाचे प्रमुख झाले आहेत.

* वर्धिनीची युवती कार्यकर्ती **ॲड. सौ. भाग्यश्री सुनीलजी बोरा** हिचे शिरुर बार असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी निवड झाली आहे.

* पाकोळी बालवाडीच्या मुख्याध्यापिका **सौ. राणी काळे** यांचा आदर्श शिक्षिका म्हणून कसबा संस्कार केंद्राकडून शिक्षकदिनी सत्कार झाला.

* यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विद्वत परिषदेवर (अकॅडेमिक कौन्सिल) नामनिर्देशित सदस्य म्हणून मा. कुलगुरू डॉ. संजीव सोनावणे यांनी वर्धिनीचे कार्याध्यक्ष **डॉ. संजय तांबट** यांची निवड केली आहे.

**सर्वांचे वर्धिनी परिवाराकडून मन:पूर्वक अभिनंदन.**

## भावपूर्ण श्रद्धांजली

* भारतातील हरितक्रांतीचे जनक, प्रसिद्ध कृषी शास्त्रज्ञ **डॉ. एम. एस. स्वामीनाथन** यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.
* संघ प्रचारक आणि विज्ञानभारतीचे राष्ट्रीय संघटन सचिव **श्री. जयंतराव सहस्रबुद्धे** यांचे प्रदीर्घ आजाराने निधन झाले.
* राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक आणि माजी सह-सरकार्यवाह, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे संघटनमंत्री म्हणून दीर्घकाळ काम केलेले **श्री. मदनदास देवी** यांचे निधन झाले.
* ज्येष्ठ गणितज्ज्ञ **डॉ मंगला नारळीकर** यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.
* राष्ट्र सेविका समिती पश्चिम महाराष्ट्र प्रांत बौद्धिक प्रमुख **मा. सौ. शैलाताई जोशी** यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.
* वर्धिनीच्या सर्वसाधारण सभेच्या सदस्या डॉ. प्राचीताई साठे यांचे पती 'खुला आसमान'चे संस्थापक **श्री. मिलिंद साठे** यांचे दुःखद निधन झाले.
* 'स्व'-रूपवर्धिनी संस्थेचे माजी अध्यक्ष स्व. पुरुषोत्तमभाई श्रॉफ यांच्या पत्नी **श्रीमती सुधाबेन श्रॉफ** यांचे वयाच्या ९४ व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.
* वर्धिनीचे मार्गदर्शक **श्री. त्र्यंबकराव आपटे** सर यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.
* गरवारे बालभवनच्या संचालिका, सामाजिक कार्यकर्त्या **श्रीमती शोभाताई भागवत** यांचे प्रदीर्घ आजाराने निधन झाले.
* 'स्व'-रूपवर्धिनीचे उपाध्यक्ष श्री. उदयभाई गुजर यांचे लहान बंधू, विंग गावातील ज्येष्ठ उद्योजक **श्री. संदेशभाई भानुदास मेहता (गुजर)** यांना देवाज्ञा झाली.
* वर्धिनीचे कार्यवाह श्री. विश्वास कुलकर्णी व कोषाध्यक्ष श्री. विलास कुलकर्णी यांच्या आई **श्रीमती सरोजिनी विनायक कुलकर्णी** यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.
* वर्धिनीच्या स्थापनेपासूनचे ज्येष्ठ मार्गदर्शक कै. श्री. दि. दा. जोशी यांच्या पत्नी **श्रीमती प्रतिभा दिनकर जोशी** यांचे निधन झाले.
* वर्धिनीचे देणगीदार जयवंत फडके यांच्या पत्नी **सौ. अमिता फडके** यांचे अल्पशः आजाराने निधन झाले.
* संस्थेच्या हितचिंतक, देणगीदार, उत्तम वक्त्या **सौ. संध्याताई साबणे** यांचे आजारपणामुळे दुःखद निधन झाले.
* वर्धिनीत अनेक वर्षे चालक म्हणून सेवा देणारे **श्री. अशोक मुटकुळे** यांचे निधन झाले.
* वर्धिनीच्या ग्रंथपाल श्रीमती नीला कुडलिंगार (अव्वा) यांच्या सासूबाई **श्रीमती नागव्वा तथा अम्मा कुडलिंगार** यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.
* स्वामी विवेकानंद शाखेचा युवक हर्षल सोनार याचे वडील **श्री. लक्ष्मीकांत सोनार** यांचे अल्पशा आजाराने

दुःखद निधन झाले.

❊ वर्धिनीच्या विज्ञान विभागाचे पालक प्रा. श्री. विनायक शुक्ल यांच्या पत्नी **प्रा. निर्मला विनायक शुक्ल** यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.

❊ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते श्री. राहुल पुंडे यांच्या आई **सौ. रंजना रत्नाकर पुंडे** यांचे निधन झाले.

❊ वर्धिनीच्या चऱ्होली केंद्राचे कार्यकर्ते श्री. नितीन रासकर यांच्या मातोश्री **श्रीमती सिंधुबाई रासकर** यांचे निधन झाले.

❊ वर्धिनीच्या बचतगटाच्या संघटिका सौ. वनिता जगताप यांच्या आईंचे, **श्रीमती सुशिला कोकटनूर** यांचे दुःखद निधन झाले.

❊ वर्धिनीचा युवा कार्यकर्ता राजेश बोरुडे यांच्या वडिलांचे **श्री. बबन बाबू बोरुडे** यांचे निधन झाले.

वर्धिनी परिवार वरील सर्व कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे.

# दैनंदिन शाखा आणि प्रकल्पांचे पत्ते व संपर्काच्या वेळा

**शाखा विभागपालक–श्री. विनोद बिबवे ✆ : ९८५०८९०८२२**  **युवा विभागप्रमुख–श्री. चेतन कुसाळकर ✆ : ९८८११४४४९६१**
**शाखा विभागप्रमुख–श्री. शुभम जगताप ✆ : ९७६३४७१३७२**

**शाखा विभाग सहप्रमुख – श्री. सतीश बिराजदार ✆ : ७०५७८७४६७०**
**शाखा विभाग समन्वयक – श्री. तुषार काबदुले ✆ : ९९२१२३०२३५**
**केंद्रीय निर्माण शाखाप्रमुख – श्री. प्रणव पोळ ✆ : ९१४५१६९७५२**
**युवा विभाग विस्तारक – श्री. केदार घाटगे ✆ : ७६२०९६७६२७**

## भाग १ (पूर्व शहर विभाग)

**भागप्रमुख : कु. मोहन कानडे ✆ : ८२३७३७३०४६**  **भाग युवाप्रमुख : कु. अक्षय भेगडे ✆ : ९६७३९१३०१७**

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख | युवा प्रमुख |
|---|---|---|---|
| समर्थ रामकृष्ण शाखा | बाबुराव सणस कन्याशाळा, २२/१, मंगळवार पेठ, पुणे – ११. | कु. भूमेश जाधव ✆ : ९८९०७५४०२५ | श्री. हर्षल नरवडे ✆ ९३७११४५९२५ |
| स्वामी योगानंद शाखा | एम. ई. एस. भावे हायस्कूल, (पेरुगेट) सदाशिव पेठ, पुणे – ३० | कु. केतन धाडवे ✆ : ८०१०३३८००९ | श्री. सौरभ नांदे ✆ ९१७२५८१७९८ |
| स्वामी श्रद्धानंद शाखा | म. गांधी विद्यालय घोरपडे पेठ, पुणे – ४२ | कु. प्रसाद दासरी ✆ : ८०१०७८२१९९ | श्री. प्रथमेश पासलकर ✆ ८७९६०६५२२४ |
| **वीर अभिमन्यू बालशाखा** | 'स्व'–रूपवर्धिनी वास्तू २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ११ | **कु. प्रणव बर्डीवाले** ✆ : ८६६८५७८८१९ | |

## भाग २ (बिबवेवाडी विभाग)

**भाग युवाप्रमुख : श्री. चेतन ठाकरे ✆ : ८८८८६५०५८७**
**श्री. किशोर बेंडगे ✆ : ९८३४७३४३३४**
**भागप्रमुख : कु. प्रतीक कडू ✆ : ८२३७०६०७०१**

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख | युवा प्रमुख |
|---|---|---|---|
| स्वामी अखंडानंद शाखा | सीताराम आबाजी विद्यालय, बिबवेवाडी, पुणे – ३७ | कु. ओंकार वडजे ✆ : ७२४९१२५३३५ | श्री. अविनाश धनगर ✆ : ७३७८४५०४७० |
| स्वामी दयानंद सरस्वती शाखा | प्रियदर्शनी शाळा, व्हीआयटी शाळेशेजारी, बिबवेवाडी, पुणे ३७ | कु. आदित्य दिवटे ✆ : ८९९९९४९०१६ | कु. रोहन देशमुख ✆ : ७२१८२४२२२३ |

## भाग २ (पद्मावती विभाग)

**भागप्रमुख : श्री. अजय रायकर ✆ : ८३२९१६६४५६** **भाग युवाप्रमुख : श्री. चेतन ठाकरे ✆ : ८८८८६५०५८७**

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख | युवा प्रमुख |
|---|---|---|---|
| **स्वामी शिवानंद शाखा** | वि. स. खांडेकर शाळा, सहकारनगर, पर्वती, पुणे-९. | कु. निशांत शेटे ✆ : ९५६१६५९०४८ | कु. तेजस सरवदे ✆ : ९७६७५७७७५१ |
| **धर्मवीर शंभू राजे शाखा** | प्रेरणा माध्यमिक विद्यालय, गणेश चौक, आंबेगाव पठार, पुणे ४६ | सावता माळी ✆ : ८२६२८६३८२० | कु. संदीप जोगळे ✆ : ९९२२९३९९८० |

## भाग ३ (कर्वेनगर विभाग)

**भागप्रमुख : श्री. सतीश बिराजदार ✆ : ७०५७८७४६७०** **भाग युवाप्रमुख : श्री. प्रशांत साळुंके ✆ : ७७७६८९८८०४**

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख | युवा प्रमुख |
|---|---|---|---|
| **स्वामी सुबोधानंद शाखा** | पंडित दीनदयाळ उपाध्याय विद्यालय, एरंडवणे गावठाण, पुणे - ५२ | कु. प्रथमेश शिळीमकर ✆ : ७०५८४४५४४७ | कु. अभिषेक कनोजिया ✆ : ९७६२३०३३६१ |
| **राजर्षी शाहू शाखा** | सम्राट अशोक विद्यालय, कर्वेनगर, पुणे - ५२ | कु. किरण ननावरे ✆ : ७०३८७३४७७९ | श्री. रोशन पाटील ✆ : ८९७५७९११६३ |

## भाग ३ (सिंहगड रोड विभाग)

**भागप्रमुख : श्री. केतन खेडकर ✆ : ८३९०१४१५०३** **भाग युवाप्रमुख : श्री. प्रथमेश मातेरे ✆ : ९७६२१७२३१३**

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख | युवा प्रमुख |
|---|---|---|---|
| स्वामी ब्रह्मानंद शाखा | म.न.पा. शाळा क्र. १६८, हिंगणे खुर्द, पुणे - ५१ | कु. वैभव सपकाळ ✆ : ९७६४५०१७०६ | श्री. प्रतीक जाधव ✆ : ९९२३२०६०७० |
| **नरवीर तानाजी मालुसरे शाखा** | बंडुजी खंडुजी विद्यालय, धायरी. पुणे-४१ | **कु. आशिष सावंत** ✆ : ७५०७४३८१८४ | **श्री. रोहित शिंदे** ✆ : ७८८७६३४४१४ |

## भाग ४ (गोखलेनगर विभाग)

**भागप्रमुख : कु. हनुमान मेकडे ✆ : ७५०७९३३१६७** **भाग युवाप्रमुख : कु. अक्षय कदम ✆ : ८४०८८२६९९५**

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख | युवा प्रमुख |
|---|---|---|---|
| **स्वामी विवेकानंद शाखा** | रामदासस्वामी माध्यमिक विद्यालय पांडवनगर, वडारवाडी, पुणे-१६ | कु. प्रतीक धोत्रे ✆ : ९८९०८०४६७६ | श्री. चेतन धोत्रे ✆ : ८३९०१९०३८७ |
| **स्वामी अभेदानंद शाखा** | वीर बाजीप्रभू विद्यालय गोखलेनगर, पुणे - १६ | कु. शशांक बनगर ✆ : ८०८०७०९६८८ | श्री. आशिष कदम ✆ : ७३७८८०११५५ |

## भाग ५ (वर्धिका विभाग)

**भागप्रमुख : सौ. किरण भट्टड ✆ : ९८५००३४६७४** **युवती प्रमुख : कु. दिव्या घारे ✆ : ९९२११८३८७६२**

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख | युवती प्रमुख |
|---|---|---|---|
| **भगिनी निवेदिता शाखा** | आगरकर मुलींचे विद्यालय, रास्ता पेठ, पुणे - ११ | कु. गायत्री मोरे ✆ : ८४२१९२९३७७ | कु. समृद्धी यादव ✆ :९१४५४०१७१३ |
| **क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले शाखा** | महर्षी शिंदे विद्यालय, घोरपडे पेठ, पुणे - ४२ | कु. वैष्णवी परदेशी ✆ : ८००५५६३६१३ | कु. निकिता खताळ ✆ : ९३७३९९१५३९ |
| **प्रयत्न शाखा** | प्रेरणा माध्यमिक विद्यालय, गणेश चौक, आंबेगाव पठार, पुणे ४६ | कु. साक्षी शिंदे ✆ : ९८९०३४७७४३ | कु. रेश्मा पोटे |

**शाखा संपर्काच्या वेळा :** सोमवार ते शुक्रवार - सायं. ६.१५ ते ८.३०, शनिवार- दु. ५ ते ८.३०, रविवार- स. ७.३० ते १०.३०

## उत्थान विभाग

**विभाग पालक - श्री. संदीप मोरे ✆ : ९९२२२४८७८३**
**विभाग प्रमुख - श्री. उमेश माळेकर ✆ : ९६८९२४५९६५**
**विभाग समन्वयक - श्री. विठ्ठल शिंदे ✆ : ७०६६२१२४५६**

## ✻ शारदामणि महिला विभाग ✻

महिला विभाग पालक – श्रीमती पुष्पाताई नडे ✆ : ९८२२८२३७५७
महिला विभाग प्रमुख – सौ. मंजूषा कुलकर्णी ✆ : ९८५०२०८००९
महिला विभाग सहाय्यक – सौ. सुनिता गंगावणे
'पाकोळी' बालवाडी प्रमुख – सौ. राणी काळे
बचतगट समन्वयक – सौ. वनिता जगताप

## ✻ उद्योगशिक्षण वर्ग ✻

| | | |
|---|---|---|
| रुग्ण सहाय्यक (पुणे वर्ग) | – | सौ. लता सत्तूर, कु. अतिशा भोसले |
| रुग्ण सहाय्यक (माले वर्ग) | – | सौ. दुर्गा केणी, सौ. साधना सातपुते |
| शिवण वर्ग (पुणे) | – | सौ. संगीता पाटील, श्रीमती मनीषा कुलकर्णी |
| प्रौढ साक्षरता वर्ग | – | श्रीमती सुगंधाताई कबीर |

**✻ कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र, चऱ्होली ✻**

प्राचार्य श्री. शिरीष पाटील ✆ : ९५५२५८२९३६, श्री. संजय दिवे ✆ : ९८९००९४१८९
श्री. निशिकांत भालेकर ✆ : ८४४६३३१५१३, श्री. मिलिंद दाते ✆ : ८६०५९८६२७३

## ✻ प्रकल्प व संपर्काच्या वेळा ✻

| ✻ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र | ✻ अभ्यासिका केंद्र | ✻ ग्रंथालय |
|---|---|---|
| श्री. बापू शिंदे | श्री. निखिल गोरखे | श्रीमती नीला कुडलिंगार |

**✻ विज्ञान व तंत्रज्ञान फिरती प्रयोगशाळा**

पालक – श्री सुनील कुलकर्णी ✆ : ९६०४०१६७१५
विभागप्रमुख – श्री. विश्वास कुलकर्णी ✆ : ८६००१०१३०७

## ✻ विस्तार विभाग ✻

**शाखा उपक्रम – वर्धिनीची उपकेंद्रे**

✻ लक्ष्मीकेशव प्रतिष्ठान, सातारा ✻ फुले नगर प्रयत्न शाखा, नाशिक

**रुग्ण सहाय्यक वर्ग**

✻ विष्णुबुवा ब्रह्मचारी सामाजिक केंद्र, बोर्ली पंचतन, ता. श्रीवर्धन

**संपर्काच्या वेळा**

सोमवार ते शनिवार सकाळी ११.०० ते सायंकाळी ६.००

WITH BEST COMPLIMENTS FROM

# JAYASINH V. MARIWALA
# TRUSTEE

## THAKKAR K. M. BHATIA NIWAS
## &
## THAKKAR V. CHAWL TRUST

# महती INTERACTIVES

Building Bonds, Nurturing Traditions

**महती INTERACTIVES**

**सादर करत आहेत**
**उत्कृष्ट दर्जाची बोर्ड बुक्स**

## आणि ती सुद्धा आपल्या मायबोली मराठीत!

**आमच्या पुस्तकांची अन्य वैशिष्ट्ये**

### संवाद
कथाकथनाच्या माध्यमातून
नात्यांचे संवर्धन

### संस्कार
पुराणातील गोष्टी
संदर्भासहित

### स्वरूप
हाताळण्यास सोप्पी
आणि आकर्षक चित्र






स्वरूपवर्धिनी परिवारासाठी
आमच्या सर्व पुस्तकांवर
कायमस्वरूपी* १०% सूट

MI_WARDHINEE_10

**सवलतीचा लाभ घेण्यासाठी**
**वरील QR कोड स्कॅन करा**
**किंवा आमच्या संकेतस्थळाला भेट द्या!**

**www.mahatee.co.in**

+९१-८२६३९१६९७१
connect@mahatee.co.in

सी - १०४, अवनीश अपार्टमेंट्स, पिनॅक
मेमरीज जवळ, कोथरूड, पुणे - ४११०३८


MME
SURGICAL & RESPIRATORY
MADHURA MEDICAL EQUIPMENT
SURGICAL & RESPIRATORY SOLUTIONS
AVAILABLE FOR SALES & SERVICE, RENTAL
We Do Sleep Study At Patient Home
MAHESH GALAXY, OFFICE 02, SINHGAD ROAD, NEAR VADGAON, BUDRUK PUNE - 41.
MOBILE:- 9767196713/ 9766872221/ 7774035583
EMAIL ID:- MADHURAMEDICAL@GMAIL.COM
ResMed Product
Airsense 10 AutoSet
Astral 150 Portable Ventilator
AirMini AutoSet
AirCurve 10 Vauto Bipap
N20 Mask
N30i Mask
Sefam Product
S.Box Auto Cpap
EcoStar Auto Cpap
Devilbiss Product
IGo2
Airbed Mattress
Oxygen Concentrator
Oxygen Cylinder
Pulmo Aide Nebulizer
Philips Product
Oxygen Concentrator
Respicare Product
Cpap 20
Bipap 30 Plus
Smile Pad Product
Adult Diaper
Day & Night Napkin
Hygiene Napkin
Under Pad

**With Best Compliments From**

REFCON

# Refcon Engineering Services Pvt. Ltd.

## Refrigeration Engineers



SKID MOUNTED REFRIGERATION SYSTEMS



EVAPORATIVE CONDENSER



GEA GRASSO SCREW COMPRESSOR PACKAGE

WE UNDERTAKE
DESIGN, SUPPLY, INSTALLATION & COMMISSIONING FOR

## REFRIGERATION SYSTEMS FOR: -

* COLD STORAGES
* FOOD PROCESSING AND DAIRIES
* BREWERIES
* CHEMICAL AND PHARMACEUTICALS

## OUR PRODUCTS: -

* UMA BRAND EVAPORATIVE CONDENSERS
* SKID MOUNTED REFRIGERATION UNITS
* AUTHORISED PACKAGERS GEA GRASSO SCREW COMPRESORS PACKAGES
* PRESSURE VESSELS AND OTHER REFRIGERATION EQUIPMENTS

**Registered Office: -**

Office No 310- 311, 'THE PENTAGON,

'Behind Lotus Court, Off. Pune Satara Road, Parvati,

Pune – 411009, Maharashtra. Website: www.refconengg.com

E-mail:: sales@refconengg.com Tele:- (020) 24213276

## * असे उपक्रम... असे तास... असे दिवस *

**संस्थेच्या इमारतीत चालणारे उपक्रम**

**सकाळी ६ ते दुपारी २ वाजेपर्यंत**

१) बालवाडी : सकाळी ९ ते दुपारी १
२) अभ्यासिका : सकाळी ६ ते दुपारी १२

**दुपारी १२ ते दु. ४ पर्यंत चालणारे उपक्रम**

१) उद्योगशिक्षण वर्ग : दुपारी १२ ते ४
२) साक्षरता वर्ग : दुपारी १२ ते २
३) कौशल्य विकास प्रशिक्षण वर्ग : स. ११ ते ४ चऱ्होली

**सायं. ६ ते रात्री १२ पर्यंत चालणारे उपक्रम**

१) शाखा विभाग : सायं. ६ ते रात्री ९
२) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग : सायं. ६ ते रात्री ८
३) अभ्यासिका : सायंकाळी ६ ते रात्री १२

**आठवड्यातून एक दिवस चालणारे उपक्रम**

पहाट कातकरी प्रकल्प – दर रविवारी ****

**सोमवार ते रविवार चालणारे उपक्रम**

१) दैनंदिन शाखा प्रकल्प*
२) अभ्यासिका
३) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग

**सोमवार ते शनिवार उपक्रम**

१) बालवाडी
२) बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण
३) साक्षरता वर्ग
४) रुग्ण सहाय्यक वर्ग
५) शिवण वर्ग
६) बचतगट
७) कुटुंब सल्ला केंद्र
८) वस्ती विकास प्रकल्प – 'उत्थान'***
९) फिरती प्रयोगशाळा /ग्रामविकास प्रकल्प **
१०) अभ्यासिका केंद्र

* हा प्रकल्प पुणे शहराच्या वेगवेगळ्या भागातील शाळांमध्ये संध्याकाळच्या वेळात चालतो.
** हा प्रकल्प पुणे व परिसरातील ४० शाळांमध्ये चालतो.
*** कसबा, भवानी, सोमवार व मंगळवार पेठ येथील वस्तींमध्ये संध्याकाळी.
**** रविवार पूर्ण दिवस मुळशी तालुक्यातील गावांमध्ये चालतो.
उर्वरित सर्व प्रकल्प संस्थेच्या इमारतीत नियोजित वेळेत चालतात.

**समुपदेशन विभाग – सौ. मेघा नगरे**


**कार्यालय विभाग**

श्री. शिवयोगी कुपस्थ, श्रीमती प्रगती तांबट,
श्री गणेश जसवंते (अंतर्गत लेखापाल).

**कार्यालय** – २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ४११०११

मो. : ९०११३८६३८६, ०२० – २६१२१७०४

**संपर्क** – सोमवार ते शनिवार, दु. ११.३० ते सायं. ५.३०



# प्रार्थना

नमस्कार देवा तुला आमुचा हा
करी आमुची मायभूमी महा ।।

हिचे रूप चैतन्यशाली दिसावे
जगाला कळावी हिची थोरवी ।
स्मरूनी हिच्या त्या कथा अन् व्यथाही
हिला न्यायचे रे पुन्हा वैभवी ।
अशा सर्व स्वप्नांस सामर्थ्य द्यावे
म्हणूनीच देवा नमस्कार हा ।। १ ।।

जनांचा प्रवाहो इथे चाललेला
सदा संस्कृतीच्या मुळापासुनी ।
पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या
आम्ही भिन्न ना त्यांचियापासुनी ।
तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला
तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा ।। २ ।।


स्फुरो कल्पनाशक्ति अभ्यास–यत्ने
बनो शुद्ध बुद्धीही तेजस्विनी ।
शरीरास आरोग्य, संकल्प चित्ती
नि आत्म्यास इच्छा शुभाकांक्षिणी ।
पदी धैर्य, बाहूत शौर्य स्फुरावे,
घडावी विवेकी कृती–ध्यास हा ।। ३ ।।

प्रभो तू चिदानंदरूपी असोनी
अणूरेणु ब्रह्मांड तू व्यापिले ।
तुझे अंश आम्ही, तुझ्या पूजनाचे
पहा दिव्य हे, ध्येय स्वीकारले ।
पुन्हा जन्म घेऊ, स्वराष्ट्रास ध्याऊ
प्रतिज्ञेस या तूचि साक्षी रहा ।। ४ ।।


**-: या वर्षामध्ये सीएसआर योजनेअंतर्गत आपण केलेल्या सहकार्याबद्दल आम्ही आपले ऋणी आहोत :-**

* बजाज फिनसर्व्ह चॅरिटेबल ट्रस्ट

* MH फिल्म स्टेज अँड कल्चरल डेव्हलपमेंट कॉर्पोरेटर



* पर्सिस्टंट फाऊंडेशन



* RSB फाऊंडेशन

* टाटा पॉवर कम्युनिटी डेव्हलपमेंट ट्रस्ट

* भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड

* परिख फाऊंडेशन

* टाटा इलेक्सी लिमिटेड

* प्रावी ऑटो स्विंग प्रा. लिमिटेड

* टाटा मोटर्स लिमिटेड

Mahendra P. Oswal

**Cell : 9822028189**

M/s. D. Pratap

Iron Merchants & Suppliers

1196, Bhawani Peth, Pune - 411 042

**Ph. : 26383585, 26383595**

**Resi. : 24264847, Fax : 26388607**

**E-mail : dpratap.oswal@gmail.com**



**नील इंजिनियर्स**

**सिव्हील इंजिनियरींग,** *Construction*

**वॉटर ॲण्ड एनर्जी मॅनेजमेंट सर्व्हिसेस**

**श्री पराग लकडे**

फोन नं. ९४२२००११७४, ९८२२११७९३१

751, Kasba Peth,
Sattoti Chowk,
Pune 411 011



**ENERGY CONSERVATION**

**IT DOESN'T COST MUCH.BUT IT SAVES MORE.**




: Our Products :

Solar On Grid Systems (NET-METERING)

Solar Off Grid Systems | Solar Hot Water Systems

Solar Pumps | Solar Street Lights

**CONTACT : +91 9028578015**

anshaenergy@gmail.com




**उदो उदो आइचा त्रिभुवनी असो धुंदवीत दशदिशा मंत्र हा दिसो संघशक्ति प्रबळ ही प्रकट जाहली रक्षण्यास हिंदुधर्म सिद्ध जाहली। शासण्या मदांधता विराट जागवा आपुला समाज नेउ परम वैभवा ।।**

# संपदा सहकारी बँक लि., पुणे

**मुख्य कार्यालय :** ७१७, बुधवार पेठ, डि.आय.सी. बिल्डींग,
कसबा गणपती मंदिराजवळ, पुणे ४११ ००२.

**फोन नं. :** (०२०) ४०३९४०३६ ते ४०३९४०४६

**ई–मेल :** headoffice@sampadabank.com

**वेबसाईट :** www.sampadabank.com

---

**सदा सर्वदा संपदा !!**

***★ "सेवेतून संपन्नता" हे ब्रीद बाळगणारी बँक... ★***

**संपदा सहकारी बँक !**

## सुवर्णमहोत्सवी वर्ष २०२३–२४

**यू.पी.आय., मोबाईल ॲप, ए.टी.एम., डेबिट कार्ड इ. अद्ययावत सेवा सुविधांसह**
***संपदा बँक आपल्या सेवेत !***

**✻ सर्व कर आणि जी.एस.टी. भरण्याची सुविधा ✻**

**✻ आकर्षक कर्ज योजना ✻**

**कर्जावर किमान व्याजदर, वेगवान कर्ज मंजुरी !!**

**✻ सुस्मित ग्राहकसेवा ✻**

**–: बँकेची मार्च २०२३ ची आर्थिक स्थिती :–**

| ठेवी | कर्जे | नफा | निव्वळ एन.पी.ए. |
|---|---|---|---|
| रु. १७०.१८ कोटी | रु. १०१.०८ कोटी | रु. १.३२ कोटी | शून्य टक्के |

आजच आपल्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधा, अथवा बँकेच्या वेबसाईटला भेट द्या.

---

| **गिरीश सरदेशपांडे** | **सी.ए. महेश लेले** | **सी. ई. अश्विनीकुमार उपाध्ये** |
|---|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

काळ बदलला, रुप बदललं...
तरीही रुपयाचं महत्त्व आणि
कायद्याचा क्लिष्टपणा कायम आहे...
१९५० मध्ये सुरू झालेला
कर आणि तत्सम 'अर्थ यज्ञ'
२०२४ मध्येही प्रज्वलित आहे...!

कर व व्यापारविषयक
कायद्यातील क्लिष्ट विषयांची
सहज सोप्या भाषेत माहितीसह
आर्थिक गुंतवणूक, आरोग्यविषयी
माहिती देणारे व्यापारी बांधवांचे
हक्काचे एकच व्यासपीठ

स्थापना १९५०

# व्यापारी मित्र

**मासिकातील एखाद्या माहितीने आपला लाखो रुपयांचा फायदा होऊ शकतो.**

(हा अनुभव आजवर शेकडो व्यापारी बांधवांनी घेतला आहे)

संस्थापक संपादक : स्व. श्री. जी. डी. शर्मा

**मासिकाची वर्गणी खालील प्रकारे भरू शकता.**

## सवलतीची वर्गणी योजना

३ वर्षे - रु. १९०० → २ वर्षे - रु. १३०० → १ वर्षे - रु. ७००

## रजिस्टर पोस्ट योजना

३ वर्षे - रु. २६०० → २ वर्षे - रु. १७८० → १ वर्षे - रु. ९४०

नियमितपणे वाचा व इतरांनाही
वाचायला प्रोत्साहित करा.
आजच संपर्क साधा.

## व्यापारी मित्र पब्लिकेशन्स प्रा. लि.

'परशुराम कुटी', १०६/९, एरंडवणा,
शामराव कलमाडी हायस्कूलसमोर, कर्वे रोड, पुणे - ४११००४
फोन : (०२०) २५४३ १०९४, मो. : ९४२१८ ८०२९०

१०१, कॅनॉट प्लेस, पहिला मजला,
मंगलदास रोड, वाडिया कॉलेज समोर, पुणे ४११ ००१
फोन : (०२०) ४१२६ ७३६० / ४१२६ ७३६१

**Website : www.vyaparimitra.com | E-mail : sampadak@vyaparimitra.com**
**CIN : U22110MH1997PTC112651**
**GSTIN : 27AAACV9948H1ZS (Nil)**

# CHIRRANTAN

2, Swaroop Apartment, Bhigwan Road, Baramati, Dist. Pune | **M. : +91 9422503047**

Advance & Specialized technologies in Water & waste water treatment

- **V Wire under Drain Systems**
- **Rapid Gravity Sand Filters**
- **Screening Solutions**
- **WTP Strengthening, Coating and Augmentation**
- **Water Distribution Pump and Piping**

***We Design, Construct and Operate***
Water treatment Plants
Sewage treatment Plants
Effluent Treatment Plants
Pressure Filters
Distribution piping and pumping

***Expertise Services***
Plant augmentation & up-gradation
Operation & Maintenance Services
Trouble shooting Services for small & big treatment Plants
Specialty Chemicals & Consumables

**Contact - Email : chirrantan.baramati@gmail.com**
**Contact : 9765822950, 7083139790**

LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

## Rahul Parkhi

Member Divisional Manager's Club

Agents Code No. : 32036 953

## LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

**Off. :** Br. No. 953, Camp, Aditi Complex, 2-Floor, G.T. Road, Pune - 411001

**Resi. :** Welcome City, A 2/303, Sukhsagar Nagar No. 2, Katraj, Pune 411046

**Tel. : (M) 9822478707, 9881493006**

**E-mail : insure.with.rahul@gmail.com**

**Best Compliments From -**

# SMT. S. N. BALDOTA TRUST

"Krutanjali" Shangrila Restaurant Lane,
65/20, Erandavana, Law College Road,
PUNE - 411 004

**Contact**

**Tel. : 2543 3000 / 3200**

**Mobile : 99223 - 00044**

# With Best Compliments From



CalCon®
Earning
~~Measuring~~ Trust Above All

- Customer-Centric Approach
- Reliable Partnerships
- Quality Assurance
- Global Reach

## OUR PRINCIPAL

**KNEO AUTOMATION — INDIA**
An industrial automation and Industry 4.0 service provider, offers MAPP platform services globally to diverse industries, with an emphasis on digital business transformation.

**GEFRAN BEYOND TECHNOLOGY — ITALI**
An Italian multinational company specializing in designing and manufacturing sensors, systems, and components for automation and control of industrial processes.

**CODRA — FRANCE**
Specialized Industrial IT Company addresses Industry 4.0 and Smart Cities challenges. Provides innovation and technical engineering services.

**QRC — INDIA**
be assured . be secured
Offers global cybersecurity services, providing integrated solutions for data security and privacy.

**Uflow Automation INDIA — INDIA**
Global Leader in Valve Manufacturing Committed to high-quality valve development, manufacturing, and marketing.

**CARBON — INDIA**
CarbonMinus stands at the nexus of energy management and sustainable practice, empowering businesses to redefine success.

**SMPL — INDIA**
Provides complete range of instrumentation fitting, valves automation systems and process accessories.

**FineTek — TAIWAN**
Leading manufacturer for process automation and level flow measurement solutions.

**CalCon — UAE**
Offers high-quality pressure and temperature gauges ensuring precision, reliability, and safety.

### Being CalCon

The company has evolved as a trusted partner in various industries, proudly serving the vibrant business land scape of Dubai.

Humble beginning as specialized in Process Measuring Instruments supplier, transformed into a broader spectrum of solutions in Process Automation, IIoT Digitalization, Industry 4.0 Consultant, Cyber Security And Data Privacy.

### Our Satisfied Customers

- Dubai Metro, GE Energy and Power, Nestle, Pepsi, National oil & well etc..
- Atlantis, Hilton, Taj, Habtoor, Novatel, Ramada, Address Federal Foods etc...
- Farnek, Serco, Imdaad, Etisalat, BK Gulf, Emrill, Lootah BC Gas, Middle East Fuji, etc...
- Wade Adams BILT, Imdaad, Emmar, Sobha Group, Khansaheb, etc..

### 25 Years of Excellence

- Process Measuring Instruments & Fittings
- Cyber Security & Data Privacy
- Industry 4.0 Consultant
- Process Automation
- IIoT Digitalization
- Calibration Lab

**Process Automation | IIoT | Digitalization | Industry 4.0 Consultant | Measuring Instruments & Fittings | Hardware & Software**








**CalCon Measuring and Control Systems Trading LLC**

sales@calconuae.com
www.calconuae.com
+971 4 222 8181
PO Box: 119246 Dubai UAE

# स्व. कृष्णाजी लक्ष्मण तथा किशाभाऊ पटवर्धन

(संस्थापक–'स्व'–रूपवर्धिनी) (१९२०–२००४)



रूपरंग वा असो गंधही ।
यातील माझे काहीच नाही ।
श्रेयाचा मज नको लेशही ।
निर्माल्यात विरावे ।।
विकसित व्हावे, अर्पित होऊनी जावे ।।

## 'स्व'–रूपवर्धिनी म्हणजेच

* सहवासातून शिक्षण व शिक्षणातून संस्कार घडवणारी संस्था.
* व्रती शिक्षक आणि तळमळीचे कार्यकर्ते यांच्याद्वारा हेतुप्रधान शिक्षण देणारी एक संस्था.
* आपुलकीने व जिव्हाळ्याने मुलांचे प्रश्न हाताळणारा, सर्वांना आपलासा वाटणारा परिवार.
* विपरीत परिस्थितीवर मात करायला शिकविणारी कार्यशाळा.
* राष्ट्रीय चारित्र्य, सार्वजनिक शिस्त आणि सामाजिक बांधिलकी जोपासणारा एक 'राष्ट्रीय प्रकल्प'.
* परिस्थितीचा शाप आणि वातावरणाचा ताप असला, तरीही सदैव प्रगतीचाच मार्ग दाखवणारी, आपुलकी निर्माण करणारी संस्था.
* अर्थात, ही पूर्ण वेळाची शाळा नाही; शाळेला पर्यायही नाही. विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांद्वारे एकही दिवस सुट्टी न घेता वर्षभर चालविला जाणारा हा एक अनौपचारिक शैक्षणिक प्रकल्प आहे.

प्रति, ____________________

प्रबोध 98810 62744

हे मासिक 'स्व'रूपवर्धिनी संस्थेच्या मालकीचे असून संस्थेच्या वतीने मुद्रक श्री. प्रफुल्ल कुलकर्णी, प्रबोध संपदा, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे – २ येथे छापून व प्रकाशक श्री. विश्वास विनायक कुलकर्णी यांनी २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ११ येथे प्रसिद्ध केले.